या आंतरविभागीय हॉकी स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. या वेळी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव अॅड. संदीप कदम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. दीपक माने, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य संतोष ढोरे, महाराष्ट्र हॉकी संघटनेचे सचिव मनोज भोरे, शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. विद्या पाठारे उपस्थित होते.

**पिंपरी : मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर आंतर विभागीय हॉकी (मुले गट) स्पर्धेत पुणे शहराने विजेतेपद पटकाविले. या वेळी विजेता संघ व मान्यवर.**

करोनामुळे जवळपास दोन वर्षांनंतर पुणे विद्यापीठाच्या या पहिल्याच क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे शहर, पुणे ग्रामीण, नाशिक व अहमदनगर या ४ गटांनी सहभाग घेतला. यामध्ये अतिशय रंगतदार ठरलेल्या पुणे शहर विरुद्ध पुणे ग्रामीण यातील अंतिम सामन्यामध्ये पुणे शहराकडून व्यंकटेश केंच, आदित्य लाळगे, राहुल शिंदे यांनी चमकदार कामगिरी करत संघाला विजय मिळवून दिला. विजयी संघाला ग्वालेहर (मध्य प्रदेश) येथे होणाऱ्या पुढील स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेसाठी पंच म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शिक्षण अधिकारी मनोहर कुंजीर, निवड समिती सदस्य योगेश मुथ्थ्या, संजय गायकवाड, श्रीधरन, अजित लाकरा यांनी काम पाहिले. प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालिका डॉ. विद्या पाठारे तसेच सर्व समिती सदस्यांनी या दोन दिवसीय क्रीडा स्पर्धेचे उत्कृष्ट संयोजन व आयोजन केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी लेफ्ट विठ्ठल नाईकवाडी, प्रा. संतोष सास्तुरकर, प्रणित पावले, अशोक मगर, रामदास चिंचवडे, सुनील भोसले, सचिन शितोळे यांच्यासह बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पुणे विभागीय क्रीडा समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

प्रभात Sun, 21 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/64462438



# *Department of Physical Education*











# *Dr. Priyanka Joshi More, Department of History*









# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING NOVEMBER 2021*

| SR.NO. | AUTHOR | TITLE |
|---|---|---|
| 1 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MARCH 2017 |
| 2 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA FEB 2017 |
| 3 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA DEC 2017 |
| 4 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA SEP 2017 |
| 5 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JAN 2017 |
| 6 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MARCH 2016 |
| 7 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JUL 2016 |
| 8 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA DIWALI 2015 |
| 9 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA APR 2011 |
| 10 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA AUG 2015 |
| 11 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JUN 2015 |
| 12 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JUL 2015 |
| 13 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JAN 2016 |
| 14 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MAY 2016 |
| 15 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA APR 2016 |
| 16 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JUN 2016 |
| 17 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JAN 2012 |
| 18 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA SEP 2012 |
| 19 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA APRIL 2014 |
| 20 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JUL 2017 |
| 21 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA DIWALI 2017 |
| 22 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA SEP 2015 |
| 23 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA AUG 2014 |
| 24 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA AUG 2013 |
| 25 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA SEP 2014 |
| 26 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA SEP 2013 |
| 27 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA OCT 2013 |
| 28 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MAY 2011 |
| 29 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JUL 2014 |
| 30 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MAY 2012 |
| 31 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA AUG 2012 |
| 32 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA OCT 2011 |
| 33 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA APRIL 2015 |
| 34 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA OCT 2010 |
| 35 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA AUG 2010 |
| 36 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MARCH 2012 |
| 37 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA JAN 2014 |
| 38 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MARCH 2017 |
| 39 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MARCH 2011 |
| 40 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA FEB 2012 |

## *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING NOVEMBER 2021*

| SR.NO. | AUTHOR | TITLE |
|---|---|---|
| 41 | PATIL YASHODHAN | MUKTASHABDA DIPOSTAV 2008 |
| 42 | PATIL YASHODHAN | MUKTASHABDA DIWALI 2012 |
| 43 | PATIL YASHODHAN | MUKTA SHABDA MAY 2015 |
| 44 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2009 |
| 45 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI May 2016 |
| 46 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2012 |
| 47 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI VASNTIK 2012 |
| 48 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI VASANTIK 2012 |
| 49 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2010 |
| 50 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2008 |
| 51 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI VASANTIK 2011 |
| 52 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2015 |
| 53 | SANE GURUJI RASHTRIY SMARAK TRUST | MY MAVASHI Diwali 2011 |
| 54 | SANE GURUJI SMARAK TRUST | MY MAVASHI VASANTIK 2013 |
| 55 | SANE GURUJI RASHTRIY SMARAK TRUST | MY MAVASHI April 2014 |
| 56 | SANE GURUJI RASHTRIY SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2014 |
| 57 | SANE GURUJI RASHTRIY SMARAK TRUST | MY MAVASHI DIWALI 2016 |
| 58 | SANE GURUJI RASHTRIY SMARARK TRUST | MY MAVASHI April 2019 |
| 59 | SANE GURUJI RASHTRIY SMARARK TRUST | MY MAVASHI Diwali 2017 |
| 60 | SANE GURUJI RASHTRIY SMARARK TRUST | MY MAVASHI DIWALI 2017 |

# *News Paper Clippings : November 2021*




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .
[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***



*News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## करोनामुळे दीड ते दोन वर्षांपासून भरतीवर होते निर्बंध

# २०८८ पदांवर प्राध्यापक भरती



### अखेर पात्र उमेदवारांना प्राध्यापक पदाची मिळणार संधी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १५** - राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमधील ३७० प्राचार्य व २०८८ सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. रिक्त पदावर निवड झालेल्या प्राध्यापकांचे वेतन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहे.

याबाबतचा शासन निर्णय सोमवारी प्रसिद्ध करण्यात आला. त्यामुळे प्राध्यापक भरतीचा मार्ग मोकळा झाला असून, पात्र उमेदवारांना प्राध्यापक पदाची संधी मिळणार आहे. प्रथमतः अतिरिक्त ठरलेल्या सहायक प्राध्यापकांना रिक्त पदी तातडीने समायोजित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्राध्यापकाचे पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यानंतर संस्थांना पदभरतीची प्रक्रिया सुरू करता येईल.

उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी राज्याच्या उच्चस्तरीय सचिव समितीने एकूण ४७३८ पदांना मान्यता दिली होती. त्यापैकी १६९२ पदे आज रोजीपर्यंत भरण्यात आली. करोनामुळे दीड ते दोन वर्षांपासून भरतीवर राज्य शासनाने निर्बंध घातले होते.

आजपर्यंतच्या ३७० प्राचार्यांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यास यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे. आता प्राध्यापक भरतीस वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

### अन्यथा संस्थेवर वेतनाची जबाबदारी

महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही. या पदासाठी वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत ही पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. त्या व्यतिरिक्त या पदांवरील पदभरती केल्यास अशा प्राध्यापकांची वेतनाची जबाबदारी ही संबंधित संस्थांची राहील, असेही शासन निर्णयात नमूद केले.

> प्राध्यापक भरतीचा निर्णय स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे अर्हतापात्र उमेदवारांना प्राध्यापकांची संधी प्राप्त होणार आहे. रिक्त पदांमुळे होणारी शैक्षणिक नुकसान टळणार आहे. मात्र, प्राचार्य पदभरती करताना त्यांना राज्य शासनाने पाच वर्षांऐवजी दहा वर्षांचा नियुक्तीचा कालावधी असणे शैक्षणिकदृष्ट्या संयुक्तिक ठरेल. त्याबाबत राज्य शासनाकडून विचार व्हायला हवा.
>
> **– डॉ. गजानन एकबोटे,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

प्रभात Tue, 16 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64370609

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# 'मॉडर्न'मध्ये दिवाळी पहाट

**पुणे :** पी. ई. एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल येथे पहाटेच्या प्रसन्न वातावरणात विद्यार्थिनी, पालक, शिक्षकवृंद यांच्या सहभागातून दिवाळी पहाट कार्यक्रम झाला. शाळा फुलांच्या माळा, आकाशकंदील, दिव्यांची आरास आणि रांगोळ्यांनी सजविण्यात आली होती. इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी दिवाळी शुभेच्छा कार्ड तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. त्यांचे प्रदर्शनही भरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता पवार, उपमुख्याध्यापिका डॉ. उज्ज्वला हातागळे, पर्यवेक्षिका अनिता बसाळे व विद्यार्थिनी, शिक्षक, पालक यांच्या हस्ते पणत्या प्रज्ज्वलित करण्यात आल्या.

पदाधिकाऱ्यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. मेघा धोत्रे या विद्यार्थिनीने नृत्याच्या माध्यमातून गणेश वंदना सादर केली. गायत्री आढे, रसना आढे, रुचिका भालेराव आणि संजना परदेशी या विद्यार्थिनींनी भक्तिगीत सादर केले. अनन्या मोटेगावकरने श्लोक सादर केला. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी शिक्षक प्रतिनिधी अनिता नाईक, सांस्कृतिक प्रमुख पुष्पा रामटेके, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. भाग्यश्री महाशब्दे यांनी सूत्रसंचालन केले.

Maharashtra Times 12.11.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# महाविद्यालये आजपासून गजबजणार

## करोना सुरक्षिततेचे निर्देश जारी; विद्यार्थ्यांत उत्सुकता

उत्सुकता असली तरी करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सुरक्षिततेचे निर्देशही दिले आहेत.

राज्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिवाळीपूर्वीच दि.२० ऑक्टोबरपासून राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार राज्यभरात दिवाळीपूर्वी महाविद्यालये सुरू करण्यात आली. मात्र त्याच दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दि. २० ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीत दिवाळीची सुट्टी जाहीर केली होती. त्यामुळे दिवाळीपूर्वी शहरातील महाविद्यालये सुरू करता आले नाही. आता मात्र महाविद्यालये सुरू करण्यास संस्थांनी पूर्ण तयारी केली आहे.

राज्य शासनाने महाविद्यालये सुरू करताना विद्यार्थ्यांचे लसीचे दोनही डोस केलेले असावे आणि ५० टक्के उपस्थितीने वर्ग सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मोहीम राबवून सर्वच विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पहिल्या टप्प्यात पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा वयाचा विचार करता त्यांचे वर्ग सुरू केले जाणार आहे. तसेच पहिल्यांदाचा प्रात्यक्षिकचा भाग करून घेतला जाणार असल्याचे काही प्राचार्यांनी सांगितले.

> बहुतांश विद्यार्थ्यांचे नुकतेच १८ पूर्ण होत आहे, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे दोनही डोसची तफावत पाहता त्यांच्या लसीकरणास विलंब होणार आहे. त्यामुळे दोन्ही डोस पूर्ण न केल्याने त्यांना महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही. मात्र, त्यांच्यासाठी ऑनलाइन वर्ग सुरू राहतील. **- राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

प्रभात Mon, 15 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64351919

### शिक्षण विभाग जाणून घेणार विद्यार्थी, शिक्षकांच्या तक्रारी

**पुणे, दि. १५** - उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या सूचनेवरून उच्च शिक्षणाच्या सर्व विभागीय सहसंचालकांनी आपल्या कार्यक्षेत्रात जिल्हा स्तरावर प्रत्येक दोन महिन्यांतून एकदा विद्यार्थी-पालक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, प्राचार्य व शैक्षणिक संस्था यांच्याशी समन्वय साधून त्यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासंदर्भात आदेशित केले आहे. त्यानुसार पुणे विभागाच्या वतीने पुणे जिल्ह्यासाठी ही कार्यशाळा शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयात दि. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता आयोजित केली आहे. ज्यांना या कार्यशाळेत प्रत्यक्ष हजर राहणे शक्य नाही. त्यांच्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग नोंदवण्याची सोय केली आहे.

प्रभात Tue, 16 Nov
https://epa

### मॉडर्न महाविद्यालयात आज कार्यशाळा

उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय या उपक्रमांतर्गत १७ नोव्हेंबरला सकाळी साडेदहा वाजता मॉडर्न महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. उच्च शिक्षणातील विविध घटकांच्या अडी-अडचणी या कार्यशाळेत सोडवल्या जातील. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सर्व विभागीय सहसंचालक ,उच्च शिक्षण यांनी आपल्या कार्यक्षेत्रात जिल्हा स्तरावर दोन महिन्यांतून एकदा विद्यार्थी-पालक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, प्राचार्य व शैक्षणिक संस्था यांच्याशी समन्वय साधून त्यांच्या अडी-अडचणी सोडवण्यासंदर्भात निर्देश दिले आहेत.

लोकसत्ता Wed,
https

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## 'मॉडर्न'मध्ये आज कार्यशाळा

पुणे : मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात बुधवारी (दि. १७) सकाळी १०.३० वाजता उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या उपक्रमातंर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत महाविद्यालयाशी, विद्यापीठाशी संबंधित विद्यार्थी-पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे सचिव, पदाधिकारी यांनी त्यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन उच्च शिक्षण पुणे विभागाचे सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांनी केले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ज्यांना या कार्यशाळेत प्रत्यक्ष हजर राहणे शक्य नाही, त्यांच्यासाठी महाविद्यालयीनस्तरावर दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभाग नोंदवण्याची सोय करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील सहभागी सर्व महाविद्यालयांनी खालील गुगल लिंकद्वारे या कार्यशाळेसाठी नावनोंदणी करणे आवश्यक आहे. ही गुगल लिंक खालीलप्रमाणे आहे.

लिंक https://forms.gle/w9qtHBWSt5mxLwDQ9

Pudhari 17.11.2021

सकाळ

## » निवेदन

- मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या १९७० मध्ये पी.डी. कॉमर्स या वर्गात प्रवेश घेतलेल्या आणि १९७३ मध्ये बी.कॉम झालेल्या विद्यार्थी मित्रमंडळाचा मेळावा २ जानेवारी २०२२ रोजी आयोजित केला आहे. संपर्क पुस्तिकेसाठी माजी विद्यार्थ्यांनी आपले फोटोसह नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व स्वतःविषयीची माहिती व्हॉट्सॲपवर पाठवावी. संपर्क : ९८२२०२७०९६/८८८८८४९५१९

Pune, Pune-Today
24/11/2021 Page No. 6

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा संत साहित्य प्रथम पुरस्कार डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते स्वीकारताना *डॉ. स्नेहल तावरे*

उजवीकडून कार्यवाह श्री. यशवंत लिमये ,अध्यक्ष श्री. नितीनभाई कारिया आणि संयोजक श्री. सुधीर कुलकर्णी



लोकमत

निगडीत मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या वतीने संत वाङ्मय पुरस्काराचे वितरण

## संत साहित्याचे मूळ भगवद् गीतेमध्येच : रामचंद्र देखणे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्राच्या गावागावात संतसाहित्य वाचले जाते, संतसाहित्याचे मूळ भगवद्गीताच आहे. ओवी, अभंग, गवळणी, पदे यातून संतांनी आपले विचार समाजाला दिले. संतसाहित्याची लोकाभिमुखता, रसाळ भाषा आणि कवित्वातून परतत्त्वाचा स्पर्श होतो, असे मत संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

निगडी प्राधिकरण येथील मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या वतीने संत वाङ्मय पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. मनोहर वाढोकार सभागृहात झालेल्या सोहळ्यास संस्थेचे प्रमुख नितीनभाई कार्या, कार्यवाह यशवंत लिमये, उपक्रम संयोजक सुधीर कुलकर्णी, परीक्षक डॉ. कल्पना काशिद उपस्थित होते.

संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे म्हणाले, "महाराष्ट्रात राजसत्ता नव्हती. परकीयांकडून होणारे अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, दुराचाराने समाज पोखरला असताना, चैतन्य हरविले असताना त्या समाजास आत्मनिर्भरता देण्यासाठी संत चळवळ उभी राहिली. देशभाषेची प्रतिष्ठा जपण्यासाठी भक्तिपंथाचा उदय झाला होता."

यशवंत लिमये म्हणाले, गेल्या २३ वर्षांपासून साहित्य पुरस्कार उपक्रम सुरू आहे.

मेधा कुलकर्णी, स्नेहल तावरे, चंद्रकोत पोतदार, ज्योती रहाळकर यांनी मनोगते व्यक्त केली. सुधीर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.



निगडी प्राधिकरण येथील मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या वतीने संत वाङ्मय पुरस्कार वितरण करण्यात आले.

- चिंतनपर, विवेचनपर विभागात डॉ. मेघा गोसावी यांच्या 'सद्‌गुरु अच्युताश्रम स्वामीकृत अभंगगाथा (स्नेहवर्धन प्रकाशन), तर गोविंद व मंदाकिनी खिरे (पुणे) यांच्या मधुश्री प्रकाशनाच्या श्री नाथ भागवत या पुस्तकास द्वितीय पुरस्कार दिला.
- ज्ञानज्योती ओवी पुन्हा नव्यानी या डॉ. ज्योती रहाळकर (पुणे) यांच्या पुस्तकाचा तसेच दशग्रीव रावण एकादशमुखी हनुमान, चिरंजीव अंजनीसुत हनुमान व रामायण या डॉ. दिलीप साठे यांच्या पुस्तकाचा व जो संती वसविला ठावो या शिरीष कवडे (पुणे) यांना विशेष पुरस्कार दिला.
- संत जीवन ललित वाङ्मयम डॉ. चंद्रकांत पोतदार लिखित आणि चंद्रकांत जोशी प्रकाशित सृजनगंध या पुस्तकास प्रथम, चपराक प्रकाशनाच्या महाराष्ट्राचे विचारदुर्ग या रमेश वाघ यांच्या पुस्तकास दुसरा, तर तिसरा वेदान्तश्री प्रकाशनाच्या ओळख वेदांची या प्रा. डॉ. शरद कुळकर्णी यांच्या पुस्तकास मिळाला आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Nov 26, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २१० पदे रिक्त

# शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा टिकणार तरी कसा?



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ७** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्राध्यापकांच्या सुमारे ५५ टक्क्यांहून अधिक जागा रिक्त असल्याचे समोर आले आहे. विद्यापीठातील विविध विभागांसाठी मंजूर असलेल्या ३८६ पैकी केवळ १७६ पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळे देशात आघाडीवर असलेल्या पुणे विद्यापीठाला गुणवत्तेचा दर्जा टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

राज्य शासनाकडून प्राध्यापक भरतीला बंदी असल्याने विद्यापीठाच्या विभागातील अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे पुणे विद्यापीठाला प्राध्यापकांवरील ताण कमी करण्यासाठी आणि विद्यापीठातील विभाग सुरू राहण्यासाठी त्यांच्या निधीतून काही प्राध्यापकांची नेमणूक करावी लागत आहे. त्यांच्या वेतनासाठी दरवर्षी सुमारे साडेतीन कोटी रुपयांहून अधिकचा खर्च विद्यापीठाला करावा लागत आहे. विद्यापीठाने १०० प्राध्यापकांची कंत्राटी आणि विद्यापीठाच्या निधीच्या आधारे नेमणूक केली आहे. या नेमणुकीवरील होणाऱ्या खर्चाचा भार विद्यापीठाच्या तिजोरीवर पडत आहे.विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि सहायक ग्रंथपाल अशी एकूण ४२ पदे मंजूर करण्यात आली आहेत. परंतु, यापैकी केवळ २० जागा भरण्यात आल्या आहेत.

> “ राज्यातील विद्यापीठ, प्राध्यापकांच्या संघटनांनी आणि शिक्षण क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांनी प्राध्यापक भरती सुरू करावी, अशी मागणी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे वारंवार केली आहे. मात्र राज्य शासनाकडून केवळ आश्वासन होत असून, त्यावर कार्यवाही होताना दिसत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू करावी, असा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे.
>
> – **राजेश पांडे**, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विभागनिहाय रिक्त पदे**

| विभाग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| रसायनशास्त्र | ४२ | २० | २२ |
| भौतिकशास्त्र | ४० | १५ | २५ |
| इंग्रजी | ८ | २ | ६ |
| परकीय भाषा | १४ | ४ | १० |
| इतिहास | ८ | २ | ६ |
| गणित | १४ | ७ | ७ |
| पाली | १५ | ५ | १० |
| संख्याशास्त्र | २० | ७ | १३ |
| प्राणिशास्त्र | १८ | ८ | १० |

प्रभात Mon, 08 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64204722

# अकरावीच्या दीड लाख जागा रिक्तच

**पुणे, दि. ७** - इयत्ता अकरावीसाठी ३ लाख ६९ हजार १४९ जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. तर, १ लाख ६६ हजार ६०१ जागा अद्यापही रिक्त आहेत.

अकरावीसाठी तीन नियमित फेऱ्या झाल्या. त्यानंतर एक विशेष तसेच 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' ही फेरीही घेण्यात आली. प्रवेशासाठी अनेकदा मुदतवाढ दिली. मात्र, तरीही प्रवेशाच्या जागा रिक्तच आहेत. करोनामुळे विद्यार्थी, पालक आपापल्या मूळगावी स्थलांतरित झाल्याचे आढळून आले आहे. याबरोबर आयटीआय, विविध डिप्लोमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. नामांकित व सोयीच्या महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यामुळे प्रवेशाकडे पाठ फिरवली आहे.

प्रभात Mon, 08 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/65306

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

### अकरावी प्रवेशाबाबत लवकरच निर्णय

**पुणे :** अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया राबविणाऱ्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह अन्य पाच महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अद्यापही प्रवेशाच्या अनेक जागा रिक्त आहेत. त्यामुळे दिवाळीनंतरही प्रवेशाची प्रक्रिया राबवावी का? की प्रवेश प्रक्रिया आता थांबवावी, असा विचार वरिष्ठ पातळीवर होत आहे. या प्रवेश प्रक्रियेबाबत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे पुणे व पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती या महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी, एक प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) आणि एक विशेष एफसीएफएस फेरी अशा फेऱ्या राबविण्यात आल्या. तरी अद्याप अनेक महाविद्यालयांतील प्रवेशाच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे दिवाळीनंतरही ही प्रवेश प्रक्रिया सुरू ठेवावी की बंद करावी याबाबत सोमवारी (ता. ८) निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशाची प्रक्रिया अखेर कधी संपणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील ३१७ कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या एक लाख १३ हजार ३२५ जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या आणि काही कारणास्तव प्रवेश न घेऊ शकलेल्या दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना ३० ऑक्टोबरपर्यंत प्रवेशाची संधी देण्यात आली होती. ही प्रवेशाची शेवटची फेरी असेल, असे शिक्षण विभागाने यापूर्वीच सांगितले होते. मात्र, त्यानंतर या प्रवेश प्रक्रियेबाबत अद्याप कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे सध्या अकरावी प्रवेश प्रक्रिया बंद असली तरी प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांना पुन्हा संधी द्यावी का? याबाबत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक कार्यालयातील वरिष्ठ शिक्षणाधिकारी चर्चा करून निर्णय घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**आतापर्यंत झालेले प्रवेश**

| महापालिका क्षेत्र | कनिष्ठ महाविद्यालये | प्रवेशाच्या जागा | निश्चित झालेले प्रवेश | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| पुणे व पिंपरी-चिंचवड | ३१७ | १,१३,३२५ | ७३,६६२ | ३९,६६३ |
| मुंबई | ८३८ | ३,२१,६२० | २,३२,२६४ | ८९,३५६ |
| नागपूर | २१८ | ५९,१९५ | ३३,६३४ | २५,५६१ |
| नाशिक | ६० | २५,३८० | ११,१९० | ६,१९० |
| अमरावती | ६५ | १६,२३० | १०,३९९ | ५,८३१ |

Pune, Main
08/11/2021 Page No. 4

Sakaal 8.11.2021

लोकमत

### एमआयएल अभ्यासक्रमाबाबत महाविद्यालयांमध्ये गोंधळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी कौशल्यावर आधारित मॉडर्न इंडियन लॅग्वेज (एमआयएल) क्रेडिट कोर्स बंधनकारक केला आहे. मात्र, विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम कोणामार्फत शिकवावा, याबाबत विद्यापीठाने ठोस मार्गदर्शन न केल्यामुळे महाविद्यालयांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.



**विद्यापीठ प्रशासनाकडे** विचारणा केल्यानंतर ठोस उत्तर मिळत नसल्याचे काही प्राचार्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यावर प्रश्न उपस्थित केला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांना काही अभ्यासक्रम शिकवणे बंधनकारक असते. त्यातच दोन वर्षांपासून पदव्युत्तर पदवीनंतर पदवी अभ्यासक्रमासाठी सुद्धा क्रेडिट सिस्टीम सुरू झाल्यामुळे विद्यापीठाने नवनवीन क्रेडिट कोर्स सुरू केले आहेत. तसेच सर्व महाविद्यालयांनी हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकवावेत, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

कोरोना काळात बहुतांश महाविद्यालयांना एमआयएल अभ्यासक्रम शिकवण्यासाठी तडजोड करावी लागली. शहरातील नामांकित महाविद्यालयांनी सत्र समाप्ती पूर्वी काही दिवस आधी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने हा अभ्यासक्रम शिकवला. विद्यापीठाकडून काही अभ्यासक्रम बंधनकारक केले जातात. परंतु, हा अभ्यासक्रम अनुदानित शिक्षकांनी शिकवावा किंवा विना अनुदानित शिक्षकांची त्यासाठी स्वतंत्र नियुक्ती करावी, याबाबत कोणतीही स्पष्टता विद्यापीठाने दिलेली नाही. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

Hello Pune
Page No. 1 Nov 08, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

**लोकमत**

# अकरावी प्रवेशाचा तिढा संपता संपेना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, दिवाळीनंतरही प्रवेश प्रक्रिया सुरू ठेवावी की बंद करावी, याबाबत येत्या सोमवारी (दि. ८) निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशाचे 'गुन्हाळ' केव्हा संपणार , असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील तीनशेहून अधिक कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या १ लाख १३ हजार २८५ जागांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व काही कारणास्तव प्रवेश न घेऊ शकलेल्या दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना ३० ऑक्टोबरपर्यंत प्रवेशाची संधी देण्यात आली होती. त्यानंतर शिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही घोषणा केली नाही. अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात आलेल्या फेऱ्यांमधून आतापर्यंत ७३ हजार ६६२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, तर ३९ हजार ६२३ जागा अजूनही रिक्त आहेत. अकरावीत प्रवेश मिळूनही तब्बल ९ हजार ६६९ विद्यार्थ्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच सर्वसाधारणपणे दिवाळीपूर्वी पहिले सत्र संपते

Hello Pune
Page No. 1 Nov 08, 2021
Powered by: erelego.com

**सामना**

# अकरावी प्रवेशासाठी ३९ हजार जागा रिक्त

पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) - इयत्ता अकरावी प्रवेशासाठी पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ३१७ कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या एक लाख १३ हजार ३२५ जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. ३९ हजार ६६३ जागा अद्याप रिक्त आहेत.

पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या आणि काही कारणास्तव प्रवेश न घेऊ शकलेल्या दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना ३० ऑक्टोबरपर्यंत प्रवेशाची संधी देण्यात आली होती. ही प्रवेशाची शेवटची फेरी असेल, असे शिक्षण विभागातर्फे यापूर्वीच सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतर या प्रवेश प्रक्रियेबाबत अद्याप कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही.

कोरोनामुळे विद्यार्थी, पालक आपापल्या मूळगावी स्थलांतरित झाल्याचे आढळून आले आहे. याबरोबर आयटीआय, विविध डिप्लोमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. नामांकित व सोयीच्या महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यामुळे प्रवेशाकडे पाठ फिरवली आहे.

### अकरावी प्रवेश प्रक्रियेंतर्गत आतापर्यंत झालेले प्रवेश

- **महापालिका क्षेत्र : कनिष्ठ महाविद्यालये प्रवेशाच्या जागा : निश्चित झालेले प्रवेश : रिक्त जागा**
- **पुणे व पिंपरी-चिंचवड:** ३१७ : १,१३,३२५ : ७३,६६२ : ३९,६६३
- **मुंबई :** ८३८ : ३,२१,६२० : २,३२,२६४ : ८९,३५६
- **नागपूर :** २१८:५९,१९५ : ३३,६३४ : २५,५६१
- **नाशिक:** ६०: २५,३८०: १९,२९० :६,१९०
- **अमरावती :** ६५: १६, २३०: १०,३९९: ५,८३१.

Pune Edition
Nov 9, 2021 Page No. 3

# अकरावी प्रवेश प्रक्रिया संपता संपेना...

## आणखी एक फेरी राबवली जाण्याची शक्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** दिवाळी होऊनही राज्यातील अकरावीच्या प्रवेश प्रक्रिया संपत नसल्याचे चित्र आहे. अकरावी प्रवेश प्रक्रियेत पाच फेऱ्यांनंतरही काही विद्यार्थ्यांचे प्रवेश बाकी असल्याने या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आणखी एक फेरी राबवली जाण्याची शक्यता आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) या फेऱ्या झाल्या आहेत. बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन महाविद्यालयात प्रत्यक्ष वर्गही सुरू झाले आहेत. मात्र काही विद्यार्थ्यांना प्रवेश घेता आला नसल्याने २४ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी राबवण्यात आली होती. या प्रवेश फेरीच्या परिपत्रकामध्ये प्रवेशासाठीची शेवटची संधी असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र अजूनही काही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नसल्याने आणखी एक प्रवेश फेरी होण्याची शक्यता आहे.

काही विद्यार्थ्यांचे अद्यापही प्रवेश झाले नसल्याने प्रवेश फेरीबाबत विचारणा करण्यात येत आहे. त्यामुळे दिवाळीच्या सुटीनंतर पुन्हा एक प्रवेश फेरी राबवली जाण्याची शक्यता आहे. त्याबाबतची माहिती परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येईल, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

### ३९ हजार ६२३ जागा अद्यापही रिक्तच



पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात यंदा अकरावीच्या प्रवेशासाठी १ लाख १३ हजार २८५ जागा उपलब्ध आहेत. आतापर्यंत झालेल्या फेऱ्यांमध्ये ७३ हजार ६६२ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. तर ३९ हजार ६२३ जागा अजूनही रिक्त असल्याचे अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावरील आकडेवारीवरून दिसून येत आहे.

लोकसत्ता Tue, 09 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64231906

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

## महाविद्यालयीन परीक्षा ऑनलाइन व्हाव्यात : युक्रांद

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ८** - करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असून, यापुढे आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत असलेल्या महाविद्यालयीन परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा विचार सुरू आहे. मात्र, करोनाच्या पार्श्वभूमीवर हिवाळी सत्राचा अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने शिकविण्यात आला आहे. त्यावर ऑफलाइनद्वारे परीक्षा घेणे योग्य राहणार नाही. त्यामुळे किमान हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी संघटनांतून होत आहे.

यापुढील परीक्षा प्रत्यक्ष अर्थात ऑफलाइन पद्धतीने घेण्याबाबत विद्यापीठ विचारात असल्याचे दिसून येत आहे. परंतु ज्या सत्रातील अध्ययन ऑनलाइनद्वारे शिकविण्यात आले. त्याची परीक्षाही ऑनलाइन पद्धतीने व्हावी, अशी मागणी युक्रांद संघटनेचे शहर उपाध्यक्ष कमलाकर शेटे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे केली आहे. पुढील सत्राचा अभ्यासक्रम ऑफलाइन पद्धतीने शिकविला जाईल. त्यावर ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यास विद्यार्थ्यांची हरकत नाही. तसेच संघटनेने गूगल फॉर्मद्वारे सध्याची होणारी परीक्षा ऑनलाइन, की ऑफलाइन घेण्यात यावी याबाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेतली. त्यात केवळ १० तासांत ११,००० विद्यार्थ्यांनी मत नोंदविले. ९३.०४ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर ०६.०६ टक्के विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा घेण्याबाबत मत नोंदविले आहे.

प्रभात Tue, 09 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64231151

लोकमत

## परीक्षा दोन्ही पद्धतीने घ्या

**पुणे :** सध्या कोरोना रुग्णसंख्या कमी झाल्याने ऑफलाईन पद्धतीने महाविद्यालयीन वर्ग सुरू होत आहेत. त्यामुळे परीक्षासुद्धा ऑफलाईन पद्धतीने होणार असल्याचे दिसत आहे; परंतु ज्या सत्राचा अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने शिकविला आहे, त्यावर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेऊ नये, तर ऑनलाईन पद्धतीनेच परीक्षा घ्याव्यात, अशी मागणी युवक क्रांती दलाच्या वतीने करण्यात आली.

कोरोनाकाळात सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षांचा सराव झाला आहे. परिणामी, सध्या हिवाळी सत्राची परीक्षा ऑनलाईन पद्धतीनेच घ्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात असल्याचे गुगल फॉर्मद्वारे घेतलेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. सध्याची होणारी परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईन घ्यावी, असे सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे हिवाळी परीक्षांसाठी विद्यापीठाने ऑनलाईन व ऑफलाईन हे दोन्हीही पर्याय उपलब्ध करून द्यावेत, या मागणीचे निवेदन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांना युवक क्रांती दलाचे पुणे शहर उपाध्यक्ष कमलाकर शेटे यांनी दिले आहे.

Hello Pune
Page No. 3 Nov 09, 2021
Powered by: erelego.com

पुढारी

## अकरावी प्रवेशाचे गुऱ्हाळ संपता संपेना

### महाविद्यालये सुरू झाल्यानंतर रिक्त जागांवर प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरात अकरावी प्रवेशासाठी अजूनही ३९ हजार ६६३ जागा रिक्त आहेत, तर काही विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी विचारणा झाली आहे. त्यामुळे ११ नोव्हेंबरला महाविद्यालये सुरू झाल्यानंतर अकरावी प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यासाठीच्या सूचना एक ते दोन दिवसांत जाहीर केल्या जाणार आहेत, अशी माहिती उपसंचालक कार्यालयातून देण्यात आली. त्यामुळे द्वितीय सत्र सुरू झाले, तरी अकरावी प्रवेशाचे गुऱ्हाळ संपत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.




राज्यात अकरावी प्रवेशाची शेवटची फेरी राबविण्यात आल्याचे माध्यमिक शिक्षण संचालनालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्याअगोदर तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) या फेऱ्या झाल्या आहेत. झालेल्या फेऱ्यांच्या आकडेवारीनुसार अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे शहरांमध्ये प्रवेशासाठी १ हजार ४९७ महाविद्यालये उपलब्ध आहेत. या महाविद्यालयांमध्ये ५ लाख ३५ हजार ७१० जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध जागांपैकी केवळ ३ लाख ६४ हजार १३४ विद्यार्थ्यांनीच प्रवेश निश्चित केले आहेत, तर १ लाख ७१ हजार ५७६ जागा या प्रवेशासाठी उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुण्यात यंदा ३१७ महाविद्यालयांमध्ये १ लाख १३ हजार ३२५ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी ९० हजार ४५२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. आतापर्यंत झालेल्या प्रवेश प्रक्रियेत ७३ हजार ६६२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेले आहेत. तरीदेखील पुण्यात प्रवेशाच्या ३९ हजार ६६३ जागा रिक्त असल्याचे दिसून आले आहे. कोरोनामुळे झालेली आर्थिक हानी, ऑनलाईन शिक्षण, शैक्षणिक संस्थांचे न झेपणारे शैक्षणिक शुल्क, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शहरात शिक्षणासाठी येण्यास नकार यासह अन्य कारणांमुळे विद्यार्थी सध्या शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे दिसून येते. त्यामुळेच दहावीचा निकाल १०० टक्के लागूनही अकरावी प्रवेशासाठी प्रतिसाद नसल्याचे चित्र आहे.

Pune Edition
Nov 9, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

# ऑनलाइन प्रवेशाचा दोन दिवसांत निर्णय

पुणे, ता. ९ : राज्यात अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशासाठी रिक्त असणाऱ्या जागा, प्रवेशाच्या प्रक्रियेत अद्यापही कनिष्ठ महाविद्यालय मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेले विद्यार्थी याचा आढावा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे घेण्यात येत आहे. हा आढावा घेतल्यानंतर येत्या दोन दिवसांत अकरावी प्रवेशाची प्रक्रिया पुढे राबवावी की थांबवावी, याबाबत निर्णय होणार आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती या महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश देण्यासाठी केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. सध्या या महापालिका क्षेत्रातील एकूण एक हजार ४९८ कनिष्ठ महाविद्यालयांतील तब्बल एक लाख ६६ हजार ६०१ जागा रिक्त आहेत. त्याशिवाय काही विद्यार्थी अद्यापही प्रवेशापासून वंचित असल्याची शक्यता आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश मिळावा आणि प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत ही प्रवेश प्रक्रिया राबविली जावी, असा या प्रवेश प्रक्रियेचा मानस आहे. या पार्श्वभूमीवर प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्यास प्रवेशाची प्रक्रिया सुरू ठेवली जाण्याची शक्यता आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नागपूर, नाशिक आणि अमरावती येथील प्रवेश प्रक्रियेच्या सद्य:स्थितीचा आढावा घेण्यात येत आहे. यामध्ये रिक्त जागांचा तपशील, तसेच प्रतीक्षेत असणारे विद्यार्थी याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने मागविली आहे.




Pune, Main
10/11/2021 Page No. 4

Sakaal 10.11.2021

लोकमत

# प्राध्यापक भरतीला हिरवा कंदील

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील प्राध्यापकांची दोन हजार ८८ पदे भरण्यास राज्य शासनाकडून हिरवा कंदील मिळाला. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाचे प्राध्यापक संघटनेकडून अभिनंदन केले जात असले तरी शासनाने रिक्त असलेली सर्व पदे भरावीत, अशी अपेक्षाही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

> शासनाने घेतलेल्या निर्णयाचे प्राध्यापक संघटनेने स्वागत केले आहे. मात्र, आता याबाबतचा अध्यादेश काढून त्याची तात्काळ अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतही शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.
>
> **- डॉ. संदीप पाथ्रीकर, अध्यक्ष, नव प्राध्यापक संघटना**

> राज्य शासनाने २०१७ मधील स्थगिती दिलेल्या भरतीवरील बंदी उठवली आहे. शासनाने सकारात्मक निर्णय घेतला असला तरी सद्यस्थितीत रिक्त झालेली सर्व पदे भरण्याबाबत ठोस निर्णय घ्यावा. ही अपेक्षा.
>
> **- प्रा.एस.पी. लवांडे, सचिव, एम. फुक्टो**

राज्यातील प्राध्यापक पदाच्या रिक्त जागा भरण्यासाठी विविध प्राध्यापक संघटनेकडून उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर आंदोलने करण्यात आली. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनीही अनेकवेळा प्राध्यापक भरतीचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असे आश्वासन दिले. मात्र, वित्त विभागाकडून भरतीला परवानगी मिळत नसल्याने नेट-सेट व पीएच.डी. पात्रताधारकांकडून संताप व्यक्त केला जात होता. अखेर मंगळवारी उदय सामंत यांनी ट्विट करून प्राध्यापक भरतीचा प्रश्न मार्गी लागला असल्याचे स्पष्ट केले.

उच्च शिक्षण विभागाने रिक्त पदांपैकी ४० टक्के पदे भरण्यास मान्यता दिली होती. सुमारे तीन हजार ५८० पदे भरली जाणार होती. परंतु, त्यातील १४९२ पदे भरली. आता पुढील काळात उर्वरित दोन हजार ८८ पदे भरली जातील. मात्र, शासनाने सर्व पदे भरावीत, अशी अपेक्षा एम.फुक्टो या प्राध्यापक संघटनेकडून होत आहे.

Hello Pune
Page No. 1 Nov 10, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During November 2021*

**Section: Education**

## प्राध्यापकांची २ हजार ८८ पदे, प्राचार्यांच्या सर्व रिक्त पदांची भरती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यात प्राध्यापकांची २ हजार ८८ आणि प्राचार्यांच्या सर्व रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी त्याबाबत ट्विटद्वारे माहिती दिली आहे. प्राध्यापक भरतीसाठी सातत्याने आंदोलने करणाऱ्या पात्रताधारकांना या निर्णयामुळे दिलासा मिळाला असला, तरी भरती प्रक्रिया कधी सुरू होणार याबाबत स्पष्टता देण्यात आलेली नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याचे निर्देश देशभरातील विद्यापीठांना, महाविद्यालयांना देण्यात आले होते. त्यामुळे राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त असलेली प्राध्यापकांची पदे भरण्याची मागणी पात्रताधारकांकडून करण्यात येत होती. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दोन वर्षांपूर्वी मंत्रिपद स्वीकारल्यानंतर सातत्याने प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्याबाबत पात्रताधारकांच्या संघटनांना आश्वासने दिली होती. मात्र वित्त विभागाकडून मान्यता मिळत नसल्याने राज्यातील प्राध्यापक भरती रखडली होती. त्यामुळे घड्याळी तासिका तत्त्वावर काम करावे लागणाऱ्या नेट-सेट, पीएच.डी. धारकांमध्ये प्राध्यापक भरती कधी होणार याबाबत अस्वस्थता होती.

या पार्श्वभूमीवर प्राध्यापक भरतीच्या पहिल्या टप्प्यात २ हजार ८८ पदे आणि प्राचार्यांची सर्व पदे भरण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती सामंत यांनी दिली. प्राध्यापकांच्या सर्व रिक्त पदांवर भरती करण्यासाठी पात्रताधारकांच्या संघटनांनी पुण्यासह राज्यभरात वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलने केली. आता प्राध्यापक भरतीच्या पहिल्या टप्प्यात २ हजार ८८ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली असली, तरी प्राध्यापक आणि प्राचार्यांच्या भरतीची प्रक्रिया कधीपासून सुरू होणार याबाबत स्पष्टता नसल्याने एकूण भरती प्रक्रियेबाबत साशंकताच असल्याचे चित्र आहे.

एसटी स्थानकातन खासगी बसची वाहतक दोन वर्षांनंतर राज्य मराठी

लोकसत्ता Wed, 10 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64242468

लोकमत

## २ हजार ८८ प्राध्यापकांच्या भरतीला मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेल्या विविध विषयांच्या प्राध्यापकांची २ हजार ८८ पदे आणि प्राचार्यांची पदे भरण्यास मान्यता मिळाल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी जाहीर केले.

वरिष्ठ महाविद्यालयातील विविध विषयांची रिक्त पदे भरण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखालील बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील २ हजार ८८ पदे भरली जाणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विषयनिहाय आरक्षण धोरणानुसार भरती प्रक्रिया राबविल्यास मागास प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होण्याची भीती काही घटकांकडून व्यक्त केली जात आहे.

पदभरतीचा वाद न्यायालयात जाण्याची शक्यता काही दिवसांपूर्वीच मंत्री उदय सामंत यांनी अकृषी विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयातील शिक्षकीय भरतीत प्राध्यापक संवर्ग आरक्षण कायदा २०१९च्या अंमलबजावणीबाबत इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांची भेट घेऊन चर्चा केली होती. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी जाहीर केलेली पदभरतीसुद्धा न्यायालयात पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

Pune Main
Page No. 7 Nov 10, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# १२ हजार २२९ विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातच लसीकरण



| पुणे विभागातील लसीकरणाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| लसीकरण | पुणे | अहमदनगर | नाशिक | एकूण |
| पहिला डोस | ४२०३ | १९६९ | २३२९ | ८५०१ |
| दुसरा डोस | १८९६ | ७७८ | १०५४ | ३७२८ |
| एकूण | ६०९९ | २७४७ | ३३८३ | १२२२९ |

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ९ -** राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व आरोग्य विभाग यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या मिशन युवा स्वास्थ्य अभियानाअंतर्गत पुणे विभागातील विद्यापीठ, वरिष्ठ महाविद्यालयातील तब्बल १२ हजार २२९ विद्यार्थ्यांनी करोना प्रतिबंधात्मक लसीकरण करून घेतले.

करोनाचा प्रसार काहीसा आटोक्यात आल्यामुळे २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू झाली. लसीकरणाचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात उपस्थित राहता येणार आहे. यामुळे

शासनाने २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांचे अधिकाधिक लसीकरण व्हावे यादृष्टीने मिशन युवा स्वास्थ्य अभियान राबविण्यात आले. पुणे विभागाअंतर्गत पुणे, अहमदनगर, नाशिक या तीन जिल्ह्यांतील २ लाख १७ हजार विद्यार्थ्यांची लसीकरणाबाबत माहिती जमा झाली होती. त्यात २८ हजार विद्यार्थी एकही डोस न घेतल्याचे आढळून आले. उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, पुणे विभागीय उच्च शिक्षण संचालक डॉ. किरणकुमार बोंदर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरणाचे अभियान राबविण्यात आले. यात पुणे जिल्ह्यात एकूण ६ हजार ९९ विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घेतले. अहमदनगर जिल्ह्यात २ हजार ७४७ तर नाशिकमध्ये ३ हजार ३८३ विद्यार्थ्यांनी लसीकरण करुन घेतले आहे. पहिला डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ८ हजार ५०१ एवढी आहे तगर दुसरा डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३ हजार ७२८ एवढी आहे.

प्रभात Wed, 10 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64246572

# परीक्षा पद्धतीबाबत डिसेंबरमध्ये निर्णय

## सर्वेक्षणात ऑनलाइन परीक्षेला ९३.४ टक्के विद्यार्थ्यांची पसंती

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** महाविद्यालये प्रत्यक्ष पद्धतीने सुरू झाल्यानंतर आता परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन याची चर्चा जोर धरू लागली आहे. युवक क्रांती दलाने घेतलेल्या सर्वेक्षणात ९३.४ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे. मात्र परीक्षा पद्धतीबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून डिसेंबरमध्ये निर्णय घेतला जाणार आहे.

करोना काळात विद्यापीठांकडून ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्या. मात्र बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न (एमसीक्यू) स्वरुपाच्या परीक्षांमुळे निकालांनी भरारी घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे एकूणच परीक्षेच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. करोना संसर्ग नियंत्रणात आल्यामुळे राज्यातील महाविद्यालये ऑफलाइन पद्धतीने सुरू करण्यात आल्याने आता पुन्हा परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन याबाबतची चर्चा सुरू झाली आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनीही महाविद्यालये सुरू झाल्याने ऑफलाइन परीक्षांना प्राधान्य देण्याची भूमिका मांडली होती. हिवाळी सत्राच्या परीक्षा पद्धतीबाबत विद्यार्थ्यांचे मत जाणून घेण्यासाठी घेतलेल्या ऑनलाइन सर्वेक्षणात सहभागी २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपैकी ९३.४ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षांकडे, तर ६.६ टक्के विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षांकडे कल नोंदवला आहे. अध्यापन ऑनलाइन पद्धतीने झाल्याने परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र परीक्षेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन्ही पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे युक्रांदचे शहर उपाध्यक्ष कमलाकर शेटे यांनी सांगितले.

> “ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत विद्यार्थी मागणी करत आहेत. मात्र विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक डिसेंबरमध्ये होणार आहे. परीक्षा पद्धतीबाबत उच्च शिक्षण विभागाशी चर्चा करून आणि त्यावेळच्या करोना रुग्णसंख्येचा आढावा घेऊन निर्णय घेण्यात येईल.
>
> – डॉ. एन. एस. उमराणी, प्र कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Wed, 10 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64240438

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

पुढारी

### प्राध्यापकांची २,०८८, प्राचार्यांची ३७० पदे भरणार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ३७० प्राचार्य व २ हजार ८८ सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी राज्याच्या उच्चस्तरीय सचिव समितीने एकूण ४ हजार ७३८ पदांना मान्यता दिली होती. त्यापैकी १ हजार ६७४ पदे भरण्यात आली. कोरोनामुळे दीड ते दोन वर्षांपासून भरतीवर राज्य शासनाने निर्बंध घातले होते. आजपर्यंतच्या ३७० प्राचार्यांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे. तसेच त्याबाबतची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. १ ऑक्टोबर २०२० च्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या आधारे सहायक पान ६ वर

Pune Edition
Nov 11, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

### ...प्राचार्यांची ३७० पदे भरणार

प्राध्यापकांची २ हजार ८८ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली उमेदवारांची नियुक्ती सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात करण्यात येईल.

२३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत नियुक्त बिग सेट अध्यापकांची सेवा खंडित न करता सेवानिवृत्तीपर्यंत सुरू ठेवण्यात आ आहेत. उच्च न्यायालयाने आदेशानुसार या कालावधीत नियुक्त बिगर ने अध्यापकांना त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राह्य धरून तत्कालीन प्र धोरणानुसार जुनी सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबतचा २९ ऑक्टोबर २०२१ निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे सर्वसाधारण ४ हजार १३३ अध्याप जुन्या सेवानिवृत्ती योजनेचा लाभ झाला असल्याचेही सामंत यांनी सांगितले

पुढारी

# परीक्षा ऑनलाइन हवी अन् ऑफलाइनही घ्या

## सर्वेक्षणानंतर युक्रांद संघटनेची मागणी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाविद्यालये प्रत्यक्ष पद्धतीने सुरू झाल्यानंतर आता परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन याची चर्चा जोर धरू लागली आहे.

युक्रांद संघटनेने घेतलेल्या सर्वेक्षणात ९३.४ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेला पसंती दिली आहे. तर उर्वरित विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षेची मागणी केली आहे. त्यामुळे विद्यापीठाची परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने घ्यावी अशी मागणी युक्रांद संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

कोरोना काळात विद्यापीठांकडून ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्या. मात्र बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न (एमसीक्यू) स्वरूपाच्या परीक्षांमुळे निकालांनी भरारी घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे एकूणच परीक्षेच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले. कोरोना संसर्ग नियंत्रणात आल्यामुळे राज्यातील महाविद्यालये ऑफलाइन पद्धतीने सुरू करण्यात आल्याने आता पुन्हा परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन याबाबतची चर्चा सुरू झाली आहे.

काही दिवसांपूर्वी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनीही महाविद्यालये सुरू झाल्याने ऑफलाइन परीक्षांना प्राधान्य देण्याची भूमिका मांडली होती. यासंदर्भात युक्रांद संघटनेचे उपाध्यक्ष कमलाकर शेटे म्हणाले, विद्यार्थ्यांचे मत जाणून घेण्यासाठी गूगल फॉर्मद्वारे सध्याची होणारी परीक्षा ऑनलाइन की ऑफलाईन घेण्यात यावी याबाबत माहिती घेतली.

यामध्ये २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी मत नोंदविले आहे यामध्ये ९३.०६ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा घ्यावी याबाबत मत नोंदविले आहे, तर ०६.०४ टक्के विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्याबाबत मत नोंदविले आहे.

- ऑनलाइन परीक्षेला ९३.४ टक्के विद्यार्थ्यांची पसंती
- उर्वरित विद्यार्थ्यांची ऑफलाइन परीक्षेची मागणी



My Pune Edition
Nov 11, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थ्यांना अंशतः शुल्क परतावा

**पुणे :** करोना प्रादुर्भावामुळे दहावी आणि बारावीची परीक्षा गेल्या वर्षी रद्द करण्यात आली. या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा अंशतः परतावा करण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला असून, दहावीच्या विद्यार्थ्यांना ५९ रुपये आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना ९४ रुपये परत करण्यात येणार आहेत. त्यासाठी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचा तपशील सादर करण्याची सूचना केली आहे.

राज्य मंडळाकडून फेब्रुवारी-मार्चमध्ये बारावीची आणि मार्च-एप्रिलमध्ये दहावीची परीक्षा घेतली जाते. मात्र २०२१ची परीक्षा करोनाच्या प्रादुर्भावामुळे रद्द करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. मात्र त्यापूर्वीच विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज करून परीक्षा शुल्क भरले होते. परीक्षा न झाल्याने विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करण्याची मागणी करण्यात येत होती. तसेच शुल्क परताव्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती.

> गेल्या वर्षी राज्य मंडळाकडून प्रश्नपत्रिका तयार करून त्यांची छपाई, प्रश्नपत्रिका विभागीय मंडळाकडे पोहोचवणे, तर उत्तरपत्रिका परीक्षा केंद्रांवर पोहोचवणे आदी सर्व व्यवस्था झाली होती. तसेच अकरावीच्या प्रवेशासाठीच्या सीईटीचीही तयारी करण्यात आली होती. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात आल्या, प्रमाणपत्रेही दिली जाणार आहेत. त्यामुळे या सर्व व्यवस्थेसाठी केलेला खर्च वजा जाता विद्यार्थ्यांना परतावा दिला जाईल.
>
> – शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य मंडळ

शाळांनी दहावीच्या विद्यार्थ्यांची माहिती https://feerefund.mh-ssc.ac.in या दुव्याद्वारे आणि शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांनी बारावीच्या विद्यार्थ्यांची माहिती https://feerefund.mh-hsc.ac.in या दुव्याद्वारे भरणे आवश्यक आहे.

लोकसत्ता Fri, 12 November 2021 https://epaper.loksatta.com/c/

लोकमत

# परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थ्यांना शुल्क परत

## दहावी-बारावीच्या परीक्षा : शाळांकडून विद्यार्थ्यांना रकमेचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोना काळात इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. त्यामुळे परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून आकारण्यात आलेले शुल्क परत द्यावे, अशी मागणी करण्यात आली. त्यानुसार राज्य मंडळाने परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला अंशतः शुल्क परतावा देण्याचा निर्णय घेतला आहे. कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना येत्या १२ नोव्हेंबरपासून विद्यार्थ्यांचा तपशील नोंदवता येणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनातर्फे २०२१ मधील दहावी-बारावीच्या मुख्य परीक्षा रद्द करण्यात आल्या. दहावीच्या परीक्षेसाठी राज्यातील तब्बल १३ लाख ८० हजार विद्यार्थ्यांनी तर बारावीच्या परीक्षेसाठी १६ लाख ५८ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती; परंतु कोरोनामुळे परीक्षा न घेता निकाल जाहीर करण्यात आला. मात्र, निकाल तयार करण्यासाठी व अकरावी प्रवेशाच्या सीईटीसाठी राज्य मंडळाकडून ऑनलाइन यंत्रणा उभी करण्यात आली. त्यासाठी झालेला खर्च वजा करून उर्वरित रक्कम न्यायालयाच्या आदेशानुसार परत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५९ रुपये, तर बारावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ९४ रुपये परत दिले जाणार आहेत. दहावीच्या विद्यार्थ्यांकडून अकरावी सीईटीसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात आले नव्हते. त्यामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांच्या ९४ रुपये शुल्कातून सीईटीचे ३५ रुपये शुल्क वजा करून त्यांना ५९ रुपये दिले जाणार आहेत. त्यासाठी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना राज्य मंडळातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या लिंक व पात्र विद्यार्थ्यांची निश्चिती करावी लागणार आहे. त्यानंतर राज्य मंडळातर्फे संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडे विद्यार्थ्यांचे शुल्क जमा केले जाईल.

### राज्य मंडळाला तब्बल २२ कोटींचा तोटा

दहावी बारावीच्या परीक्षा रद्द झाल्याने राज्य मंडळाला दहावीच्या एकूण विद्यार्थ्यांना तब्बल १ कोटी ७८ लाख २२ हजार रुपये तर बारावीच्या एकूण विद्यार्थ्यांना तब्बल १२ कोटी १७ लाख २० हजार रुपये शुल्क परतावा द्यावा लागणार आहे. त्यामुळे परीक्षा रद्द झाल्याने मंडळाला तब्बल २२ कोटींचा तोटा झाला असल्याचे दिसून येत आहे.



Hello Pune
Page No. 3 Nov 12, 2021
Powered by: erelego.com

# बारावी परीक्षेसाठी ऑनलाइन नोंदणी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी १२ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर दरम्यान विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज नियमित शुल्काद्वारे ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. त्यात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना १२ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान, तर व्यवसाय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, खासगी विद्यार्थी यांना ३ डिसेंबर ते ११ डिसेंबर दरम्यान अर्ज भरता येईल.

परीक्षा अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरले जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी शाळा-कनिष्ठ महाविद्यालयामार्फत परीक्षा अर्ज भरणे आवश्यक आहे. सरल प्रणालीद्वारे नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरले जातील. कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरून घेतल्यानंतर त्यांना कॉलेज लॉगिनवर प्रीलिस्ट उपलब्ध करून दिलेली असेल

लोकसत्ता Fri, 12 November 2021 https://epaper.loksatta.com/c/64292362

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

## दहावी, बारावी परीक्षांसाठी आजपासून भरा अर्ज

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ११ -** राज्य शिक्षण मंडळामार्फत २०२२ मध्ये होणाऱ्या दहावी व बारावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून शुक्रवारपासून (दि.१२) ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहे. नियमित शुल्कासह दि. १२ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर आणि विलंब शुल्कासह दि. १३ ते २० डिसेंबर अशी अर्जासाठी मुदत देण्यात आली आहे.

**www. mahahsscboard.in या वेबसाइटवर भरा अर्ज**

यंदाच्या शैक्षणिक वर्षातील दहावी व बारावी परीक्षेस नियमित, फेरपरीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र, प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करावयाचा आहे. याची सविस्तर माहिती बोर्डाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज भरणे आवश्यक आहे.

नियमित विद्यार्थ्यांनी दि. १२ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत अर्ज करावे लागतील. तर अन्य विद्यार्थ्यांना ३ ते ११ डिसेंबर या मुदतीत परीक्षा अर्ज करणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी १२ नोव्हेंबर ते २३ डिसेंबर या मुदतीत बँकेत जमा करणे आवश्यक असल्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नमूद केले आहे.

प्रभात Fri, 12 November 2021 https://epaper.eprabhat.n

सकाळ

## दहावीच्या विद्यार्थ्यांना शुल्काचा अंशतः परतावा

**नाशिक :** दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काच्या रकमेचा परतावा अंशतः करण्यात येणार आहे. दहावीसाठी http://feerefund.mh-ssc.ac.in, तर बारावीसाठी http://feerefund.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरून माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचा तपशील पाठवावा. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी शुक्रवारपासून (ता. १२) बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज भरता येईल.

Pune, Main
12/11/2021 Page No. 4

## दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ११ -** करोना प्रादुर्भावामुळे राज्य शिक्षण मंडळाच्या २०२१ मधील दहावी व बारावीची मुख्य परीक्षा रद्द करण्यात आली. या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा परतावा करण्यात येणार आहे. त्यासाठी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून राज्य शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांचा तपशील मागवला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत इयत्ता दहावी व बारावीची मुख्य लेखी परीक्षा घेतली जाते. सन २०२१ मध्ये ही परीक्षा करोनाच्या संकटामुळे रद्द करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. (पान २ पहा) ▶▶

प्रभात Fri, 12 November 20 https://epaper.epra

## दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा...

मात्र, त्यापूर्वीच विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज केले होते आणि परीक्षा शुल्कही भरले होते. परंतु परीक्षा न झाल्याने विद्यार्थ्यांनी भरलेली परीक्षा शुल्क परत मिळावी, अशी मागणी शिक्षण घटकांतून होत होती. तर, काही जणांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावेळी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क अंशत: परत करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर आता बोर्डाकडून त्याची अंमलबजावणी होत आहे. सन २०२१ मध्ये दहावी परीक्षेसाठी सुमारे १७ लाख, तर बारावीसाठी १५ लाख विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. या विद्यार्थ्यांकडून बोर्डाने सुमारे ४०० ते ५५० रुपये परीक्षा शुल्कापोटी घेतले आहेत. दहावीची जवळपास ८० कोटी, तर बारावीची ७० कोटी रुपये परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांच्या तपशिलासाठी उद्यापासून लिंक सुरू**

दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा तपशील भरण्यासाठी बोर्डाकडून लिंक दि.१२ रोजी सकाळी ११ वाजेपासून खुली करण्यात येणार आहे. बोर्डाच्या mahahsscboard.in संकेतस्थळावरील लिंकवरून विद्यार्थ्यांनी तपशील नोंदविणे आवश्यक आहे, अशी माहिती राज्य शिक्षण मंडळाकडून देण्यात आली.

प्रभात Fri, 12 November 2021 https://epaper.eprabhat.net

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

## 'महाराष्ट्रातील पाणीपुरवठा' विद्यापीठाकडून पुनर्प्रकाशित



पुणे, दि. ११ - महाराष्ट्रातील पाऊस, पाणी, जमीन, नद्या असा सर्वांगीण शास्त्रशुद्ध अभ्यास मांडणारे नरहर आपटे यांचे 'महाराष्ट्रांतील पाणीपुरवठा' हे पुस्तक लवकरच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पुनर्प्रकाशित करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संजय चाकणे यांच्याकडे या पुस्तकाची प्रत मिळाली असून महाराष्ट्रातील पाण्याचा मूळ इतिहास, त्यामागे असणारे भूशास्त्र आणि विज्ञान असा परिपूर्ण अभ्यास या पुस्तकात मांडला आहे. त्यामुळेच कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, डॉ. संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रसेनजीत फडणवीस आदींनी हे पुस्तक पुनर्प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. विद्यापीठाच्या मुद्रणालयातून १९६० साली हे पुस्तक प्रकाशित केले होते. विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळाकडून हे पुस्तक लिहिण्याची सूचना नरहर आपटे यांना केली होती. त्यानुसार हे पुस्तक त्यावेळचे अनेक संशोधनपर अभ्यास, अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमधील अभ्यासाचे संदर्भ देत लिहिण्यात आले आहे.

> " महाराष्ट्रातील पाण्याबाबतची जवळपास संपूर्ण प्राथमिक माहिती या पुस्तकात आहे. भूगर्भशास्त्राचा प्राध्यापक म्हणून महाराष्ट्रातील ही अनेक वर्षे जुनी माहिती, संदर्भ लोकांसमोर यावे असे वाटते, म्हणून या पुस्तकाचे पुनर्प्रकाशन करण्याचा निर्णय घेतला आहे.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

प्रभात Fri, 12 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/6560

## 'सीएचबी' प्राध्यापकांना २५ टक्के वेतनवाढ

### मंत्री उदय सामंत यांची माहिती

पुणे : 'राज्यातील महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांच्या मानधनात २५ टक्के वाढ करण्यात आली आहे. ही वाढ तीन वर्षांच्या कालावधीसाठी असेल,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे.

सामंत म्हणाले, 'राज्य सरकारने उच्चशिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील शासकीय व अनुदानित महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदांसाठी सीएचबी तत्त्वावर कार्यरत असलेल्या प्राध्यापकांच्या मानधनाचे दर सुधारित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मानधनाच्या दरांत सर्वसाधारण २५ टक्के वाढ करण्यात आली असून, ही वाढ तीन वर्षांच्या कालावधीत करण्यात आलेली आहे. अशासकीय अनुदानित महाविद्यालयात २०१८-१९ मध्ये एकूण नऊ हजार ३३१, तर २०१९-२० मध्ये सात हजार २१२ प्राध्यापक कार्यरत होते.'

### 'एक लाख विद्यार्थ्यांचे लसीकरण'

'राज्य सरकारकडून २५ ऑक्टोबर ते दोन नोव्हेंबर या कालावधीत 'मिशन युवा स्वास्थ्य' उपक्रम राबविण्यात आला. उच्चशिक्षण विभागांतर्गत एकूण ८१ हजार ८८० विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले; तसेच तंत्र शिक्षण विभागांतर्गत एकूण २७ हजार ०३१ विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

Maharashtra Times 12.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

**Section: Education**

सामना

## बारावी बोर्डाच्या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यास सुरुवात

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) – राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२२ मध्ये घेतल्या जाणाऱ्या या परीक्षेसंदर्भात विभागातर्फे ही माहिती देण्यात आली आहे.

बारावी परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांतील नियमित विद्यार्थ्यांना सरल डेटाबेसच्या माध्यमातून २ डिसेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. त्यानंतर १३ डिसेंबरपर्यंत विलंब शुल्कासह अर्ज भरता येईल. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे नियमित विद्यार्थी, पुनरपरीक्षार्थी, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शाखेचे नियमित विद्यार्थी, पुनरपरीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले विद्यार्थी खासगी आणि तुरळक विषय घेऊन बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज प्रक्रिया ३ डिसेंबर ते ११ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. या विद्यार्थ्यांना २० डिसेंबर २०२१ संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विलंब शुल्कासह अर्ज करता येणार आहे. तसेच उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन डाऊनलोड करून शुल्क भरण्यासाठी १२ नोव्हेंबर ते २३ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी अर्ज भरून सबमिट केल्यानंतर त्यांना कॉलेज लॉगिनमधून प्रीलिस्ट उपलब्ध करून दिली जाईल. त्यानंतर विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती रजिस्टारसोबत पडताळण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

Pune Edition
Nov 13, 2021 Page No. 5
Powered by : eReleGo.com

## अकरावी प्रवेशासाठी आणखी एक अतिरिक्त फेरी

पुणे, दि. १२ - अकरावी प्रवेशासाठी आणखी एक अतिरिक्त फेरी घेण्यात येणार आहे. दि. १६ ते २२ नोव्हेंबर आणि २३ ते ३० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत अखेरची विशेष फेरी राबवण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी दिली.

अकरावी प्रवेशासाठी आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी, तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार दोन फेऱ्या झाल्या. यातून बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेले आहेत. तसेच अनेक महाविद्यालयांमधील अध्यापनाचे कामकाज, नियमित वर्ग सुरू झालेले आहेत. प्रथम सत्र समाप्त झालेले असून काही विद्यार्थी प्रवेश मिळण्यासाठी विनंती करत आहेत. त्यात साधारणपणे मुंबईतील १४५, पुण्यातील ३३, नाशिकमधील एक, अमरावतीमधील तीस आणि नागपूरमधील चौदा अशा एकूण २२३ विद्यार्थ्यांनी उपसंचालक कार्यालयाकडे प्रवेशासाठी विनंती केली. मात्र, प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते. प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळण्यासाठी कालावधी वाढवल्याचे पालकर यांनी सांगितले.

प्रभात Sat, 13 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64351

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# ...तर संशोधन केंद्राला 'टाळे'

## पीएचडी, एमफिलसाठी अतिरिक्त शुल्क वसुली

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिली तंबी**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** सावित्रीबाई फुले पुणे **विद्यापीठाने** पीएचडी व **एमफिल** अभ्यासक्रमासाठीचे **शुल्क** निश्चित केले आहे. मात्र, त्यापेक्षा अधिकचे शुल्क आकारण्यात येत असल्याची तक्रार प्राप्त होत आहे. अतिरिक्त शुल्क आकारल्यास संबंधित संशोधन केंद्र बंद करण्याची कारवाई केली जाणार असल्याची तंबी विद्यापीठाने दिली आहे.



विद्यापीठाने यापूर्वीच कोणत्या अभ्यासक्रमासाठी किती शुल्क निश्चित करण्यात आले आहे, त्याची सविस्तर माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून शुल्क घेणे संशोधन केंद्रांना बंधनकारक आहे. मात्र, पीएचडी व एफिल अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून जास्तीचे शुल्क आकारण्यात येत असल्याची तक्रारी विद्यार्थी संघटनांमार्फत होत आहे. संघटनेच्या तक्राराची दखल घेत विद्यापीठाने त्याबाबतचे शुक्रवारी परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे सर्व संशोधन केंद्रांना शुल्करचना निश्चित केली आहे. शुल्क रचनेनुसारच शुल्क आकारण्यात यावे. त्यापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संशोधन केंद्रावर कारवाई बडगा उगारावा लागेल, अशा इशारा विद्यापीठाने दिले आहे.

### रिक्त जागा माहिती अद्ययावतसाठी मुदतवाढ

विद्यापीठाच्या पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेल्या संशोधक मार्गदर्शकाकडून रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. ही सर्व माहिती दि. १८ नोव्हेंबरपर्यंत संबंधित संशोधन केंद्रामार्फत अद्ययावत करावी, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

प्रभात Sat, 13 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64312122

# राज्य मंडळाच्या परीक्षा काही वर्षांत ऑनलाइन?

## राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान मंचाची स्थापना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनाकाळात दहावी, बारावीच्या परीक्षा ऑनलाइन घेण्यास ठाम नकार देणाऱ्या शिक्षण मंडळाने भविष्यात ऑनलाइन परीक्षा घेण्याचा विचार सुरू केला आहे. परीक्षांसह विविध बाबींसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान मंच स्थापन करण्यात आला आहे.

शिक्षण विभागाची तंत्रज्ञानात्मक अपुरी तयारी करोनाकाळात समोर आली. आता हा विभाग ऑनलाइन पर्यायाचा विचार करत आहे. शिक्षण विभागाच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान मंचाची स्थापना करण्यात आली आहे. दहावी आणि बारावीच्या ऑनलाइन परीक्षा आणि मूल्यमापनासाठी यंत्रणा उभी करणे हा मंचाच्या अनेक हेतूंपैकी एक आहे. त्याशिवाय शिक्षकांचे प्रशिक्षण, प्रशासकीय कामकाज अशा विविध गोष्टींबाबत मंच अहवाल देणार आहे. मंत्री, अधिकारी आणि खासगी कंपन्यांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली ही अभ्यास समिती तीन वर्षे कार्यरत असेल.

### समितीत कोणत्या खासगी कंपन्या?

गूगल इंडिया, मायक्रोसॉफ्ट इंडिया, टीसीएस, इन्फोसिस, कॉग्निझंट, पर्सिस्टंट, डेल इंडिया, अमेझॉन, सीडॅक

### मंचाचे हेतू

- दहावी, बारावीच्या परीक्षा ऑनलाइन करून त्याचे मूल्यांकन करणे
- शिक्षकांचे मूल्यांकन करून गरजेनुसार प्रशिक्षण देणे
- अनुदेशन व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे
- शाळेच्या वर्गांपासून विविध कार्यालयांना माहिती तंत्रज्ञान सेवांशी जोडणे

लोकसत्ता Sat, 13 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64301535

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

### अकरावीच्या प्रवेशांसाठी आता आणखी एक फेरी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शैक्षणिक वर्षाचे पहिले सत्र संपल्यानंतरही अकरावी प्रवेशांसाठी आणखी एक फेरी राबवली जाणार आहे. २२३ विद्यार्थ्यांनी केलेल्या मागणीमुळे १६ ते २२ नोव्हेंबर आणि २३ ते ३० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत अखेरची विशेष फेरी राबवली जाणार आहे.

माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी अकरावीच्या विशेष फेरीबाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र, तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर या पाच महानगर क्षेत्रात अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. आतापर्यंत झालेल्या प्रक्रियेअंतर्गत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी, तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार दोन फेऱ्या झाल्या. या फेऱ्यांतून बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेले आहेत. तसेच अनेक महाविद्यालयांमधील अध्यापनाचे कामकाज, नियमित वर्ग सुरू झालेले आहेत. प्रथम सत्र समाप्त झालेले असून काही विद्यार्थी प्रवेश मिळण्यासाठी विनंती करत आहेत. त्यात साधारणपणे मुंबईतील १४५, पुण्यातील ३३, नाशिकमधील एक, अमरावतीमधील तीस आणि नागपूरमधील चौदा अशा एकूण २२३ विद्यार्थ्यांनी उपसंचालक कार्यालयाकडे प्रवेशासाठी विनंती केली आहे. मात्र प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी मिळण्यासाठी अकरावी प्रवेशाचा

लोकसत्ता Sat, 13 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64319235

### प्रवेशांसाठी शेवटची संधी

#### येत्या गुरुवारपासून होणार प्रक्रियेला सुरुवात; तीस नोव्हेंबरपर्यंत मुदत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावीसाठी अद्याप प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना १६ नोव्हेंबरपासुन आणखी एक संधी दिली जाणार आहे. अकरावीसाठी १६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या काळात प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर एक विशेष फेरी आयोजित करण्यात येणार आहे. याशिवाय २३ ते ३० नोव्हेंबर दरम्यान समुपदेशन फेरीचेही आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रिया ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

**वाढीव जागा कमी होणार का?**

दहावीच्या निकालात उत्तीर्णांचे प्रमाण वाढल्यावर, ज्युनिअर कॉलेजांना अकरावी प्रवेशासाठी तुकडीवाढ करून मिळते. त्यामुळे अकरावी प्रवेशाच्या जागा वाढतात. त्याचप्रमाणे दर वर्षी नव्या कॉलेजांना मान्यता मिळते. या परिस्थितीत अनेक कॉलेजांमध्ये वाढीव जागा शिल्लक राहतात. अशावेळी परिस्थितीनुसार वाढवलेल्या जागा कमी होणे गरजेचे असते. मात्र, तसे होत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जागा शिल्लक राहतात. उत्तीर्ण विद्यार्थी आणि अकरावीसाठी उपलब्ध जागा यांचे प्रमाण योग्य ठरवल्यास, कॉलेजांमध्ये रिक्त जागा राहणार नाहीत. शालेय शिक्षण विभागाने याबाबत कार्यवाही करून सातत्याने रिक्त राहणाऱ्या जागा कमी करण्याची आवश्यकता आहे.



| शहर | कॉलेजे | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| पुणे-पिंपरी | ३१७ | १,१३,२८५ | ७३,६६२ | ३९,६२३ |
| अमरावती | ६५ | १६,२३० | १०,३९९ | ५,८३१ |
| मुंबई | ८३८ | ३,२१,६२० | २,३२,२६४ | ८९,३५६ |
| नागपूर | २१८ | ५९,१९५ | ३३,६३४ | २५,५६१ |
| नाशिक | ५९ | २५,३८० | १९,१९० | ६,१९० |
| एकूण | १४९७ | ५,३५,७१० | ३,६९,१४९ | १,६६,५६१ |

"ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अकरावीसाठी प्रवेश घेतलेला नाही, त्यांच्यासाठी शेवटची संधी म्हणून ही विशेष फेरी राबवण्यात येणार आहे. ही फेरी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य आणि समुपदेशन पद्धतीने होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश घेतलेला नाही त्यांनी तातडीने प्रवेश घ्यावा.

– वर्षा गायकवाड, शालेय शिक्षण मंत्री

मिशन अॅडमिशन

दिवाळीपूर्वी शिक्षण विभागाने अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेशांची आणखी एक फेरी जाहीर केली. शुक्रवारी या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. १६ ते २२ नोव्हेंबर आणि २३ ते ३० नोव्हेंबर असे या फेरीचे दोन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश दिले जाणार असून, दुसऱ्या टप्प्यात समुपदेशन फेरी राबवण्यात येणार आहे. पुणे, मुंबई, नाशिक, अमरावती आणि नागपूर येथील दहावी उत्तीर्ण आणि अद्याप अकरावीला प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी शिक्षण विभागाकडे विनंती केल्याने पुन्हा एकदा फेरी राबवली जाईल, असे विभागाने स्पष्ट केले.

१६ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्जाचा पहिला आणि दुसरा भाग भरून रिक्त जागांवर प्रवेश घेता येणार आहे. २३ ते ३० नोव्हेंबरदरम्यान समुपदेशन करून आणि ऑनलाइन अर्ज भरून विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. दोन्ही टप्प्यांमध्ये ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश राहिले आहेत, त्यांनी तातडीने प्रवेश घ्यावा, असे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

Maharashtra Times 13.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

पुढारी

# विद्यार्थ्यांसाठी आता शैक्षणिक तंत्रज्ञान मंच

## ■ शालेय शिक्षणमंत्री अध्यक्षस्थानी ■ समितीमध्ये आयटी कंपन्यांतील तज्ज्ञ, अधिकाऱ्यांचा समावेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**शिक्षणात तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान मंचाची स्थापना करण्यात आली आहे. याअंतर्गत शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये नामांकित आयटी कंपन्यांच्या तज्ज्ञांसह शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जाहीर केला आहे.**




शिक्षण प्रणालीतील विविध विभाग, स्तर, लाभार्थी यांना योग्य गतीने हाताळण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी भूमिकेकडे दुर्लक्ष करणे शक्य नसल्याने सुयोग्य पद्धतीने त्याचा वापर करण्यास चालना देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शालेय शिक्षणातील विविध प्रणालींचे विकसन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) कार्यालयात राज्य तंत्रज्ञान मंचाची रचना करण्यात आली आहे. तंत्रज्ञान मंचाच्या समितीमध्ये शालेय शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये शालेय शिक्षण राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे प्रकल्प संचालक, एससीईआरटीचे संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे प्रधान सचिव, गुगल, मायक्रोसॉफ्ट, टीसीएस, कॉग्निझंट, पर्सिस्टंट, इन्फोसिस, डेल, अॅमेझॉन, सी-डॅक या तंत्रज्ञान संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

बदलत्या शैक्षणिक तंत्रज्ञानानुसार शालेय शिक्षणात बदल, सर्वसमावेशक प्रणाली विकसन, सर्व प्रणालींचे एकाच व्यासपीठावर एकत्रिकरण करण्यासाठी कमांड अँड कंट्रोल सेंटरची निर्मिती अशी समितीची कार्यकक्षा ठरवण्यात आली आहे. समितीच्या बैठका, भेटी, दौरे यांच्या खर्चासाठी बालभारतीमार्फत प्राप्त स्वामित्व धन (रॉयल्टी) रकमेतून खर्च करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

### मंच स्थापनेचा हेतू काय?

- विद्यार्थी, शिक्षकांचा शैक्षणिक जीवनक्रम उंचावणे
- शिक्षकांचे मूल्यांकन करून त्यांच्या सक्षमीकरणासाठी गरजांनुरूप प्रशिक्षण
- शिक्षकांच्या शिक्षणासाठी व्यवस्थापन प्रणाली
- दहावी-बारावीच्या परीक्षा ऑनलाइन करून मूल्यांकन
- शिक्षण विभागातील सर्व घटकांच्या समस्यांचे निराकरणासाठी मार्गदर्शक स्रोताची निर्मिती
- समाज जीवनात होणाऱ्या नवनवीन घडामोडींबद्दल अद्ययावत माहिती देणारे कार्यक्रम राबविणे
- शिक्षण प्रणालीस सुस्थिती देण्याची खात्री करणे

Pune Edition
Nov 13, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# अकरावी प्रवेशासाठी अखेरची विशेष फेरी

## पहिला टप्पा १६ ते २२ नोव्हेंबर; दुसरा टप्पा २३ ते ३० नोव्हेंबर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात अकरावी प्रवेशासाठी आता एक विशेष शेवटची फेरी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही फेरी दोन टप्प्यांत राबविण्यात येणार असून पहिला टप्पा १६ ते २२ नोव्हेंबरदरम्यान, तर दुसरा टप्पा २३ ते ३० नोव्हेंबरदरम्यान राबविण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक महेश पालकर यांनी परिपत्रकाच्या माध्यमातून दिली आहे.




राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर या पाच महानगर क्षेत्रात अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. संबंधित प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी, तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वानुसार दोन फेऱ्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. आतापर्यंत बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेले आहेत. तसेच अनेक महाविद्यालयांमधील अध्यापनाचे कामकाज, नियमित वर्ग सुरू झालेले आहेत. प्रथम सत्र समाप्त झालेले असून आणखीही काही विद्यार्थी प्रवेश मिळण्यासाठी विनंती करत आहेत. यामध्ये साधारणपणे मुंबई - १४५, पुणे-३३, नाशिक-१, अमरावती-३०, नागपूर-१४ अशा एकूण २२३ विद्यार्थ्यांनी उपसंचालक कार्यालयाकडे प्रवेशासाठी विनंती केलेली आहे. यामध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी आणखीही वाढू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, या हेतूने अकरावी प्रवेशाचा कालावधी वाढविण्याचा निर्णय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडून घेण्यात आला आहे.

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील ३१७ कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख १३ हजार ३२५ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत ७३ हजार ६६२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून अद्यापही ३९ हजार ६६३ जागा रिक्त

### प्रवेशासाठीचे सविस्तर वेळापत्रक

**पहिला टप्पा** : १६ ते २२ नोव्हेंबर - नाव नोंदणीपासून विद्यालयात प्रवेश घेण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया पार पाडणे.

**दुसरा टप्पा** : २३ ते ३० नोव्हेंबर - उपसंचालक कार्यालय स्तरावरून समुपदेशनाद्वारे विद्यार्थ्यांची नाव नोंदणीपासून विद्यालयात प्रवेश घेण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया पार पाडणे.

Pune Edition
Nov 13, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

पुढारी

# नियमबाह्य शुल्क घेतल्यास केंद्रच बंद

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उगारणार कारवाईचा बडगा



### १८ नोव्हेंबरपर्यंत रिक्त जागांची माहिती अद्ययावत करा

विद्यापीठाच्या पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेल्या संशोधक मार्गदर्शकाकडून रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. रिक्त जागांची माहिती येत्या १८ नोव्हेंबरपर्यंत संबंधित संशोधन केंद्रामार्फत अद्ययावत करावी, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत. मार्गदर्शकांनी रिक्त जागांची माहिती विद्यापीठाकडे दिल्यास, पीएचडी प्रवेशप्रक्रियेच्या जागांमध्ये वाढ होईल. त्यामुळे अधिक विद्यार्थ्यांना पीएचडी प्रवेशाला संधी मिळणार आहे. मात्र, मार्गदर्शक रिक्त जागांची माहिती पाठवित नाहीत. त्यामुळे विद्यापीठाला संबंधित रिक्त जागा कळविण्यासाठी वारंवार मुदतवाढ द्यावी लागते. याचा थेट परिणाम प्रवेशप्रक्रियेवर होत असल्याचे दिसून येत आहे.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांनी पीएचडी, एमफिल अभ्यासक्रमांसाठी ठरवेल्या शुल्कापेक्षा अधिक नियमबाह्य शुल्क आकारल्यास केंद्र बंद करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने दिला आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने वेबसाइटवर प्रसिद्ध केले आहे.

पुणे विद्यापीठाने पीएचडी व एमफिल अभ्यासक्रमासाठीचे शुल्क निश्चित केले आहे. याची माहिती विद्यापीठाने वेबसाईटवर प्रसिद्ध केली आहे. तरीदेखील पुणे विद्यापीठाशी संलग्न काही संशोधन केंद्रांकडून निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा जादा नियमबाह्य शुल्क घेण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत विद्यार्थी संघटनांकडून विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे तक्रारी करण्यात आल्या. या तक्रारींची दखल विद्यापीठ प्रशासनाने घेतली असून, सर्व संशोधन केंद्रासाठी शुल्क रचना निश्चित केली आहे. शुल्क रचनेनुसारच शुल्क आकारण्यात यावे. त्यापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संशोधन केंद्रावर कारवाईचा बडगा उगारावा लागेल, अशा इशारा विद्यापीठाने संशोधन केंद्रांना दिला आहे.

Pune Edition
Nov 13, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# लस न घेतलेले प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविणार

**औरंगाबाद : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील उच्चशिक्षण विभागाअंतर्गत लसीकरणाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे विद्यापीठासह विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या प्राध्यापक, कर्मचारी यांनी तत्काळ लस घ्यावी. अन्यथा त्यांना प्रथम नोटीस देण्यात येईल व त्यानंतर त्यांचे वेतन थांबवण्यात येईल, असा इशारा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय औरंगाबाद या उपक्रमांतर्गत राज्याचे मंत्री उदय सामंत व अधिकारी शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आले होते. कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, राज्यातील प्राचार्यांच्या रिक्त ३७० अन् प्राध्यापकांच्या २०८८ जागा पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी भरण्यात येतील. त्याशिवाय १३ अकृषी विद्यापीठातील ६५९ प्राध्यापकांच्या जागा भरण्यात येतील.

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचा इशारा

दरम्यान, शुक्रवारच्या बैठकीत त्यांनी अनुकंपा तत्त्वावर १० जणांना नोकरी देण्याचे आदेश दिले. ३१ वैद्यकीय देयक, १३ तात्पुरती सेवानिवृत्ती, डीसीपीएस वार्षिक विवरणपत्रे ९ अशा एकूण ६५ आदेशांचे वाटप करण्यात आले आहे. संत पीठात ७५ जणांनी प्रवेश घेतले आहेत. सहा महिन्यांत प्राध्यापकांची भरती होऊन ते रुजू होतील. प्राध्यापकांची भरती संवर्गनिहाय, विषयनिहाय की एमपीएससीमार्फत करावयाची याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेतील मंत्री गटाची समिती घेणार आहे.

Pune Edition
Nov 13, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

**लोकमत**

# पीएच.डी. प्रवेशासाठी वाढीव शुल्क आकारणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी प्रवेश प्रक्रिया राबविली जात असून, काही संलग्न संशोधन केंद्रांकडून वाढीव शुल्क आकारणी करून विद्यार्थ्यांची लूट केली जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नियमबाह्य शुल्क आकारल्यास संबंधित संशोधन केंद्र बंद केले जाईल, असा स्पष्ट इशारा विद्यापीठ प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

पुणे विद्यापीठातील विविध विभाग व विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांमध्ये पीएच.डी. प्रवेशासाठी ठराविक जागांसाठी ऑनलाईन पध्दतीने पीएच.डी.प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. विद्यापीठाने पीएच. डी. प्रवेशासाठी नियमावली तयार केली असून, प्रवेशाचे शुल्क निश्चित केले आहे.

विद्यापीठाने २०१६ मध्ये कला, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, विधी, व्यवस्थापनशास्त्र आदी शाखेचे पीएच.डी.चे वार्षिक शुल्क ५ हजार तर विज्ञान शाखेसाठी ७ हजार रुपये निश्चित केले.

तसेच अभियांत्रिकी व फार्मसी शाखेचे पीएच.डी.चे वार्षिक शुल्क ९ हजार निश्चित केले होते. मात्र, काही शैक्षणिक संस्थांकडून बेकायदेशीरपणे वाढीव शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत.त्यामुळे विद्यापीठाने याबाबत परिपत्रक प्रसिध्द केले आहे.

विद्यापीठाशी संलग्न संशोधन संस्थांनी विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्करचनेनुसारच शुल्क आकारणे अपेक्षित आहे.

त्यापेक्षा अधिकचे शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थेचे संशोधन केंद्र बंद करण्याबाबत कारवाई करण्यात येईल; याची संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांनी नोंद घ्यावी, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.



### गाईडबाबत अंतिम निर्णय नाही...

- पीएच.डी प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या मार्गदर्शकाकडे (गाईड) प्रवेश द्यावा, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.
- त्यामुळे यावर्षाची पीएच. डी. प्रवेश प्रक्रिया रखडली आहे.
- विद्यापीठाने याबाबत लवकर निर्णय घेऊन प्रवेश प्रक्रिया सुरु करावी,अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.

Hello Pune
Page No. 8 Nov 14, 2021
Powered by: erelego.com

# परीक्षा शुल्क परताव्याची रक्कम ₹ २३ कोटी

**दहावीसाठी प्रत्येकी ₹ ६९; बारावीसाठी ₹ ९४ देणार**

**म. टा. प्रतिनिधी**, पुणे

दहावी आणि बारावीच्या २०२१ मधील परीक्षांसाठी परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांना परतावा म्हणून राज्य उच्च माध्यमिक व माध्यमिक मंडळाकडून २३ कोटी रुपयांची रक्कम परत दिली जाणार आहे. परीक्षा शुल्कातून दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६९, तर बारावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ९४ रुपये परत करण्याचा निर्णय राज्य मंडळाकडून घेण्यात आला आहे.

दहावी आणि बारावीच्या २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षा करोनाच्या प्रादुर्भावामुळे रद्द करण्यात आल्या होत्या. राज्यात दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख ५८ हजार ६२४, तर बारावीसाठी १३ लाख १९ हजार ७५४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले होते. परीक्षाच झाल्या नसल्याने विद्यार्थ्यांना शुल्काचा परतावा देण्याची मागणी होत होती. या संदर्भात न्यायालयानेही निकाल देऊन शुल्काचा परतावा देण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे राज्यातील दहावीच्या विद्यार्थ्यांचे ६९ रुपयांप्रमाणे ११ कोटी ४४ लाख ४५ हजार ५६ रुपये, तर बारावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ९४ रुपयांप्रमाणे १२ कोटी ४० लाख ५६ हजार ८७६ रुपये परतावा म्हणून परत दिले जाणार आहेत.

परताव्याची रक्कम संबंधित शाळांना परत केली जाणार असून, शाळांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना ही रक्कम परत करणे अपेक्षित असणार आहे. याविषयी राज्य मंडळात प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली असून, आतापर्यंत अनेक शाळांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचे तपशील राज्य मंडळाकडे सुपूर्द केले आहेत. डिसेंबर महिन्यापर्यंत सर्व विद्यार्थ्यांना परताव्याची रक्कम परत देण्याचा प्रयत्न असल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



"परीक्षा शुल्काचा परतावा देण्याचा निर्णय जाहीर झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासूनच या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. अनेक शाळांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची माहिती राज्य मंडळाकडे सुपूर्द करण्यास सुरुवात केली आहे. ही प्रक्रिया वेगाने सुरू असून, शाळांना लवकरात लवकर परतावा देण्याचा राज्य मंडळाचा प्रयत्न आहे.

- डॉ. अशोक भोसले,
सचिव, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ

### न्यायालयाच्या निर्णयानुसार परतावा

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून दहावीच्या विद्यार्थ्यांचे ४१५ रुपये, तर बारावीच्या विद्यार्थ्यांचे ४७५ ते ५०० रुपये इतके परीक्षा शुल्क घेण्यात आले आहे. यातील दहावीच्या विद्यार्थ्यांना ६९ आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना ९४ रुपये दिले जाणार असल्याने इतकी कमी रक्कम का दिली जात आहे, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा रद्द झाल्या, तेव्हा या परीक्षांची सर्व तयारी पूर्ण झाली होती. त्यामुळे संपूर्ण रक्कम परत करणे शक्य नाही. याशिवाय न्यायालयानेही अंशतः रक्कम देण्याच्या सूचना दिल्याने न्यायालयाच्या निर्णयानुसारच परताव्याची रक्कम दिली जात असल्याचे मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

Maharashtra Times 14.11.2021

**नवभारत**

# 12वीं परीक्षा के लिए करें आवेदन

**पुणे**, (सं) राज्य बोर्ड द्वारा आयोजित 12वीं कक्षा की परीक्षा के लिए आवेदन प्रक्रिया शुरू हो गई है. विभाग की ओर से वर्ष 2022 में महाराष्ट्र राज्य माध्यमिक एवं उच्च माध्यमिक शिक्षा बोर्ड द्वारा आयोजित की जाने वाली इस परीक्षा के संदर्भ में यह जानकारी दी गई है.

उल्लेखनीय है कि 12वीं की परीक्षा के लिए आवेदन करने वाले छात्र ऑनलाइन आवेदन कर सकेंगे. हायर सेकेंडरी स्कूल या जूनियर कॉलेज के रेगुलर छात्र 2 दिसंबर तक साधारण डेटाबेस के जरिए ऑनलाइन आवेदन कर सकेंगे.



इसके बाद विलंब शुल्क के साथ 13 दिसंबर तक आवेदन भरे जा सकेंगे. वोकेशनल कोर्स के नियमित छात्रों, पुन: परीक्षार्थियों, पंजीकरण प्रमाण पत्र प्राप्त करने वाले छात्रों और निजी और दुर्लभ विषयों के लिए बैठने वाले छात्रों के लिए आवेदन प्रक्रिया 3 दिसंबर से 11 दिसंबर तक खुली रहेगी. ये छात्र 20 दिसंबर 2021 को शाम 5 बजे तक विलंब शुल्क के साथ आवेदन कर सकेंगे. साथ ही हायर सेकेंडरी स्कूल या जूनियर कॉलेजों को चालान डाउनलोड शुल्क का भुगतान करने के लिए 12 नवंबर से 23 दिसंबर तक का समय दिया गया है.

### लॉगिन से एक प्रीलिस्ट प्रदान की जाएगी

आवेदन भरने और जमा करने के बाद छात्रों को कॉलेज के लॉगिन से एक प्रीलिस्ट प्रदान की जाएगी. उसके बाद छात्रों द्वारा दी गई जानकारी को रजिस्टर के साथ सत्यापित किया जाना चाहिए. स्कूलों और जूनियर कॉलेजों को निर्देश दिया गया है कि यह सुनिश्चित करें कि जानकारी सही है और छात्रों के हस्ताक्षर प्राप्त करें. सरकार और स्वास्थ्य विभाग को कोरोना की पृष्ठभूमि में समय-समय पर दिए गए निर्देशों का पालन करना चाहिए.

जो छात्र नियमित शुल्क के साथ-साथ विलंब शुल्क के साथ आवेदन करते हैं, उन्हें दो अलग-अलग चालानों के माध्यम से शुल्क का भुगतान करना होगा. शिक्षा विभाग ने छात्रों को निर्देश दिया है कि वे चालान की प्रति बोर्ड द्वारा निर्धारित बैंक खाते में जमा कराएं और छात्रों की सूची निर्धारित समय के भीतर संबंधित विभाग को जमा करें.

Pune Edition
14-november-2021 Page No. 2
epaper.enavabharat.com

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

लोकमत

### विद्यार्थ्यांकडून खोटी माहिती : सोमवारपासून पुन्हा महाविद्यालये गजबजणार; वसतिगृहाची समस्या

# ऑनलाइन परीक्षेसाठी लसीबाबत लपवाछपवी

स्पेशल रिपोर्ट

**राहुल शिंदे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाऊ शकते, या विचाराने काही विद्यार्थी कोरोना प्रतिबंधात्मक लस घेतल्याची माहिती महाविद्यालयांना कळवण्याबाबत लपवाछपवी करत आहेत. तसेच महाविद्यालयांकडून आयोजित कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेस विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे कोरोना परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतरही काही विद्यार्थ्यांची ऑनलाइन पध्दतीनेच परीक्षा घेण्याची मानसिकता आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुमारे दीड वर्षे पुण्यासह राज्यातील महाविद्यालये बंद होती. मात्र, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पावार व त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याची घोषणा केली.

कोरोना परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे दिवाळीनंतर पूर्ण क्षमतेने महाविद्यालये सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच शासनही शंभर टक्के उपस्थितीत महाविद्यालये सुरू करण्यास अनुकूल असल्याचे दिसून येत आहे. दिवाळीनंतर सोमवारपासून (दि.१५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमाची महाविद्यालये सुरू होणार आहेत. परंतु, त्यास कसा प्रतिसाद मिळतो, हे पाहणे उत्सुकतेचे आहे.

### लस घेतलेल्यांना ऑफलाइन शिक्षण

- लस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात ऑफलाइन शिक्षण व प्रात्यक्षिकांसाठी प्रवेश दिला जाणार असल्याचे राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने स्पष्ट केले.
- त्यामुळे विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधात्मक लस देण्याची विविध महाविद्यालयांतर्फे लसीकरण मोहीम राबविण्यात आली. परंतु,अजूनही अनेक विद्यार्थ्यांनी आपण लस घेतली असल्याची माहिती महाविद्यालयांना कळवलेली नाही.
- तसेच लस घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन घेणार की ऑफलाईन असे प्रश्न विद्यार्थ्यांकडून विचारले जात आहेत.




### ऑनलाइन परीक्षेसाठी विद्यार्थी आग्रही

१ कोरोना काळात विद्यापीठातर्फे सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळाले. त्यामुळे महाविद्यालयातील ऑफलाईन वर्गांना उपस्थित राहिल्यास आपल्याला परीक्षाही ऑफलाईन द्याव्या लागतील, असा समज काही विद्यार्थ्यांनी करून घेतला.




२ परिणामी कोरोना प्रतिबंधात्मक लस घेऊनही अनेक विद्यार्थी महाविद्यालयांना माहिती कळवीत नसल्याचे महाविद्यालय प्रशासनाकडून सांगितले जात आहे.

३ ऑनलाईन शिक्षण घेतल्यास ऑनलाईन परीक्षा होतील या गैरसमजामुळे अनेक विद्यार्थी प्रत्यक्ष महाविद्यालयात येण्यास टाळाटाळ करीत असल्याचे बोलले जात आहे.

महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहीम राबविण्यात आली. परंतु, त्यास फारसा प्रतिसाद मिळाला नाही. विद्यार्थ्यांकडून गुगल फॉर्मवर लसीकरणाची माहिती जमा केली जात आहे. परंतु, अनेक विद्यार्थ्यांनी ही माहिती भरून दिली नाही. त्यामुळे किती विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधात्मक लस घेतली. याबाबत अचूक माहिती प्राप्त झालेली नाही. लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरु केली जाणार आहे.

**डॉ. सविता दातार, प्राचार्य, स. प. महाविद्यालय**

### राहण्याचा प्रश्न प्रलंबित

- वसतिगृह बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या राहण्याचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे.
- त्यामुळे सोमवारपासून महाविद्यालये सुरु होणार असली तरी बाहेर गावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रश्न सुटल्याशिवाय महाविद्यालये गजबजणार नाहीत.
- त्यामुळे वसतिगृहाचा प्रश्न लवकरच सोडवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महाविद्यालयातर्फे वसतिगृह प्रवेशाची तयारी सुरु केली आहे. शासन आदेशानुसार विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जाईल. तसेच यापूर्वी शासनाने दिलेल्या आदेशानुसार येत्या सोमवारपासून महाविद्यालये सुरु केले जातील.

**- डॉ. रवींद्रसिंह परदेशी,**
**प्राचार्य,फर्ग्युसन महाविद्यालय**

Hello Pune
Page No. 1 Nov 15, 2021
Powered by: erelego.com

# पीएचडी प्रवेशप्रक्रियेत जाणीवपूर्वक खोडा

### नवीन मार्गदर्शकांना प्रवेश मिळू नये यासाठी काही विभाग प्रमुखांकडून प्रयत्न

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १४ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे (गाईड) कोणत्या संवर्गातील किती जागा द्याव्यात याबाबतचा निर्णय न झाल्यामुळे पीएच.डी. प्रवेशप्रक्रिया पुढे ढकलावी लागत आहे. मात्र, नव्याने मान्यता मिळालेल्या मार्गदर्शकांना प्रवेशाची संधी मिळू नये, यासाठी विद्यापीठातील काही विभाग प्रमुखांकडूनच पीएचडी प्रवेशप्रक्रिया जाणीवपूर्वक लांबणीवर टाकण्यात येत असल्याची चिन्हे आहेत. त्यामुळेच पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

पुणे विद्यापीठातील विविध विभाग व पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील संलग्न संशोधन केंद्रातील पीएच.डी. प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज मागवले. पात्र उमेदवारांची ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. तसेच परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. मात्र, मार्गदर्शकांना संवर्ग निहाय जागांचे वितरण करण्याची माहिती अद्ययावत नसल्याचे समोर आले. तसेच यापूर्वी एका गाईडकडे खुल्या संवर्गातील, मागासवर्गीय व परदेशी विद्यार्थी असे वितरण केले जात होते.

परंतु, आता एकूण विद्यार्थी आणि गाईडकडे उपलब्ध असणाऱ्या जागांचे गणित मांडून नवीन नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने समिती स्थापन केली असून, त्यानुसार कार्यवाही होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रतीक्षाच

### समितीची आवश्यकता का?

विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएचडी प्रवेशासंदर्भात सर्वसमावेशक नियमावली प्रसिद्ध केली आहे. मात्र, विद्यापीठाने वेळकाढूपणा करीत त्यासाठी समिती नेमली आहे. यूजीसीचे नियमावली स्पष्ट असताना समिती नेमण्याचा अर्थ काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### नव्या मार्गदर्शकांचा प्रस्ताव प्रलंबित

उच्च शिक्षण मंत्र्यांच्या निर्देशानंतर पुणे विद्यापीठाने नवे मार्गदर्शक होऊ इच्छिणाऱ्यांकडून प्रस्ताव मागविले आहे. त्यामुळे आता लवकरच मार्गदर्शकांची संख्या वाढल्याने विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शक निवडणे शक्य होईल, अशी शक्यता होती. मात्र विद्यापीठाने नव्या मार्गदर्शकांसाठी सादर केलेल्या प्रस्तावावर अद्याप निर्णय घेतले नाही. त्यामुळे विद्यापीठ कुणाला पाठीशी घालत विद्यार्थ्यांचे नुकसान करीत असल्याची भावना निर्माण होत आहे.

प्रभात Mon, 15 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64351881

# *News Paper Clippings During November 2021*

**Section: Education**

विविधा | लोकसत्ता

### महाविद्यालयांच्या मूल्यांकनासाठी

## सहायक प्राध्यापक पदभरतीला मान्यता

### प्राचार्यांची ३७० आणि प्राध्यापकांची २ हजार ८८ पदे भरण्यास मान्यता

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्याच्या वित्त विभागाच्या परवानगीने प्राचार्यांची ३७० आणि सहायक प्राध्यापकांची २ हजार ८८ पदे भरण्यास उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मान्यता देण्यात आली आहे. प्रत्येक महाविद्यालयास संबंधित विद्यापीठ किंवा नियामक प्राधिकरणाने दिलेली संलग्नता अबाधित राहण्यासाठी, महाविद्यालयाचे मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन होण्यासाठीची आवश्यक मर्यादा विचारात घेऊनच शिक्षकीय पदांचे वाटप करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



प्राचार्य आणि सहायक प्राध्यापक भरतीवरील निर्बंध शिथिल करण्यात आल्याचा शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केला. करोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्या पावणेदोन वर्षांपासून सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य भरतीवर निर्बंध घालण्यात आले होते. प्राचार्य संवर्गाच्या पदभरतीमुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसल्याने प्राचार्य पदाच्या ३७० रिक्त जागांवर भरती प्रक्रिया राबवण्यास मान्यता देण्यात आली. तर १ ऑक्टोबर २०१७च्या विद्यार्थी संख्येला आधारभूत मानून सहायक प्राध्यापकांच्या २ हजार ८८ पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

अतिरिक्त ठरलेल्या सहायक प्राध्यापकांचे रिक्त पदी समायोजित करून संबंधित विषयासाठी सहायक प्राध्यापकाचे पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यावरच पदभरतीची जाहिरात देता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**संस्थेवर वेतनाची जबाबदारी...**

आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत संबंधित पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. त्या व्यतिरिक्त पदांवर भरती केल्यास संबंधित उमेदवारांच्या वेतनाची जबाबदारी संस्थेची असेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

"उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २ हजार ८८ सहायक प्राध्यापक पदांच्या भरतीचा शासन निर्णय प्रसिद्ध केला असला, तरी या भरतीनंतरही अनेक पदे रिक्त राहणारच आहेत. कारण उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ऑक्टोबर २०१७च्या कार्यभाराला अंतिम मान्यताच दिलेली नाही. ही मान्यता दिल्यास सर्व रिक्त पदे भरता येतील. सर्व रिक्त पदे भरली जाऊ नयेत म्हणूनच उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २०१७च्या कार्यभाराला अंतिम मान्यता दिलेली नाही. प्राध्यापकांची भरती करताना शासनाने विद्यार्थ्यांचे हित पाहिलेले नाही.

– डॉ. संदीप पाथ्रीकर, संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना

लोकसत्ता Tue, 16 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64371289

## 'एमिनन्स'ची हुलकावणीच

### गुणवत्ता असूनही दिल्ली दरबारी वजन नसल्याने विद्यापीठ अद्याप दर्जाच्या प्रतीक्षेत

मटा मालिका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

केंद्र सरकारच्या जागतिक विद्यापीठांच्या 'इन्स्टिट्यूशन ऑफ एमिनन्स' (आयओई) योजनेच्या प्रतीक्षा यादीत अग्रक्रमावरील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला 'एमिनन्स' दर्जा कधी मिळणार, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. शैक्षणिक गुणवत्तेत राज्यात अग्रक्रमावर असलेल्या पुणे विद्यापीठाकडून 'एमिनन्स'च्या दर्जासाठी प्रयत्न करण्यात येत असून, त्यासाठी नुकतीच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याशीही चर्चा करण्यात आली आहे. मात्र, दिल्ली दरबारात पुण्याचे राजकीय वजन नसल्याने विद्यापीठाला 'वेटिंग'मध्ये ठेवण्यात येत असल्याची चर्चा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या कार्यकालात तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी 'आयओई'ची योजना राबविण्याची घोषणा केली. त्यानुसार माजी मुख्य निवडणूक आयुक्त एन. गोपालस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय तज्ज्ञ समितीने देशातील १५ सरकारी आणि १५ खासगी अशा एकूण ३० शैक्षणिक संस्थांची शिफारस 'आयओई' दर्जासाठी केली. त्यानंतर मनुष्यबळ विकास मंत्रालयाने 'आयओई' योजनेतर्गत १० सरकारी आणि १० खासगी संस्थांना मान्यता दिली. त्यानुसार या संस्थांना शैक्षणिक विकासासाठी 'आयटी इन्फ्रास्ट्रक्चर' आणि उत्तम सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी एक हजार कोटी रुपये मिळणार आहेत.

'आयओई'च्या यादीत जादवपूर युनिव्हर्सिटी आठव्या स्थानी, अण्णा युनिव्हर्सिटी नवव्या स्थानी, बनारस हिंदू युनिव्हर्सिटी दहाव्या आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अकराव्या स्थानी आहे. एक हजार कोटी रुपयांच्या निधीचा राज्य सरकारवर येणारा आर्थिक भार लक्षात घेता जादवपूर युनिव्हर्सिटी आणि अण्णा युनिव्हर्सिटी यांचा 'आयओई' दर्जाबाबत नकारात्मक सूर होता. त्यानंतर तमिळनाडू सरकारने 'अण्णा युनिव्हर्सिटी'साठी हा दर्जा नको, अशी भूमिका घेतली. त्यामुळे प्रतीक्षा यादीत पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या पुणे विद्यापीठाला 'आयओई'चा दर्जा मिळण्याचा मार्ग साधारण दोन वर्षांपासून मोकळा आहे. मात्र, करोनाच्या प्रादुर्भावामुळे केंद्राकडून या योजनेकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील विद्यापीठांकडे काणाडोळा होत असल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात आहे. त्यातच दिल्ली दरबारी पुण्यातील आणि राज्यातील महत्त्वाच्या लोकप्रतिनिधींकडून शैक्षणिक प्रश्नांना वाचा फोडली जात नाही. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेत राज्यात अग्रक्रमांकावर असणारे पुणे विद्यापीठ 'आयओई' दर्जापासून चार हात लांबच असल्याचे चित्र आहे. राज्यसभेचे खासदार प्रकाश जावडेकर मनुष्यबळ विकासमंत्री असताना, विद्यापीठाला दर्जा मिळेल अशी सर्वांनाच आशा होती. मात्र, विद्यापीठाच्या पदरी निराशाच पडली. विद्यापीठाला 'आयओई'चा दर्जा मिळावा, यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी काही दिवसांपूर्वी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेतली होती. या भेटीत डॉ. करमळकर यांनी विद्यापीठाच्या दर्जाबाबत चर्चा केली होती.

**'आयओई'चे महत्त्व का?**

- पुणे विद्यापीठाला विकासासाठी एक हजार कोटी रुपयांचा निधी मिळणार.
- पाच वर्षांत शैक्षणिक संकुलात जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सोयीसुविधा निर्माण होणार.
- आयटी सुविधांचे जाळे विस्तारणार.
- विद्यार्थी-प्राध्यापक प्रमाण संतुलित राहणार.



**'एनआयआरएफ'मध्येही बाजी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०१७च्या 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये (एनआयआरएफ) विद्यापीठ गटात दहावा क्रमांक आणि २०१८मध्ये नववा क्रमांक पटकाविला. त्यानंतर २०१९मध्ये पुन्हा दहावा क्रमांक पटकाविला. त्यानंतर २०२०मध्ये नववा क्रमांक मिळवला. काही दिवसांपूर्वी २०२१साठी जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत पुणे विद्यापीठाने अकरावा क्रमांक मिळवला. गेल्या पाच वर्षांत पुणे विद्यापीठाने राज्य सरकारी विद्यापीठ म्हणून राज्यातून 'एनआयआरएफ'मध्ये बाजी मारली आहे. अशी कामगिरी करूनही पुणे विद्यापीठाला 'आयओईआ दर्जाने गुंगाराच दिला आहे.

**मंत्रिमहोदयांचे आश्वासन हवेतच विरणार?**

'पुणे विद्यापीठाला 'आयओई'चा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी आपण स्वतः दिल्लीत पाठपुरावा करू,' अशी जाहीर भूमिका उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पुण्यात मांडली होती. मात्र, गेल्या दीड वर्षांत सामंत यांनी पुणे विद्यापीठाला 'आयओई' दर्जा मिळण्याबाबत शिक्षण मंत्रालय किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडे काय भूमिका मांडली, याबाबतची माहिती अद्याप गुलदस्तातच आहे.

"केंद्रीय शिक्षणमंत्र्यांशी झालेल्या चर्चेत आयओई योजनेबाबत पडताळणी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. देशात पुणे आणि बेंगळुरू या दोन शहरांमध्ये उत्तम शिक्षण आणि संशोधनाच्या सुविधा असल्याने, तेथील विद्यापीठांना दर्जा द्यावाच लागणार आहे, असे स्पष्ट संकेत प्रधान यांनी दिले.

– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 16.11.2021

## *News Paper Clippings During November 2021*

**Section: Education**

लोकमत

# ३७० प्राचार्य, २०८८ सहायक प्राध्यापक संवर्गातील पदे भरणार

## राज्य शासनाचा निर्णय : वेतन पुढील वर्षीपासून सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य शासनाने अनुदानित महाविद्यालयांतील ३७० प्राचार्य व २,०८८ सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या रिक्त पदांवर निवड झालेल्या सर्व प्राध्यापकांचे वेतन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे.

कोरोनामुळे दीड ते दोन वर्षांपासून भरतीवर राज्य शासनाने निर्बंध घातले होते. आजपर्यंतच्या ३७० प्राचार्यांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यास यापूर्वीच निर्णय घेतला आहे. आता प्राध्यापक भरतीस वित्त विभागाने मान्यता दिली आहे. याबाबतचा निर्णय सोमवारी प्रसिद्ध केला. त्यामुळे पात्र उमेदवारांना प्राध्यापक पदाची संधी मिळणार आहे. प्रथमत: अतिरिक्त ठरलेल्या सहायक प्राध्यापकांना रिक्त पदी तातडीने समायोजित करण्याचे आदेश दिले आहेत. प्राध्यापकाचे पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यानंतर संस्थांना पदभरतीची प्रक्रिया सुरू करता येईल.

उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी राज्याच्या उच्चस्तरीय सचिव समितीने एकूण ४,७३८ पदांना मान्यता दिली होती. त्यापैकी १,६१२ पदे आत्तापर्यंत भरली आहेत. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही. या पदासाठी वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत ही पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. त्याव्यतिरिक्त या पदांवरील पदभरती केल्यास अशा प्राध्यापकांची वेतनाची जबाबदारी ही संबंधित संस्थांची राहील, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

Hello Pune
Page No. 8 Nov 16, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

# Lack of info on availability of guides: PhD candidates

## Doctoral Aspirants Awaiting Allotment

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune**: Candidates desirous of pursuing doctorate degrees from the Savitribai Phule Pune University have blamed lack of information on availability of PhD guides for various departments for delay in their admission to doctoral programmes.

The university recently introduced revised guidelines for admission to PhD courses and based on these, the requirement for PhD guides has also changed.

The entrance test for admission to doctoral programmes was conducted recently and results announced, but students are still awaiting allotment of PhD guides.

A candidate, who cleared the entrance, said, "Department representatives have still not provided the data regarding the number of guides required under various categories to the admission cell of the university. This has led to delay in admissions and students are suffering due to it."

The entrance exam for PhD programmes was conducted in September for all the departments of Savitribai Phule Pune University in Pune division, and also for the research units at its affiliated institutions in Ahmednagar and Nashik.

Subsequently, the results were also declared. However, the university has so far not compiled information regarding the guides, claimed PhD aspirants.

Prafulla Pawar, registrar, Savitribai Phule Pune University, said, "The university has set up a committee to find a balance between the number of students who have cleared the PhD entrance examination and the available guides. The committee will study the revised guidelines for PhD admission and study the number of reserved category students clearing the exam to strike a balance."

The University Grants Commission has already issued guidelines regarding PhD admissions and the committee will follow the norms. The state higher and technical education department has sought a proposal from the Savitribai Phule Pune University regarding new aspirants who are willing to be guides to PhD students. This will ease pressure on existing guides and give students a chance to select the perfect guide for their thesis.

### LOOKING FOR MENTORS







- The entrance exam for PhD programmes was conducted in September for all SPPU departments in Pune division, and for research units at its affiliated institutions in Ahmednagar and Nashik
- Subsequently, the results were also declared
- However, students are still awaiting allotment of PhD guides
- The university recently introduced revised guidelines for admission to PhD courses
- The state higher and technical education department has sought a proposal from the SPPU regarding new aspirants who are willing to be guides to PhD students
- This will ease pressure on existing guides and give students a chance to select the perfect guide for their thesis
- The university has set up a committee to find a balance between the number of students who have cleared PhD entrance examination and the available guides

"Department representatives have still not provided the data regarding the number of guides required under various categories to the varsity admission cell. This has led to delay in admission and students are suffering due to it — **A candidate who cleared the entrance exam**"

The Times of India 16.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# विद्यापीठाच्या फंडामध्ये घट

## राज्य आणि केंद्र सरकारकडे अडीचशे कोटी रुपयांची थकबाकी

मटा मालिका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विविध योजना राबविण्यासाठी अनुदान, भत्ते, निधी यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून मंजूर झालेले सुमारे अडीचशे कोटी रुपये अद्यापही विद्यापीठाला मिळालेले नाहीत. हा निधी मिळत नसल्याने विद्यापीठाच्या तिजोरीवर मोठा ताण येत असून, विद्यापीठ फंडामध्ये दिवसेंदिवस घट होत आहे.

केंद्र आणि राज्य सरकारकडून 'ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट' समजल्या जाणाऱ्या पुणे विद्यापीठाला निधी देण्यासाठी केल्या जाणाऱ्या दिरंगाईबाबत शिक्षण क्षेत्रातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून विविध योजनांतर्गत विद्यापीठाला वेतन, भत्ते, अनुदान स्वरुपात अर्थिक निधी दिला जातो. अशा सर्व प्रकारच्या निधीची रक्कम एकत्र केली, तर विद्यापीठाला राज्य सरकारकडून १४४ कोटी रुपये येणे अपेक्षित आहे; याशिवाय केंद्र सरकारच्या उच्चतर शिक्षा अभियानांतर्गतही विद्यापीठाला शंभर कोटी रुपये मिळणार असून, त्यातील केवळ १६ कोटी रुपये आत्तापर्यंत विद्यापीठाला मिळाले आहेत. उर्वरित रक्कम अद्याप मिळालेली नाही. यामुळे केंद्र आणि राज्य सरकारकडून विद्यापीठाला सुमारे २४० कोटी रुपये मिळणार आहेत; परंतु हा निधी मिळत नसल्याने विद्यापीठाच्या फंडावर त्याचा ताण येत असल्याचे चित्र आहे. विद्यापीठामध्ये केली जाणारी विकासकामे, दुरुस्ती कामे, बांधकाम, कंत्राटी प्राध्यापकांच्या वेतनाचा खर्च; याशिवाय इतर अनेक खर्च विद्यापीठाच्या निधीतून केले जात आहेत. हे खर्च आणखी काही वर्षे असेच सुरू राहिल्यास विद्यापीठाच्या निधीत मोठी घट होईल. या पार्श्वभूमीवर दोन्ही सरकारांनी थकीत निधी तातडीने विद्यापीठाकडे द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### 'रुसा'ची ऑडिट प्रक्रिया पूर्ण

'केंद्र सरकारतर्फे उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) देण्यात येणाऱ्या निधीबाबतीत गेल्याच महिन्यात केंद्राच्या अधिकाऱ्यांनी विद्यापीठाचे ऑडिट केले आहे. यामुळे आता 'रुसा'कडून निधी मिळण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, पुढील काही महिन्यांमध्ये केंद्र सरकारकडून ठरावीक निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला दिली जाईल. हा निधी किती असेल, याबाबत अद्याप कोणतीही माहिती नसून, केंद्रीय शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पातून जी रक्कम मंजूर होईल, ती विद्यापीठाला मिळेल,' असे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### मानेंच्या समितीचे काय झाले?

विद्यापीठाला राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून दिल्या जाणाऱ्या निधीसंदर्भात विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नेमणूक करण्यात आली होती. या समितीने अद्याप कोणतेही निरीक्षण नोंदवले नसून, ही समिती दिरंगाई करीत आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. समितीने तातडीने या विषयाचा आढावा घेऊन त्यांची निरीक्षणे जाहीर करावीत, याही मागणीने आता जोर धरला आहे.

**"राज्य सरकारकडून मिळणाऱ्या १४४ कोटी रुपयांबाबत आढावा घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या निधीबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या फंडावर ताण येत आहे, ही वस्तुस्थिती असून, राज्य आणि केंद्र सरकारकडून निधी मिळाला तर तो उपयुक्त ठरेल.**

– **डॉ. एन. एस. उमराणी**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 17.11.2021

# Teacher recruitment in aided colleges gets go-ahead

## FOR 2022-23 ACADEMIC YEAR

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The much-awaited teacher recruitment in aided colleges in Maharashtra will start from 2022-23 academic year for filling up posts of 370 principals and 2,088 teachers.

The recruitment was on hold for several months and many aspirants had been waiting for government orders. A statement issued by the state education department said that a committee appointed to study the vacant posts had suggested filling up 4,737 posts, of which 1,697 posts were filled two years ago.

The payment for recruited candidates will start from the 2022-23 academic year, an education department notification issued on Monday stated. Dattatraya Kahar, state department of higher and technical education department official, said, "Teachers who were considered 'extra' will be accommodated in these vacant posts on priority. There are no additional posts of assistant teachers. Hence, the joint directorates in the state can immediately issue an advertisement for recruitment in their respective divisions."

The selected candidates will be appointed for 2022-23 academic year. The joint director must mention this in their recruitment advertisement as well, he said.

Kahar said that the unaided non-agricultural universities also have vacancies for teaching and non-teaching staff. However, the vacant posts and their structure have still not been decided by the designated committee due to some technical issues. It will be resolved soon."

The distribution of vacant posts has been done by the education department considering affiliation of the institute with the universities and accreditation and reaccreditation limits.

The joint directorates have been informed by the education department to strictly follow the university rules and regulations during recruitment. The colleges will have to submit the monthly report on the recruitment process and thereafter to the education department.

**The recruitment was on hold for several months and many aspirants had been awaiting government orders**

- A committee appointed to study the vacant posts had suggested filling up 4,737 posts, of which 1,697 posts were filled two years ago
- The distribution of vacant posts has been done by the education department considering affiliation of the institute with the universities and accreditation and reaccreditation limits
- The joint directorates have been informed by the education department to strictly follow the university rules and regulations during recruitment
- Colleges will have to submit the monthly report on the recruitment process and thereafter to the education department

"Teachers who were considered 'extra' will be accommodated in these vacant posts on priority. There are no additional posts of assistant teachers. Hence, the joint directorates in the state can immediately issue advertisements for recruitment in their respective divisions
– **Dattatraya Kahar** | STATE DEPARTMENT OF HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT OFFICIAL

**Move to fill posts of 370 principals and 2,088 teachers**

- Unaided non-agricultural universities also have vacancies for teaching and non-teaching staff
- However, the vacant posts and their structure have still not been decided by the designated committee due to some technical issues

The Times of India 17.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

पुढारी

# विद्यार्थी शिष्यवृत्तीला महाविद्यालयांचा खोडा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारकडून ११ वी ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण घेत असलेल्या विविध संवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना जवळपास १८ प्रकारच्या शिष्यवृत्तींचे वाटप केले जाते. परंतु, महाविद्यालयांच्या नाकर्तेपणामुळे दोन वर्षांत शिष्यवृत्तीचे राज्यात तब्बल ३१ हजार ९७१ अर्ज प्रलंबित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीला महाविद्यालयांचाच खोडा असल्याचे दिसत आहे.

**दोन वर्षांतील २८ हजारांपेक्षा जास्त अर्ज महाविद्यालयांत प्रलंबित**

**पुढारी वॉच**

महाविद्यालय स्तरावर दोन लॉगिन देण्यात आले आहेत. यामध्ये इन्स्टिट्यूट डेस्क-१ मध्ये 'क्लर्क' आणि इन्स्टिट्यूट डेस्क-२ मध्ये 'प्रिन्सिपल' असे अर्जासाठी दोन लॉगिन आहेत. यावर महाविद्यालय स्तरावर माहिती भरल्यानंतर हे अर्ज विभागीय स्तरावर पाठविले जातात. त्याची पडताळणी झाल्यानंतर पात्र अर्ज असेल, तर त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर १५ दिवसांच्या कालावधीमध्ये त्याच्या बँक खात्यात शिष्यवृत्ती रक्कम जमा होते. मात्र, महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी अर्ज भरूनही महाविद्यालय स्तरावरच त्यावर कोणती कार्यवाही होत नाही. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती घेण्यासाठी पात्र असूनही वंचित राहत असल्याचे दिसून आहे.

त्यामुळे महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तसेच, विद्यार्थ्यांना दुसऱ्या हत्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरून पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय, विभागाच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी तसेच पडताळणीसाठी प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांबाबत उच्चशिक्षण विभागाचे सहसंचालक, संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयातील प्राचार्य जबाबदार राहतील, अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना उच्च शिक्षण संचालनालयातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रतिभा दीक्षित यांनी उच्च शिक्षण विभागाच्या सर्व विभागीय सहसंचालकांना दिल्या आहेत. त्यामुळे आतातरी विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज मार्गी लागतील का? याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

**२०१९-२० या वर्षातील अर्ज**

| | |
|---|---|
| महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज | : २३७२ |
| विभागस्तरावर प्रलंबित अर्ज | : ३५ |
| दुसऱ्या हत्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज | : १९५८ |

**२०२०-२१ या वर्षातील प्रलंबित अर्ज**

| | |
|---|---|
| महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज | : ३४८१ |
| विभागस्तरावर प्रलंबित अर्ज | : ३११ |
| दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज | : २०१२१ |

Pune Edition
Nov 17, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# विद्यापीठाने पदभरती करताना आरक्षणाचे नियम डावलले

## ठराविक व्यक्तींना डोळ्यासमोर ठेऊन भरती : नियमांचे पालन करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध पदांच्या भरतीबाबत आरक्षणाच्या नियमांचे पालन केले जात नाही. तसेच काही वर्षे विद्यापीठात काम करणाऱ्या व्यक्तींना डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठ प्रशासनातर्फे पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाते. त्यामुळे सर्व घटकांना समान संधी मिळत नाही. त्यामुळे विद्यापीठाने आरक्षणाचे नियम पाळून पदभरती करावी, अशी मागणी केली जात आहे.



विद्यापीठाने पदभरतीबाबत आरक्षणाच्या नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. काही दिवसांपूर्वी आलेल्या जाहिरातीमध्ये आरक्षणाचे नियम पाळले गेले नाहीत. विद्यापीठाने आरक्षण डावलून भरती करू नये, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

**- शशिकांत तिकोटे, अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

विशिष्ट व्यक्ती व त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन विद्यापीठ फंडातील पदांची भरती केली जाते. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या जाहिराती रद्द करून नव्याने आरक्षण विचारात घेऊन पदभरतीची प्रक्रिया राबवावी.

**- डॉ. सुनील धिवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी कर्मचारी संघ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

विद्यापीठाच्या आरक्षण कक्षातून सर्व बाबींची तपासणी करूनच विद्यापीठ फंडातून भरल्या जाणाऱ्या पदांची भरती केली जाणार आहे. विद्यापीठाकडून पदभरतीबाबत आरक्षणाच्या सर्व नियमांचे पालन केले जाते.

**- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

विद्यापीठात पदनिर्मिती करताना कामाच्या स्वरुपात अत्यल्प बदल करून विशिष्ट स्वरुपाची पदे निर्माण केली जातात. त्यानंतर संबंधित पद हे खुल्या संवर्गातून भरण्यासाठी जाहिरात काढली जाते. यामुळे विद्यापीठात वर्षानुवर्षे सेवा दिलेल्या व सध्या सेवा देत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना समान न्याय मिळत नाही. त्यामुळे विद्यापीठाने विविध पदांच्या भरतीसाठी काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध केलेली जाहिरात आरक्षणाच्या नियमांचा विचार करून पुन्हा प्रसिद्ध करावी, अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाने केली आहे.

Hello Pune
Page No. 6 Nov 18, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

लोकमत




epaper.lokmat.com
पुणे, गुरुवार, दि. १८ नोव्हेंबर २०२१ ७

शैक्षणिक घडी बसविण्यासाठी आणि नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वितेसाठी स्वायत्त महाविद्यालयांच्या सर्वांगीण सक्षमतेकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.

# स्वायत्त महाविद्यालये : आव्हाने आणि अडथळे

विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्वायत्त महाविद्यालया संदर्भातील धोरण पूर्वीपासूनच सकारात्मक आहे. उच्च शिक्षणाचे विकेंद्रीकरण करून महाविद्यालयाने त्यांच्या परिसरातील उद्योगधंद्याला पूरक कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम तयार करावेत आणि शिक्षणाचा दर्जा उंचवावा, याविषयी घोषित झालेल्या शैक्षणिक धोरणामध्ये याचा उल्लेख केलेला आहे. नवीन शैक्षणिक धोरण हे एकूणातच शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करण्याचे संकेत देत आहे. या धोरणानुसार येत्या काही वर्षांमध्ये संलग्नित महाविद्यालये ही संकल्पना संपुष्टात आणून दर्जेदार स्वायत्त महाविद्यालये निर्माण करावी लागणार आहेत. तसेच पदवी बहाल करणारी महाविद्यालये अशी ओळख निर्माण करण्याचे उद्दिष्ट महाविद्यालयाने स्वीकारावे असेही अपेक्षित आहे. त्यास अनुसरून देशभरातील विविध महाविद्यालये स्वायत्ततेकडे प्रवास करत आहेत. 'नॅक'कडून A, A दर्जा प्राप्त झालेल्या विद्यापीठे आणि महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वीच स्वायत्तता बहाल केली आहे.

महाराष्ट्रामध्ये स्वायत्त महाविद्यालये ही संकल्पना सुरुवातीच्या कालावधीमध्ये स्वीकारली गेली नाही. वास्तवत: यूजीसीने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या स्वायत्त महाविद्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उच्च शिक्षणातील सर्व घटकांचे (शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी) हित जपले आहे. तरीसुद्धा अनुदानित महाविद्यालयातील वेतन व वेतनेतर अनुदान, करिअर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत मिळणारे फायदे, पदभरती आणि इतर सेवाशर्ती व अटी याबाबतीत लोकांच्या मनात शंका निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे महाराष्ट्रातून सुरुवातीच्या कालावधीमध्ये प्रतिसाद मिळाला नाही.




भारतासारख्या विशाल, विस्तीर्ण व भौगोलिक आणि सामाजिकदृष्ट्या विविधतेने नटलेल्या देशामध्ये कालसुसंगत, भौगोलिकदृष्ट्या उपलब्ध असलेल्या संसाधनांचा वापर करून सामाजिक जीवन समृद्ध करण्यासाठी उच्च शिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे शैक्षणिक घडी बसविण्यासाठी आणि नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वितेसाठी स्वायत्त महाविद्यालयांच्या सर्वांगीण सक्षमतेकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.

## आवश्यक भौतिक सुविधा

सद्यस्थितीत ज्या महाविद्यालयाला नॅक,कडून 'अ' दर्जा प्राप्त झाला अशाच महाविद्यालयांना स्वायत्तता मिळवण्यासाठी अर्ज करता येतो. देशभरातून 'अ' दर्जा प्राप्त झालेल्या महाविद्यालयांची संख्या तशी मर्यादित आहे. ज्यामध्ये महाविद्यालयांना नॅककडून B, B B ग्रेड मिळाली आहे आणि ज्यांच्याकडे अतिशय चांगल्या प्रतीच्या भौतिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत, अशी महाविद्यालये स्वायत्त दर्जा मिळविण्यासाठी अपात्र ठरत आहेत. विशेषत: यातील बहुतांशी महाविद्यालयांना यापूर्वीच्या नॅक मूल्यांकनामध्ये 'अ' दर्जा प्राप्त झाला होता. या महाविद्यालयांच्या स्वायत्ततेबाबत विचार करण्याची गरज आहे.

## प्रशासकीय नियंत्रण व अडथळे

स्वायत्त महाविद्यालयाला स्थानिक गरज व आवश्यकतेनुसार नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी आहे. मात्र, ज्या विद्यापीठांना संबंधित महाविद्यालय संलग्नित आहे, त्या विद्यापीठाच्या प्रशासकीय नियंत्रणामुळे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मर्यादा येत आहेत. विद्यापीठ व शासन यंत्रणा यांची स्वायत्त महाविद्यालयाला अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी मूक संमती असली तरी प्रशासकीय बाबींमधील अनंत अडचणींना समोरे जावे लागते. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयास लागू असणारे नियम स्वायत्त महाविद्यालयांना लागू केले जात आहेत. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयाच्या शैक्षणिक स्वायत्ततेबाबत उदासीनता दिसून येत आहे. नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत असताना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले अभ्यासक्रम व विद्याशाखा यांच्या अडचणी निर्माण होतात. परिणामी स्वायत्त महाविद्यालयांच्या नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याच्या स्वातंत्र्यावर विद्यापीठ व शासनस्तरावरून मर्यादा येतात.

## उद्योगधंद्यातील तज्ज्ञ सदस्यांचा सहभाग

सर्व विद्यापीठांच्या अभ्यास मंडळांमध्ये उद्योगधंद्यातील तज्ज्ञ नेमलेले असतात. परंतु, सदर तज्ज्ञ या अभ्यास मंडळाच्या सभेमध्ये खरेच सक्रिय सहभागी होतात का, याबाबत शंका आहे. त्यामुळे उत्साही व शिक्षण व्यवस्थेमध्ये योगदान देणाऱ्या उद्योगधंद्यातील तज्ज्ञांचा समावेश अभ्यासमंडळात करणे हे स्वायत्त महाविद्यालयांसमोरील एक आव्हान आहे.

## स्कॉलरशिप, फ्रीशिपपासून विद्यार्थी वंचित

सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र शासन तसेच केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या विविध स्कॉलरशिप, फ्रीशिपसाठी अभ्यासक्रमांचे मॅपिंग महाडीबीटी पोर्टलवर करणे आवश्यक असते. विद्यापीठाच्या बहुतांशी अभ्यासक्रमांचे मॅपिंग विद्यापीठ करते. मात्र, स्वायत्त महाविद्यालयामधून सुरू केलेल्या नवीन अभ्यासक्रमांचे महाडीबीटी पोर्टलवर मॅपिंग करण्याची कार्यपद्धती अद्याप निश्चित झाली नाही. त्यामुळे मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, फ्रीशिपचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमापासून हे विद्यार्थी वंचित राहतात.

## पदभरती

महाविद्यालयातील पदभरती खूप दिवसांपासूनच प्रलंबित आहे. स्वायत्त महाविद्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वायत्त महाविद्यालयामध्ये किमान ८० टक्के पदे भरलेली असावीत. यासाठी आवश्यक त्या उपाययोजना शासनस्तरावरून अमलात आणाव्यात हे अपेक्षित आहे. मागील १२ वर्षं पदभरती झाली नाही. मात्र नियत वयोमानानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे खूप मोठी पदभरती प्रलंबित आहे. त्याचा शिक्षण क्षेत्रावर गंभीर परिणाम होत आहे.

## आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे

संलग्नित महाविद्यालयाचे शैक्षणिक शुल्क विद्यापीठ ठरविते. मागील १० वर्षांत विद्यापीठाने कोणत्याही पद्धतीचे शैक्षणिक शुल्क वाढवले नाही. महाविद्यालयातील जे अभ्यासक्रम स्वयंअर्थचलित असतात त्या अभ्यासक्रमांच्या भौतिक सोयी-सुविधा निर्मिती, प्रयोगशाळा, उपकरणे व इतर प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारे रसायने व साहित्य आणि कार्यभारानुसार शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक, त्यांची वार्षिक वेतनवाढ, संपूर्ण महाविद्यालयाची स्वच्छता, देखभाल, वीज बिल व इतर खर्च याचा विचार करता ही महाविद्यालये स्वयंअर्थचलित होण्यास मर्यादा येत आहेत.



डॉ. संजय खरात
प्राचार्य व अधिसभा सदस्य

Hello Pune
Page No. 7 Nov 18, 2021
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During November 2021*

### Section: Education

लोकमत

# नवीन शैक्षणिक धोरणातील विज्ञान

प्रत्येक देश त्या त्या वेळच्या अंतर्गत व जागतिक संदर्भातील व्यवस्था आणि परिस्थितीनुसार शैक्षणिक धोरणाची मांडणी करीत असतो, तसेच कालानुसार धोरणाची वैशिष्ट्ये व उद्दिष्ट्येही बदलत आणि अंमलबजावणीचे प्राधान्यक्रमही बदलतात. नवीन सहस्रकाच्या पहिल्या वीस वर्षांत भारतात व जगातही अनेक बदल वेगाने झाले. त्यातल्या वैज्ञानिक बदलांचा वेग तर गेल्या ३००-४०० वर्षातल्या वेगापेक्षा खूपच जास्त आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सची (कृत्रिम बुद्धिमत्ता) भरारी, तर भीतिदायक आहे. विचार करणारे संगणक ही आता लांबची गोष्ट राहिली नाही, तसेच इंटरनेटशिवाय जगणे जवळजवळ अशक्यप्राय झाले आहे; पण विज्ञानाची किती प्रगती झाली तरी निसर्ग आपल्याला नवीन धडे द्यायचा थांबत नाही. कोरोना हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. कोरोनाचा शैक्षणिक प्रक्रियेवर खूपच दूरगामी परिणाम झाला.



भारताला जगातील एक महान ज्ञानसत्ता बनविणे आणि विद्यार्थ्यांना एकविसाव्या शतकात आवश्यक अशा क्षमता व कौशल्य आत्मसात करण्यास मदत करणे, असे या शैक्षणिक धोरणाचे सुस्पष्ट उद्दिष्ट आहे. या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस टप्प्याटप्प्याने सुरुवात होत असून,

वयाच्या तिसऱ्या वर्षापासून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा या धोरणात विचार केला आहे. त्यासाठी बालकांच्या वयानुसार होणाऱ्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक बदलांसह इतर बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. इयत्ता पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतूनच किंवा प्रादेशिक भाषेतूनच झाले पाहिजे, ही या धोरणातील महत्त्वपूर्ण विज्ञानाधारित संकल्पना आहे.

पायाभूत इयत्तेमध्ये साक्षरता व संख्याशास्त्रावर भर दिला आहे. त्याशिवाय मूळ शिक्षणाचा पाया बळकट होणार नाही. हे संशोधकांनी सिद्ध केलेले तत्त्व त्यात वापरले आहे. मूल्यमापन पद्धतीमध्ये खूप बदल करण्यात आला असून, आकलन, विचारशक्ती वाढली का, इतर कौशल्य आत्मसात झाली का, आता याचे मूल्यमापन होईल. शिवाय मूल्यमापनात स्वतः विद्यार्थी, मित्र, पालक यांचाही सहभाग असेल. या धोरणात बहुविद्याशाखेला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी एकाच वेळी शास्त्र, कला, वाणिज्य यासारखे विषय निवडू शकेल. त्यामुळे त्याच्यात असलेल्या क्षमतांचा व कौशल्यांचा विकास होईल.

भारतीय शैक्षणिक धोरण जागतिक शैक्षणिक प्रगतीशी जोडलेले असावे म्हणून या धोरणाची सांगड 2030 च्या शाश्वत विकास कार्यक्रमांशी घालण्यात आली आहे. विद्यार्थी व शिक्षकांचे प्रमाण ३० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक असे असावे, त्याचप्रमाणे प्रत्येक शाळेत एक समाजसेवक व एका मानसशास्त्रज्ञाची नेमणूक करावी, असेही या धोरणात स्पष्ट केले आहे.

सर्जनशीलता, शास्त्रीय मनन, सुसंवाद, परस्पर सहकार्य, बहुभाषिकता, शोधक विचारक्षमता, समस्या निवारण, सामाजिक बांधिलकी, नीती तत्त्वे, अंकिय साक्षरता या एकविसाव्या शतकात लागणाऱ्या क्षमता व कौशल्यांचा धोरणात समावेश आहे. त्यामुळे या धोरणामध्ये विज्ञानाचा चांगला अंतर्भाव केला असल्याचे म्हणता येईल.

देशाच्या शिक्षणाला नवी दिशा देणारे हे शैक्षणिक धोरण असून, त्याची काटेकोर व नियोजन पद्धतीने अंमलबजावणी झाली नाही तर आपल्या भव्यदिव्य स्वप्नांना तडा जाईल. कुठलाही बदल अडचणी घेऊनच येतो; पण त्याबरोबर प्रगतीही येते. त्यामुळे सर्व संबंधितांनी त्यांच्या भूमिका प्रामाणिकपणे पार पडण्यावर या धोरणाचे यश-अपयश अवलंबून असेल.



अशोक तातुगडे
मराठी विज्ञान परिषद

Hello Pune
Page No. 7 Nov 18, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

लोकमत

# प्राध्यापक भरतीचा फार्स ?

राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत अध्यादेश प्रसिद्ध केला असला तरी त्यात अनेक गोष्टींची गुंतागुंत केली आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून प्राध्यापक भरतीची आग्रही मागणी करणाऱ्या विविध संघटनांना शांत करण्यासाठी तर हा अध्यादेश काढला गेला नाही ना ?, अशी शंका निर्माण होते. भरती बाबतच्या आकृतिबंधाला वित्त विभागाकडून मान्यता मिळाल्याशिवाय प्राध्यापक व प्राचार्य भरती करता येणार नाही. त्यामुळे पुन्हा एकदा प्राध्यापक भरतीचा फार्स उभा केला जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

राज्य शासनाने २०१७ ची विद्यार्थी संख्या गृहीत धरून प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे केवळ २०८८ प्राध्यापकांची पदे भरता येणार आहेत. कोरोना काळात प्रामुख्याने विज्ञान व कला शाखेत या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाले आहे. त्यामुळे काही महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक अतिरिक्त झाले आहेत. नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या अध्यादेशात अतिरिक्त झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांना प्राधान्याने नियुक्ती दिली जावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच संबंधित



विषयाकरिता सहायक प्राध्यापकाचे पद अतिरिक्त नसल्याची खात्री केल्यानंतरच महाविद्यालयांना पद भरतीबाबत जाहिरात देता येणार आहे. परिणामी सध्या रिक्त झालेल्या पदांवर अतिरिक्त ठरलेल्या प्राध्यापकांची वर्णी लागणार आहे.

राज्य शासनाने अध्यादेशामध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्राध्यापक भरती करता येईल, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे जून २०२२ पासून प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू करता येईल. परिणामी प्राध्यापक भरतीसाठी आणखी सात महिने वाट पाहावी लागणार आहे. तसेच राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधास अद्याप वित्त विभागाने अंतिम मंजुरी दिलेली नाही.त्यामुळे प्राध्यापक भरतीचा मार्ग अजूनही पूर्णपणे खुला झालेला नसल्याचे दिसून येत आहे.

वित्त विभागाच्या मंजुरीनंतर प्राध्यापक भरती केले जाईल, असे यापूर्वी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले होते. अध्यादेशात नमूद केलेल्या मुद्ध्यानुसार अजूनही वित्त विभागाने प्राध्यापक भरतीला परवानगी दिली नसल्याचे दिसून येत आहे. भावी प्राध्यापकांनी सातत्याने केलेल्या आंदोलनाचा विचार करून शासनाकडून भरती प्रक्रिया सुरळीतपणे राबविली जाईल, अशी आशा व्यक्त करण्यास हरकत नाही.मात्र, शिक्षण विभागाने प्राध्यापक व प्राचार्य पद भरतीसाठी काढलेला अध्यादेश केवळ फार्स ठरू नये, एवढी अपेक्षा.

राहुल शिंदे

Hello Pune
Page No. 7 Nov 18, 2021
Powered by: erelego.com

# विद्यापीठांमध्ये भरती केव्हा ?

मटा मालिका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकारने प्राध्यापक भरतीचा निर्णय नुकताच प्रसिद्ध केला असला, तरी राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. सरकारने दाखविलेल्या दुजाभावावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांची पुरेशा प्रमाणात संख्या नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, विद्यापीठांना त्यांच्या फंडातील निधी कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या प्राध्यापकांवर खर्च करावा लागत आहे.

राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमधील २०८८ पदांवर सहायक प्राध्यापकांनी भरती करण्याचा निर्णय घेतला. त्यात प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याच्याही सूचना दिल्या आहेत.



अकृषी विद्यापीठांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याकडे मात्र दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह इतर सरकारी विद्यापीठांमध्ये सध्या ४० ते ५५ टक्के प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे अनेक विभागांचा कारभार कंत्राटी तत्त्वावरील प्राध्यापकांवर सुरू आहे. काही विभागांमध्ये अजूनही पदे रिक्तच आहेत. विद्यापीठातील प्राध्यापकांची भरती होणे अपेक्षित असताना तो झाला नाही. सरकारने प्राध्यापक भरतीबाबत महाविद्यालय आणि विद्यापीठ असा दुजाभाव केल्याचे चित्र असल्याचे प्राध्यापकांचे म्हणणे आहे.

**शैक्षणिक दर्जावर परिणाम**

पुणे विद्यापीठात प्राध्यापकांच्या ५५ टक्क्यांहून अधिक जागा रिक्त आहे. विद्यापीठातील वेगवेगळ्या विभागांसाठी मंजूर असलेल्या एकूण ३८६ पदांपैकी केवळ १७६ पदे भरण्यात आली आहेत. प्राध्यापकांवरील ताण कमी करण्यासाठी आणि विद्यापीठातील विभाग सुरू राहावेत, यासाठी विद्यापीठाला त्यांच्या निधीतून काही प्राध्यापकांची नेमणूक करावी लागली असून, त्यांच्या वेतनासाठी दर वर्षी सुमारे ३.५ कोटी रुपयांहून अधिक खर्च करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वीच विद्यापीठाच्या 'मॅनेजमेंट कौन्सिल'च्या बैठकीत शैक्षणिक विभागांमधील प्राध्यापकांची भरती सरकारने करण्याबाबतचा ठराव मांडण्यात आला. या ठरावाचे पत्रही उच्च व तंत्रशिक्षण विभागाला पाठविण्यात आले होते.

Maharashtra Times 18.11.2021

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संबंध परिषद - पुणे विद्यापीठ यांचा पुढाकार

## भारतीय संस्कृती, ऋषीमुनींच्या योगदाबाबत अभ्यासक्रम

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७ -** परदेशातील विद्यार्थ्यांना भारताची संस्कृती, ऋषीमुनी आणि थोरपुरुषांचा गौरवशाली इतिहास समजावा, यासाठी आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संबंध परिषद (आयसीसीआर) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून ७ ते १० प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी माहिती सांगणारे व्हिडिओंच्या निर्मिती काम अंतिम टप्प्यात असून, येत्या काही दिवसांत ते आयसीसीआरच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल', अशी माहिती पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शनिवारी दिली.

गंधर्व वेद प्रकाशनातर्फे आयोजित कार्यक्रमात



डॉ. अंशुमती दुनाखे लिखित 'ऋषींचा धन्य गृहस्थाश्रम' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. करमळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार, डॉ. अभय टिळक, दीपक खाडिलकर, प्रकाश खाडिलकर आदी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले की, 'यूटेक्स' प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात येत आहे. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसोबत सामान्य नागरिकांनाही व्हिडिओंच्या माध्यमातून शिकता येतील. सध्या २५ व्हिडिओंची निर्मिती पूर्ण झाली आहे. येत्या कादी दिवसांत ते वेबसाइटवर अपलोड होतील, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले. डॉ. दुनाखे म्हणाल्या की, दीडशे उपनिषदांचा प्रकल्प हाती घेतला असून, तो लवकर पूर्ण होईल. आपल्याकडे जुने संदर्भ जपण्याची पद्धत नसल्याने, लिखाणासाठी संदर्भ मिळत नाही. त्यामुळे माहिती गोळा करण्यात अडथळे येतात. या परिस्थितीवर उपाय म्हणून पुणे विद्यापीठाने जुने ग्रंथ फेरप्रकाशित करून जुना वैज्ञानिक इतिहास लोकांसमोर ठेवावा. इतिहासाची माहिती अधिकाधिक लोकांना होण्यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा डॉ. दुनाखे यांनी व्यक्त केली. राहुल सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन केले.

प्रभात Thu, 18 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64415488

पुढारी

## आठ दिवसांत महाविद्यालयांसह विद्यापीठातील वसतिगृहे सुरू होणार

### उच्च, तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील वसतिगृहे सुरू करण्याबाबत डॉ. धनराज माने व डॉ. अभय वाघ यांची समिती नेमली आहे. त्यांनी सर्व विद्यापीठांचा आढावा घेतला आहे. येत्या आठ दिवसांत वसतिगृहे सुरू होतील, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी दिली.

कोल्हापूर दौऱ्यावर असताना ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. मंत्री सामंत म्हणाले, प्राध्यापक भरती प्रक्रियेचा २०८८ पदांचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. तीन हजारांहून अधिक पद भरतीची मागणी केली होती.

दुसऱ्या टप्प्यात १ हजार प्राध्यापकांची पदे भरली जाणार आहेत. त्यामुळे पात्र उमेदवारांनी नाराज होऊ नये. 'सीएचबी' प्राध्यापकांना चांगले वेतन कसे देता येईल, यासाठी समिती नियुक्त केली आहे. लवकरच 'सीएचबी' प्राध्यापकांच्या मागण्या पूर्ण करण्याचा निर्णय घेतला जाईल.

### विद्यार्थ्यांकडून जादा फी घेणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई

महाविद्यालये जादा फी घेत असतील तर विद्यार्थ्यांनी तक्रार विद्यापीठाकडे करावी. विद्यापीठांनी याबाबतची लेखी तक्रार उच्चशिक्षण विभागाकडे करावी. दोषी आढळल्यास संबंधित महाविद्यालयावर कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्री सामंत यांनी दिला.

Pune Edition
Nov 19, 2021 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

### दहावी, बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी–मार्चमध्येच

**शिक्षण मंडळाकडून वेळापत्रक तयार**

**शासन मान्यतेनंतर तारखा जाहीर होणार**

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) – राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी–मार्च महिन्यातच होणार आहेत. शिक्षण मंडळाने दोन्ही परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक तयार केले असून राज्य सरकारने वेळापत्रकाला मंजुरी दिल्यास येत्या काही दिवसांत परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या जाणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयात सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या दहावी, बारावी परीक्षेसंदर्भात गुरुवारी झालेल्या अंतिम सुनावणीनंतर देशभरात बोर्डाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शिक्षण मंडळाकडून दहावी, बारावी परीक्षांचे वेळापत्रक कधी जाहीर केले जाणार याविषयी विद्यार्थी, पालकांसह शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातही उत्सुकता होती.

राज्यात दरवर्षी बोर्डाच्या दहावी, बारावीच्या लेखी परीक्षा या फेब्रुवारी–मार्च महिंन्यात घेतल्या जातात. त्याआधी शाळास्तरावर तोंडी, प्रात्यक्षिक आणि श्रेणी विषयांच्या परीक्षांचे आयोजन करण्यात येते. बारावीच्या परीक्षा या फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात तर दहावीची परीक्षा मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येते. यंदाच्या वर्षीदेखील दहावी, बारावी परीक्षांचे आयोजन फेब्रुवारी–मार्च महिन्यातच करण्यात आले आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे यंदा शाळा उशिराने सुरू झाल्या आहेत. त्यामुळे परीक्षादेखील किमान एक आठवडा उशिराने सुरू होण्याची शक्यता आहे.

- राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी, बारावीच्या परीक्षा पारंपरिक पद्धतीने होणार
- लेखी परीक्षेआधी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी विषयांच्या परीक्षा पार पडणार
- लेखी परीक्षांचे एकूण गुण आणि परीक्षेचा कालावधी पूर्वीप्रमाणेच असणार.
- कोरोना प्रतिबंधक उपाय म्हणून सोशल डिस्टन्सिंगचे पालन होण्यासाठी परीक्षा केंद्रांची संख्या वाढणार

*राज्य शिक्षण मंडळाकडून दहावी, बारावी परीक्षांचे वेळापत्रक मान्यतेसाठी शालेय शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आले आहे. येत्या काही दिवसांत शिक्षण विभागाकडून वेळापत्रकाला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने मान्यता दिल्यास प्रात्यक्षिक, तोंडी आणि श्रेणी विषयांसह लेखी परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या वेबसाईटवर ऑनलाइन जाहीर करण्यात येईल. तोपर्यंत विद्यार्थी, पालकांनी सोशल मीडियावरील किंवा अन्य माध्यमातून जाहीर होणाऱ्या वेळापत्रकांवर विश्वास ठेवू नये.*

*▪ शरद गोसावी, प्रभारी अध्यक्ष*
*राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ*

Kesari 19.11.2021

पाने १६ (गुडमॉर्निंगसह) किंमत ₹ ५/- ★★

### दहावी, बारावी परीक्षा मार्चमध्येच होणार

**ऑफलाइन परीक्षेचा प्रस्ताव**

**मंजुरीनंतर वेळापत्रक जाहीर**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १९** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षा येत्या फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणार आहेत. या परीक्षांचे वेळापत्रक तयार करण्यात आले असून त्याबाबतचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. पारंपरिक पद्धतीनुसार परीक्षा ऑफलाइन म्हणजे पारंपरिक पद्धतीने होणार आहेत.

मार्च २०२० पासून राज्यात करोनाचा प्रादुर्भाव निर्माण झाला होता. यामुळे सतत लॉकडाऊन, संचारबंदी, जमावबंदी करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य देत शाळा, महाविद्यालये बंदच ठेवण्यात आली होती. मागील शैक्षणिक वर्षातील दहावी, बारावीच्या परीक्षा रद्द करून अंतर्गत मूल्यमापनाद्वारे निकाल तयार करून ते जाहीर करण्यात आले होते. यंदाचे शैक्षणिक वर्ष १५ जूनपासूनच सुरू करण्यात आले आहे. मात्र, सुरुवातीला ऑनलाइनच शाळा सुरू ठेवण्यात आल्या होत्या. करोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात येऊ लागल्यामुळे ४ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष शाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत.

दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन परीक्षा अर्ज भरण्यासाठीचे वेळापत्रक राज्य मंडळाकडून जाहीर करण्यात आले आहे. आता विद्यार्थी, पालक, शिक्षक यांना परीक्षेचे वेळापत्रक कधी जाहीर होणार याबाबत उत्सुकता निर्माण झालेली आहे. दरम्यान, राज्य मंडळाकडून परीक्षेबाबतच्या नियोजनासाठी जलदगतीने हालचाली सुरू झालेल्या आहेत. लेखी परीक्षेच्या आधी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी विषयांच्या परीक्षा होणार आहेत. लेखी परीक्षांचे गुण व परीक्षेचा कालावधी पूर्वीप्रमाणेच असणार आहे. यात कोणताही बदल करण्याची तूर्तास शक्यता नाही. करोनाच्या प्रतिबंधात्मक नियमांचे पालन मात्र करावेच लागणार आहे. त्यादृष्टीने परीक्षा केंद्रांची संख्याही वाढवावी लागणार आहे. राज्यातील महापालिकांच्या निवडणुकाही फेब्रुवारीत होण्याची शक्यता आहे. त्यातच शाळा उशिरा सुरू झाल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासही काहीचा वेळ लागणार आहे. त्यामुळे दरवर्षीच्या वेळापत्रकानुसार यंदाच्या परीक्षा आठ दिवस लांबणीवर पडण्याचीही शक्यता वर्तविण्यात येत आहे.

> इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षांच्या वेळापत्रकाच्या कालावधीबाबत मागील आठवड्यात राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडे सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. येत्या आठवड्यात त्यास मान्यता मिळण्याची शक्यता आहे. शासनाकडून मान्यता मिळताच प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी विषयांसह लेखी परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. करोनाच्या परिस्थितीचा आढावा घेऊन राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व नियमांचे पालन करूनच परीक्षेबाबतचे नियोजन करण्यात येणार आहे.
>
> – **शरद गोसावी,** प्रभारी अध्यक्ष, राज्य मंडळ

प्रभात Sat, 20 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/644

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

मटा अँकर | मान्यता मिळाल्यास पुढील आठवड्यात वेळापत्रक

### परीक्षांच्या तारखांचा प्रस्ताव

म. टा. प्रतिनिधी, पुणे



प्रातिनिधिक फोटो

**'वेळापत्रक तातडीने जाहीर करा'**

नोव्हेंबर महिना संपत आला, तरीही दहावी-बारावी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले नसल्याने तातडीने वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांकडून केली जात आहे. नोव्हेंबरअखेर वेळापत्रक जाहीर झाल्यास विद्यार्थ्यांकडे अभ्यासासाठी तीन महिन्यांचा कालावधी राहणार आहे. त्या दृष्टीने अभ्यासाचे नियोजन करणे विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे.

राज्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षा ऑफलाइन स्वरूपात मार्चमध्ये घेण्याची तयारी राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून केली जात आहे. या संदर्भातील सविस्तर प्रस्ताव सरकारकडे सादर करण्यात आला असून, शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडून त्याला मान्यता मिळाल्यास पुढील आठवड्यात दहावी आणि बारावीचे वेळापत्रक जाहीर केले जाईल, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे.

मार्च २०२२मध्ये दहावी आणि बारावीच्या परीक्षा घेण्याच्या दृष्टीने नियोजन केले जात असून, या परीक्षा ऑफलाइनच होणार असल्याचे मंडळाने यापूर्वीच जाहीर केले आहे. मंडळाने परीक्षांच्या तारखांचे वेळापत्रक तयार करून नुकतेच ते शिक्षण विभागाच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे. शिक्षण विभागाने मान्यता दिल्यानंतर त्याची अधिकृत घोषणा केली जाईल, अशी भूमिका राज्य मंडळाने मांडली आहे. या प्रस्तावानुसार फेब्रुवारी अखेरीस अथवा मार्च महिन्यात परीक्षा घेण्यात याव्यात, असे सुचविण्यात आले आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा मार्चच्या पहिल्या आठवड्यात बारावीच्या परीक्षा, तर मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून दहावीच्या परीक्षा घेण्याचा राज्य मंडळाचा मानस आहे. या दोन्ही परीक्षांसाठी प्रात्यक्षिक आणि लेखी परीक्षांचे वेळापत्रक सादर करण्यात आल्याची माहिती राज्य मंडळातील सूत्रांकडून मिळाली आहे.

राज्यात फेब्रुवारी महिन्यात महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. निवडणुकांची सर्व प्रक्रिया फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर दहावी-बारावीच्या परीक्षा घेण्यासाठी कोणतीही अडचण येणार नसल्याने राज्य मंडळाकडून मार्च महिन्यातील तारखांचे वेळापत्रक शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आले आहे. राज्य सरकारने वेळापत्रक मान्य केल्यास दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्च महिन्यात बोर्डाच्या परीक्षा द्याव्या लागणार आहेत.

Maharashtra Times 20.11.2021

### नव्या धोरणाची माहिती द्या

**विशेष कक्ष स्थापन करण्याची कॉलेजांना सूचना**

**विद्यार्थ्यांना द्यायची माहिती**

- ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्सबद्दलची माहिती
- विद्यार्थ्यांना सोयीच्या वेळी शिक्षण घेणे आणि सोयीच्या वेळी शिक्षण सोडताना त्यांना कोणती पदवी, पदविका मिळणार याची माहिती
- परदेशी विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष असावा

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'ची अंमलबाजवणी देशभरात लवकरच करण्यात येणार आहे. याबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळावी या उद्देशाने प्रत्येक कॉलेजमध्ये 'एनईपी कक्ष' (नॅशनल एज्युकेशन पॉलिसी) स्थापन करावा अशी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे.

या शैक्षणिक वर्षापासून देशभरात टप्प्याटप्प्याने राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी होणार आहे. या धोरणानुसार शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत. हे बदल कॉलेजांचे प्राचार्य, प्राध्यापक, व्याख्याते यांना माहिती होण्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने शैक्षणिक संस्थांमध्ये




एनईपी कक्षाची स्थापना करावी, अशी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे. या कक्षामार्फत विद्यार्थ्यांना काय माहिती उपलब्ध करून द्यावी याबाबतच्या सूचनाही या परिपत्रकामध्ये करण्यात आल्या आहेत.

यामध्ये 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्सबद्दलची माहिती, विद्यार्थ्यांना सोयीच्या वेळी शिक्षण घेणे आणि सोयीच्या वेळी शिक्षण सोडताना त्यांना कोणती पदवी, पदविका मिळणार याची माहिती देणे अपेक्षित आहे. परदेशी विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष असावा अशी सूचनाही या परिपत्रकात करण्यात आली आहे.

नवीन शिक्षण धोरणांमध्ये ऑनलाइन शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे 'स्वयम् २०२१' या व्यासपीठावर कोणते अभ्यासक्रम उपलब्ध आहेत, कोणत्या अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना ४० क्रेडिट्स मिळवता येतील याबाबतची माहितीही विद्यार्थ्यांना या कक्षामार्फत उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. याचबरोबर नव्याने नेमलेले शिक्षकांनाही नवीन शिक्षण धोरणाची माहिती उपलब्ध करून देण्याची सूचनाही या पत्रकात आयोगाने केली आहे.

Maharashtra Times 21.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

सामना

### सोमवारपासून अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये सुरू होणार

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) - १२ नोव्हेंबरला घेण्यात आलेल्या राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणानंतर (एनएएस) दिवाळीच्या सुट्ट्या पुढे जोडून घेतलेल्या राज्यातील अनुदानित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये सोमवार, २२ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत.

दिवाळीच्या सुट्टीसंदर्भात शालेय शिक्षण विभागाने दोन वेगवेगळे निर्णय जाहीर केल्याने शाळांमध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. काही शाळांनी दिवाळीची सुट्टी २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरपर्यंत घेतली तर काहींनी १ नोव्हेंबरपासून दिवाळी सुट्टी घेतली. या शाळांनी १२ नोव्हेंबरला सर्वेक्षणादिवाशी शाळा उघडून पुन्हा २० नोव्हेंबरपर्यंत दिवाळीची सुट्टी जोडून घेतली आहे. त्यामुळे या शाळा आता सोमवार, २२ नोव्हेंबरपासून सुरळीतपणे सुरू होणार आहेत.

राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणनंतर शाळांना स्थानिक स्तरावर दिवाळीच्या सुट्ट्या नाताळ अथवा इतर सणांच्या काळात जोडून घेण्यासाठी मुभा देण्यात आली होती. त्यामुळे काही शाळांनी दिवाळीची सुट्टी वाढवून घेतली. मात्र, आता २२ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व शाळा सुरळीत होणार आहेत.

Pune Edition
Nov 21, 2021 Page No. 2
Powered by : eReleGo.com

पुढारी

### शुल्कासाठी विद्यार्थ्यांची अडवणूक केल्यास कारवाई

**मुंबई :** अनुसूचित जाती आणि प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती न झाल्याने या विद्यार्थ्यांकडून शुल्काची मागणी करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई केली जाईल, यासंदर्भातील पत्र मुंबई विभागाच्या समाजकल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील अधीक्षकांनी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठवले आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सरकारकडून शिष्यवृत्ती दिली जाते. ही रक्कम महाविद्यालयांमधील शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी देण्यात येते. मात्र, यंदा ही रक्कम सरकारकडून विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. या विद्यार्थ्यांकडून शुल्क मागू नये, असे संकेत आहेत. असे असताना काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडे शुल्काची मागणी केली. याबाबत तक्रार दाखल झाल्यानंतर कार्यालय अधीक्षकांनी सर्व प्राचार्यांना अशाप्रकारे शुल्क वसुली न करण्याचे आदेश दिले आहेत.

Pune Edition
Nov 22, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# अकरावीसाठी आता समुपदेशनाद्वारे प्रवेश प्रक्रिया

### यंदा अजूनही ३९ हजार ४१५ जागा रिक्तच

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २१ -** पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी बऱ्याचचदा विविध प्रवेश फेऱ्यांच्या माध्यमातून मुदतवाढ देवूनही ३९ हजार ४१५ जागा अद्यापही रिक्त आहेत. आता २३ नोव्हेंबरपासून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरून समुपदेशनाद्वारे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

आतापर्यंत अकरावी प्रवेशासाठी पुणे विभागातील ३१७ महाविद्यालयांनी नोंदणी केली होती. त्यात १ लाख १३ हजार ३२५ प्रवेशाच्या जागा आहेत. ९० हजार ६३५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यातील ८३ हजार ५१० अर्ज भरून लॉक झाले. ८३ हजार ५०४ अर्जांची पडताळणी पूर्ण झाली. ६४ हजार १७१ विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रम भरले. प्रत्यक्षात ७३ हजार ९१० विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली.

प्रभात Mon, 22 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/6449

### देशातील विद्यापीठ व उच्च शिक्षण संस्थांना 'यूजीसी'चे निर्देश

# नवीन शैक्षणिक धोरण कक्ष स्थापन करा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नवीन शैक्षणिक धोरण कक्ष स्थापन करण्याचे निर्देश देशातील सर्व विद्यापीठ व उच्च शिक्षण संस्थांना दिले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणात मांडलेली दूरदृष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी या कक्षाद्वारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

आयोगाचे अध्यक्ष डॉ. डी. पी. सिंग यांनी या संदर्भातील परिपत्रक सर्व कुलगुरूंना पाठविले आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिक्षण व्यापक करण्यासाठी, गुणवत्ता वाढवण्यासाठी काही बदल करण्यात आले आहेत. त्यात अ‍ॅकॅडमिक क्रेडिट बँक, कार्यप्रशिक्षणाचा समावेश असलेला पदवी अभ्यासक्रम, स्वयमवरील अभ्यासक्रमांना ४० टक्के श्रेयांक, परदेशी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कार्यालय, माजी विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरावर जोडून घेणे अशा काही योजना यूजीसीने मांडल्या आहेत. तसेच यूजीसीच्या क्वालिटी मॅन्टेडअंतर्गत शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी गुरू दक्षता, मानवी आणि व्यावसायिक मूल्यांची रूजवण करण्यासाठी मूल्य प्रवाह, अपंग विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधांची निर्मिती, भारतीय भाषांमध्ये शैक्षणिक साहित्याची उपलब्धता आदी उपक्रम यूजीसीने हाती घेतल्याची माहिती डॉ. सिंग यांनी दिली आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या सक्रीय सहभागाद्वारेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे शक्य आहे, असे यूजीसीने म्हटले आहे.

UGC University Grants Commission

प्रभात Tue, 23 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/64515593

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# 'वर्गोन्नत' विद्यार्थ्यांना दहावी, बारावीचे परीक्षा अर्ज भरण्यात अडचणी

### संबंधित विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या नववी आणि अकरावीतच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असताना नववी आणि अकरावीतून 'वर्गोन्नत' झालेल्या विद्यार्थ्यांचा नवाच प्रश्न समोर आला आहे. ऑनलाइन प्रणालीवर गुण भरल्याशिवाय 'वर्गोन्नत' म्हणून नोंद होत नसल्याने संबंधित विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या नववी आणि अकरावीतच असून, या विद्यार्थ्यांना दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा अर्ज भरण्यात अडचणी येऊ शकतात.

राज्य मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने सरल प्रणालीतील माहितीद्वारे भरले जातात. करोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्यावर्षी शासन निर्णयानुसार नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करून निकाल जाहीर करण्यात आला. मात्र शाळेतच न आलेल्या, मूल्यमापनासाठी उपलब्धच न झालेल्या विद्यार्थ्यांना वर्गोन्नती देण्याबाबत शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित विद्यार्थी दहावी आणि बारावीच्या वर्गात वर्गोन्नत झाले. मात्र या विद्यार्थ्यांचे स्टुडंट पोर्टलवर गुण भरल्याशिवाय वर्गोन्नत म्हणून नोंद होत नाही. या संदर्भात मुख्याध्यापक महामंडळाने शासनाकडे लेखी निवेदन दिले आहे. मात्र शासनाकडून त्याबाबत मार्गदर्शन देण्यात आलेले नाही.

वर्गोन्नतीची नोंद झालेली नसल्याने संबंधित विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या नववी आणि अकरावीतच आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना दहावी आणि बारावीचा परीक्षा अर्ज भरण्यात अडचणी निर्माण होणार आहेत, असे मुख्याध्यापक महामंडळाचे प्रवक्ता महेंद्र गणपुले यांनी सांगितले.

> **"वर्गोन्नत म्हणून नोंद न झालेल्या विद्यार्थ्यांबाबत माध्यमिक शिक्षण संचालकांशी चर्चा केली आहे. या विद्यार्थ्यांच्या तांत्रिक अडचणी सोडवण्यात येतील. या विद्यार्थ्यांना दहावी आणि बारावी परीक्षेचा अर्ज भरण्यात अडचणी येणार नाहीत.**
>
> – **शरद गोसावी**, अध्यक्ष, राज्य मंडळ

लोकसत्ता Tue, 23 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64506235

# प्रवेशासाठी आजपासून समुपदेशन फेरी

### शिक्षण उपसंचालक स्तरावरून विद्यार्थ्यांना रिक्त जागांची माहिती मिळणार

**पुणे, ता. २२ :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील शिक्षण उपसंचालक स्तरावरून समुपदेशनाची फेरी मंगळवारपासून (ता. २३) सुरू होणार आहे. या अंतर्गत इच्छुक विद्यार्थ्यांना रिक्त जागांच्या तपशिलाबाबत माहिती दिली जाणार आहे. तसेच आतापर्यंत प्रवेश प्रक्रियेत सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांनाही या फेरीत सहभागी होता येईल.

राज्यातील पुणे, पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नाशिक, अमरावती आणि नागपूर महापालिकेच्या क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांत अकरावीसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य यानुसार दोन फेऱ्या आयोजित केल्या होत्या. दरम्यान, अकरावीचे प्रथम सत्र संपत असतानाही आणखी काही विद्यार्थी प्रवेश मिळण्यासाठी विनंती करत आहेत. त्यामळे प्रत्येक विद्यार्थ्यांस शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने आणखी एक प्रवेश फेरीचे आयोजन केले आहे. ही फेरी दोन टप्प्यांत होत असून त्यातील पहिला टप्पा १६ नोव्हेंबरपासून सुरू झाला असून दुसऱ्या टप्पा मंगळवारपासून (ता. २३) सुरू होत आहे. या फेरीदरम्यान नवीन विद्यार्थ्यांनी अर्ज भरल्यानंतर त्याचा भाग एक प्रमाणित करण्याची सुविधा केवळ शिक्षण उपसंचालक लॉगिनमध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे अर्ज प्रमाणित करण्यातील विलंब टाळता येणार आहे. या फेरीनंतर २०२१-२२ मधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यामुळे प्रवेश रद्द करताना विद्यार्थ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असा सल्ला माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने दिला आहे.

**असे मिळणार प्रवेश...**

- दुसऱ्या टप्प्यात शिक्षण उपसंचालक स्तरावरून समुपदेशन करून २३ ते ३० नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश देणार
- विद्यार्थ्यांच्या चुका टाळण्यासाठी उपसंचालक स्तरावरून रिक्त जागांची माहिती मिळणार
- विद्यार्थ्यांना सोयीचे विद्यालय ऑनलाइन अ‍ॅलॉट करून देण्यात येईल
- प्रवेश निश्चित करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शनही करण्यात येणार

> **"अकरावी प्रवेशाची सर्व कार्यवाही वेळेत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित विद्यार्थी, उच्च माध्यमिक विद्यालये आणि शिक्षण उपसंचालकांनी घ्यावी. विलंबाने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील सर्व कामकाज पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यालयांची राहणार आहे.**
>
> –**महेश पालकर**, संचालक, शिक्षण विभाग

Pune, Main
23/11/2021 Page No. 5

Sakaal 23.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

पुढारी

# महाविद्यालयांत राबवणार रेंजर, रोवर उपक्रम

**स्काऊट आणि गाईड चळवळीचे विविध विभाग**

- बनी कब - बुलबुल
- स्काऊट-गाईड
- रोवर - रेंजर
- स्काऊटर - गाईडर

**उच्च व तंत्रशिक्षण विभागाची मान्यता**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

हिंदुस्तान स्काऊट आणि गाईडचे रेंजर (मुलगी) आणि रोवर (मुलगा) उपक्रम राज्यातील महाविद्यालयांमध्ये ऐच्छिक स्तरावर राबवण्यात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. संबंधित उपक्रम शैक्षणिक वेळापत्रकाच्या बाहेर आणि शासनाच्या आर्थिक-प्रशासकीय सहकार्याशिवाय राबवण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

हिंदुस्तान स्काऊट आणि गाईडचे रेंजर आणि रोवर उपक्रमाच्या मान्यतेचा शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून सोमवारी प्रसिद्ध करण्यात आला. हिंदुस्तान स्काऊट आणि गाईड या संस्थेला केंद्र सरकारच्या युवक आणि क्रीडा विभागाची मान्यता आहे. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय आणि अनुदानित, कायम विनाअनुदानित खासगी महाविद्यालये, अकृषी विद्यापीठांना हा उपक्रम राबविणे ऐच्छिक आहे. शासनावर कोणताही आर्थिक आणि प्रशासकीय भार येणार नाही, या अटीवर या उपक्रमाला मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाविद्यालयातील शैक्षणिक वेळापत्रकाशिवाय अन्य वेळेत हा उपक्रम राबवण्यात यावा. उपक्रमाचा सहामाही अहवाल सहसंचालकांकडे सादर करावा, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.



My Pune Edition
Nov 23, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# प्राध्यापकांना लस बंधनकारक

**वेतन रोखण्यासाठी उच्च शिक्षण विभागाचे पत्र**

**आशेची लस**

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

दिवाळीनंतर राज्यातील सर्व महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर आता लस न घेता ऑनलाइन अध्यापन करण्याची भूमिका घेणाऱ्या प्राध्यापकांचे पुढील महिन्यात वेतन रोखले जाणार आहे. याबाबत महाविद्यालयांना पत्र गेले असून, या प्राध्यापकांनी लस घेणे बंधनकारक असणार आहे.

करोनामुळे दीड वर्षाहून अधिक काळ बंद असलेली महाविद्यालये पुन्हा सुरू होत आहेत. यासाठी लसीकरणाची सक्ती करण्यात आली आहे. मात्र काही प्राध्यापकांनी लस न घेण्याचा पवित्रा घेऊन ऑनलाइन अध्यापन करण्याचाच निश्चय केल्याने प्राचार्यांसाठी ही मोठी डोकेदुखी झाली आहे. लस घेऊन कॉलेजला जाणे टाळण्याकडे काही प्राध्यापकांचा कल असल्याचे दिसून येत आहे. कॉलेज सुरू करताना विद्यार्थी, शिक्षक आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांना दोन्ही लसमात्रा घेणे सक्तीचे असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र काही प्राध्यापकांनी जाणूनबुजून लस न घेण्याचा पवित्रा घेतला आहे. यामुळे आता त्यांना महाविद्यालयांमध्ये बोलावता येणार नाही. ज्यांनी वैद्यकीय कारणांमुळे लसीकरण केलेले नाही त्यांना यातून मुभा देण्यात आली आहे. पण असे कोणतेही कारण नसताना, केवळ लसीकरणाला विरोध अशी भूमिका घेऊन अनेक शिक्षक आणि प्राध्यापकांनी कायमस्वरूपी ऑनलाइन शिकवण्याचा पर्याय स्वीकारला आहे. या प्राध्यापकांनी आम्ही शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये येण्यास तयार आहोत; मात्र लस घेणार नाही, असे प्राचार्यांना कळविले आहे. पण, सरकारी नियमांनुसार या शिक्षकांना लसमात्रा झाल्याशिवाय प्रत्यक्ष अध्यापनास परवानगी देण्यात येणार नाही. यामुळे या शैक्षणिक तासिकांचे नियोजन कसे करावे, असा प्रश्न शाळा आणि महाविद्यालय प्रमुखांना पडला आहे.

दरम्यान, याबाबत उच्च शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेत महाविद्यालयांकडून या महिन्याचे वेतन बिल पाठवताना लसीकरणाचा तपशीलही मागविला आहे. तसेच ज्या प्राध्यापकांनी अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लस घेतली नसेल त्यांना लस घेण्याचे आवाहन केले जाणार आहे. त्यांनी लस न घेतल्यास पुढील महिन्यापासून त्यांचे वेतन रोखले जाईल, असे कॉलेजांना कळविल्याचे उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ. सोनाली रोडे यांनी सांगितले.

Maharashtra Times 24.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

सकाळ

# राज्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण

**पुणे, ता. २३ :** पुणे, ता. २३ : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि अध्यापक विद्यालयांतील शिक्षकांच्या वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षणाच्या नियोजनाची आणि नियंत्रणाची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे सोपविण्यात आली आहे. या प्रशिक्षणासाठी परिषदेमार्फत ऑनलाइन नोंदणीसाठी पोर्टल विकसित केले आहे.

या प्रशिक्षणासाठी ३१ डिसेंबर २०२१ रोजी १२ वर्षे सेवा पूर्ण करणारे किंवा त्यापूर्वीच १२ वर्षे सेवा पूर्ण झालेले शिक्षक वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण, तर ३१ डिसेंबर २०२१ रोजी २४ वर्षे सेवा पूर्ण होणारे किंवा त्यापूर्वीच २४ वर्षे सेवा पूर्ण झालेले शिक्षक निवड श्रेणी प्रशिक्षण नोंदणीसाठी पात्र ठरणार आहेत. या प्रशिक्षणाकरिता नोंदणी करण्यासाठी शिक्षकांनी 'https://training.scertmaha.ac.in' या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन परिषदेने केले आहे. ही प्रशिक्षण नोंदणी २३ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. हे प्रशिक्षण प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि अध्यापक विद्यालय अशा चार गटांत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे.

> **राज्यातील सेवेत असणाऱ्या शिक्षकांसाठी तब्बल तीन वर्षांनंतर सेवांतर्गत प्रशिक्षण होत आहे. यंदा राज्य सरकारतर्फे पहिल्यांदाच या प्रशिक्षणासाठी दोन हजार रुपये शुल्क आकारले आहे. हे शुल्क रद्द करून सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्वीप्रमाणेच विनाशुल्क द्यावे, तसेच प्रशिक्षणासाठी 'शालार्थ आयडी'ची नोंद करणे सक्तीचे केल्यामुळे विनाअनुदानित, अंशतः अनुदानित, स्वयंशासित शिक्षकांना हे प्रशिक्षण घेता येणार नाही. त्यामुळे शालार्थ आयडीची सक्ती रद्द करावी.**
>
> **– प्रा. मुकुंद आंधळकर,** समन्वयक,
> महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ

Pune, Main
24/11/2021 Page No. 2

# विद्यार्थ्यांकडे शिष्यवृत्तीचे पैसे मागणाऱ्या महाविद्यालयाविरुद्ध कारवाई होणार

**मुंबई, दि. २३ :** समाज कल्याण विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तसेच राज्य शासनाच्या शिक्षण फी, परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेबाबत राज्यातील विविध महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांकडे रक्कम जमा करण्यासाठी मागणी होत आहे. तसेच कागदपत्र व निकाल देण्यासाठी अडवणूक होत असल्याबाबत विद्यार्थी व पालकांनी शासनाकडे तसेच राज्यातील समाजकल्याण विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांकडे तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीची गंभीर नोंद समाजकल्याण विभागाने घेतली असून आयुक्त, समाजकल्याण यांनी जी महाविद्यालये शासनाच्या आदेशांचे पालन करीत नाहीत त्यांच्यावर तत्काळ योग्य ती कारवाई करावी अशा सूचना राज्यातील विद्यापीठांना केल्या आहेत, असे समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्तांनी पत्रकाद्वारे प्रसिद्धीस दिले आहे.

केंद्र पुरस्कृत 'भारत सरकार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती' आणि राज्य शासनाची 'शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती फ्रीशिप योजना' या महत्त्वाच्या योजना आहेत. या शिष्यवृत्ती योजनांसाठी, शासनाने २००३ पासून वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, एखाद्या अभ्यासक्रमांत प्रवेशित असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाने अथवा संस्थेने कोणत्याही प्रकारच्या शुल्काची मागणी करु नये अथवा शुल्क भरण्यासाठी आग्रह करून कागदपत्रांची देखील अडवणूक करण्यात येऊ नये अन्यथा महाविद्यालयांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

शासनाच्या निर्देशांना न जुमानता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या अंतर्गत अनेक महाविद्यालये तसेच संस्था सशर्त प्रवेश देत आहेत आणि विद्यार्थ्यांनी आधी शुल्क भरावे व नंतर शिष्यवृत्तीची परतफेड करावी अशी मागणी देखील करत आहेत. ही बाब शासनाने मार्गदर्शक तत्त्वांच्या विरोधात आहे. अशा शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन आणि प्रमुखांना शासनाच्या निर्देशांचे पालन करण्याच्या सूचना विद्यापीठस्तरावरून त्वरित द्याव्यात अन्यथा शासन आदेशांचे पालन न केल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी असे विद्यापीठांना दिलेल्या पत्रात स्पष्ट निर्देश दिले आहेत.

प्रभात Wed, 24 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64538165

# *News Paper Clippings During November 2021*

**Section: Education**

# Pune university plans cell to implement NEP

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) will form a cell to decide the strategy for implementation of the New Education Policy (NEP) and its mandates in the university and its affiliated colleges as per the guidelines of the University Grants Commission.

The university will decide upon an academic credit bank, incorporating 40% courses from Swayam platform, introducing degrees based on experiential learning among others as laid down in the policy.

Registrar of SPPU, Prafulla Pawar said, "Based on the UGC guidelines we will be undertaking steps for implementation of NEP 2020 and to some extent have already started to adopt some of the mandates which were possible to take up immediately. We are offering multi-disciplinary programmes, orientation to faculty,, prepared framework for eco-friendly and sustainable campus among other things. The policy is vast and its implementation will take place in phases at colleges and institutes affiliated to SPPU in the coming months."

On November 18, the UGC on completion of one year of launching of the NEP, announced a number of initiatives aligned with the policy for universities across the country to follow.

D P Singh, a UGC official who issued a statement regarding the implementation of NEP, said, "The initiatives are aimed to improve accessibility, equity, quality, affordability and accountability and thereby bringing about transformative reforms in the higher education sector. The eligible institutions may implement the NEP initiatives at their level so that the benefits can reach the stakeholders in a time-bound manner."

The UGC has suggested that the universities and higher education institutions to start implementing the quality mandate under the NEP which included empowering graduates with vital skills requisite for global employment and successful life, orientation to new students through student induction programme, social responsibility and community engagement, industry-academic linkage, development cell and start up incubation centre, friendly campus for the physically challenged, translation of books / course materials for degree programme in Indian languages among others.

Pawar added, "A number of the programmes that are already mentioned in the UGC order or the NEP are in practice at SPPU. Now we are looking at the newer aspects that are part of NEP which we would be taking up for implementation and the cell has been established for the same reason."

## FOR ACCESSIBILITY, EQUITY AND QUALITY

**SUGGESTIONS FROM UGC**

- Regulations on academic bank of credits to promote flexibility and facilitate student mobility
- Guidelines on multiple entry and exit in the academic programmes of higher education institutions
- Guidelines for apprenticeship/ internship embedded degree programme as part of the curriculum of general degree programme
- Amendment of institutions deemed to be university regulations to facilitate vocational education to enhance employability
- Establishment of office for international affairs — one-stop contact for foreign students
- Regulations on online education to expand access and increase gross enrolment ratio
- Regulations on credit framework for online courses through SWAYAM 2021 for recognition and integration of credits — increasing the credit limit from 20% to 40%
- Guidelines for internationalisation of higher education
- Alumni connect at the university level to engage

The Times of India 24.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# ड्युएल डिग्री अभ्यासक्रमावर भर

**केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद प्रधान यांची माहिती**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'देशात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत असून, त्यानुसार आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमावर भर देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षणात 'ट्विनिंग प्रोग्राम' आणि 'ड्युएल डिग्री'चे (दुहेरी पदवी) नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यात येत आहे. शैक्षणिक धोरणानुसार आगामी काळात नावीन्यपूर्ण शिक्षण देण्याकडे कल राहणार आहे,' अशी माहिती केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद प्रधान यांनी दिली.

भारत आणि फ्रान्स यांच्यातील संबंध दृढ करण्यासह शिक्षण, संशोधन आणि नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी विद्यापीठात ऑनलाइन पद्धतीने 'इंडो-फ्रेंच नॉलेज समिट'ला सुरुवात झाली. त्या वेळी प्रधान बोलत होते. या वेळी फ्रान्सचे उच्च शिक्षण, संशोधन व नवसंशोधनमंत्री फेडरिक्यु विडाल, पृथ्वी विज्ञान व विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर उपस्थित होते.

प्रधान म्हणाले, 'भारताने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात भर देण्याबाबरोबरच सामाजिक सुधारणा करण्यासाठी योग आणि आयुर्वेद यांच्यावरही भर दिला जाणार आहे.' रविचंद्रन म्हणाले, 'भारत संशोधन निबंध प्रसिद्ध करण्यात जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. यावरून भारताचे संशोधनातील कार्य अधोरेखित होते.' या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'इंडो फ्रेंच सायंटिफिक को-ऑपरेशन इन' या विषयावर केंद्र सरकारमधील मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्रा. विजय राघवन, फ्रान्सच्या शिक्षण, विज्ञान व संस्कृतीचे डॉ. निकोलस घेराडी, 'इंडो फ्रेंच सेंटर फॉर दी प्रमोशन ऑफ ॲडव्हान्स रिसर्च'च्या संचालिका डॉ. पौर्णिमा रूपल यांनी आपले विचार मांडले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर यांनी सूत्रसंचालन केले.

या परिषदेत आरोग्य, सागरी विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, शाश्वत ऊर्जा, हरित रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधने आदी विषयांवर चर्चा होणार आहे. भारत आणि फ्रान्सच्या विद्यापीठांमधील व संशोधन क्षेत्रातील १०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ या 'नॉलेज समिट'मध्ये सहभागी झाले आहेत.

> **या 'नॉलेज समिट'च्या माध्यमातून आरोग्य क्षेत्राबरोबरच सागरी विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, शाश्वत ऊर्जा, हरित रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधने या क्षेत्रातील कमतरतांवर काम करण्याची ही संधी आहे. विद्यापीठाचे रिसर्च पार्क फाउंडेशनही याच सर्व क्षेत्रांत काम करीत आहे. या माध्यमातून 'इंटरडिसिप्लिनरी रिसर्च' पुणे विद्यापीठात करण्यात येत आहे.**
>
> – **डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**फ्रान्सने करोनाकाळात भारतीय विद्यार्थी व संशोधकांच्या संशोधनाला अधिक प्राधान्य दिले असून, पुढील दहा वर्षांत आंतरराष्ट्रीय अभ्यासकांसाठी २५ अब्ज युरोची तरतूद केली आहे. फ्रान्समध्ये संशोधनाला जाणाऱ्या भारतीय संशोधकांची संख्या २०२५ पर्यंत दुप्पट व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

– **फेडरिक्यु विडाल**, उच्च शिक्षण व नवसंशोधनमंत्री

Maharashtra Times 25.11.2021

# संशोधनात तंत्रज्ञान, योग, आयुर्वेदावरही भारताचा भर




प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २४** - भारताने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तंत्रज्ञान क्षेत्रात भर देण्याबाबरोबरच सामाजिक सुधारणा करण्यासाठी योग आणि आयुर्वेद यांच्यावरही भर दिला आहे, असे मत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी व्यक्त केले.

भारत आणि फ्रान्स यांच्यातील संबंध दृढ करण्यासह शिक्षण, संशोधन आणि नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ऑनलाइन पद्धतीने 'इंडो-फ्रेंच नॉलेज समिट'ला सुरुवात झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी फ्रान्सचे उच्चशिक्षण, संशोधन व नवसंशोधनमंत्री फेडरिक्यु विडाल, पृथ्वी विज्ञान व विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. एम. रवीचंद्रन, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालक डॉ. अपूर्वा पालकर उपस्थित होते.

### कुलगुरू म्हणाले...



'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रीसर्च पार्क फाउंडेशनही या सर्व क्षेत्रात काम करत आहे. या माध्यमातून 'इंटरडिसीप्लिनरी रीसर्च' विद्यापीठात केला जात आहे,' असे प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

## या विषयांवर होणार चर्चा



या तीन दिवसीय परिषदेत आरोग्य (संसर्गजन्य आजार), सागरी विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, शाश्वत ऊर्जा, हरित रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधने आदी विषयांवर चर्चा होत आहे. यातून अनेक सामंजस्य करार, एकत्रित संशोधन प्रकल्प हाती घेण्यासंदर्भात ठराव केले जाणार आहेत.

> संशोधन निबंध प्रसिद्ध करण्यात भारत देश जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. यावरून भारताचे संशोधनातील कार्य अधोरेखित होते.
>
> – एम. रवीचंद्रन, केंद्रीय सचिव

## दोन्ही देशांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन



भारत आणि फ्रान्सच्या विद्यापीठांमधील व संशोधन क्षेत्रातील १०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ या 'नॉलेज समिट' मध्ये सहभागी झाले आहेत. तसेच दोन्ही देशांतील १ हजार ३४९ मान्यवर या नॉलेज समिटला ऑनलाइन उपस्थित आहेत.

## फ्रान्सचे भारताला प्राधान्य



'फ्रान्सने करोना काळात भारतीय विद्यार्थी व संशोधकांच्या संशोधनाला अधिक प्राधान्य दिले आहे. फ्रान्सने पुढील १० वर्षांत आंतरराष्ट्रीय अभ्यासकांसाठी २५ अब्ज युरोची तरतूद केली आहे. २०२५ पर्यंत फ्रान्समध्ये संशोधनाला जाणाऱ्या भारतीय संशोधकांची संख्या दुप्पट करण्याचा मानस आहे,' असे फेरिक्यु विडाल यांनी यांनी सांगितले.

प्रभात Thu, 25 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/64559336

# News Paper Clippings During November 2021

## Section: Education

# तब्बल ८५० टन प्रश्नपत्रिका रद्दीत!




डॉ.राजू गुरव

**पुणे, दि. २४ - राज्य शिक्षण मंडळाने कोट्यवधी रुपये खर्च करुन छापलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या प्रश्नपत्रिका आता रद्दीत देण्यात येणार आहेत. करोनामुळे परीक्षाच रद्द झाल्याने या प्रश्नपत्रिका रद्दीत विकण्याची वेळ आली आहे. यासाठी ई-लिलावाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकांचे वजन सुमारे ८५० टन आहे.**

सन २०२०-२१ मध्ये करोनामुळे शाळा, कनिष्ठ फेब्रुवारी-मार्चमध्ये परीक्षा घेण्याचे नियोजन लांबणीवर पडले. दहावीच्या परीक्षा दि. २९ एप्रिल ते २० मेदरम्यान होणार होत्या. यासाठी १६ लाख ५८ हजार ६२४ तर, बारावीच्या परीक्षा दि.२३ एप्रिल ते २१ मेदरम्यान होणार होत्या. यासाठी १३ लाख १९ हजार ७५४ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. राज्य मंडळाने परीक्षेची

**विभागीय मंडळनिहाय रद्दी (टन)**

| | |
|---|---|
| पुणे | १५३ |
| नागपूर | ९३ |
| औरंगाबाद | ९८ |
| मुंबई | १५५ |
| कोल्हापूर | ८२ |
| अमरावती | ८५ |
| नाशिक | १०२ |
| लातूर | ६२ |
| कोकण | २० |

**ई-लिलाव प्रक्रिया सुरू : छपाईचे कोट्यवधी रुपये पाण्यात**

**दहावी, बारावीच्या परीक्षा रद्द झाल्याने निर्णय**

**अशा आहेत अटी**

- प्रतिकिलोला किमान दहा रुपयांपेक्षा अधिक दराची अपेक्षा
- साहित्य २५ दिवसांत उचलण्याचे बंधन
- साहित्य मुदतीत न उचलल्यास प्रतिदिन दहा हजार रुपये दंड. काम अर्धवट सोडल्यास अनामत रक्कम जप्त होणार

विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता याला प्राधान्य देत शिक्षण विभागाने दहावी व बारावीच्या परीक्षा रद्द करत अंतर्गत मूल्यमापनाद्वारे निकाल तयार करुन ते घोषितही केले. दरम्यान, सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्याचे वेळापत्रक लवकरच जाहीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राज्यातील नऊ विभागीय मंडळाच्या गोडाऊनमध्ये रद्द झालेल्या प्रश्नपत्रिका पडलेल्या

प्रभात वॉच

ठेवण्यासाठी आधी गोडाऊन रिकामी करावी लागणार आहेत. त्यादृष्टीने राज्य मंडळाने ई-लिलाव पद्धत राबविण्याचा निर्णय घेतला आहे. गोपनीय साहित्यात पेपर रद्दीसह कोरेगेटेड बॉक्स, नायलॉन स्ट्रिप, प्लास्टिक व कागदी रॅपर, खाकी पाकिटे आदींची लिलावाद्वारे

**निविदा दर भरण्यासाठी ठेकेदारांच्या संगनमताने हालचाली**

राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पुणे बोर्डाच्या कार्यालयात नुकतीच ठेकेदारांची निविदापूर्व बैठक घेतली. यात सुमारे १५ ठेकेदार उपस्थित होते. यात ठेकेदारांनी आपले गाऱ्हाणे मांडले. 'चेहरे पाहून, वशिलेबाजीने कोणालाही कामाचा ठेका मिळणार नाही. नियमानुसारच पात्र असणाऱ्या ठेकेदारालाच काम मिळेल.' अशा शब्दांत अधिकाऱ्यांनी सुनावले. दरम्यान, बैठक संपल्यानंतर आवारात ठेकेदार गटागटाने जमले होते. निविदांसाठी काय दर भरायला, 'रिंग' करुन निविदा भरायची, काम एकाला मिळाले तरी ते वाटून वाटून करायचे याबाबतची रणनिती आखण्यात ठेकेदार मग्न झाले असल्याचे आढळून आले.

प्रभात Thu, 25 November 2021 https://epaper.eprabhat.net/c/64549844

---

लोकमत

# ऑन-ऑफलाइनने प्राध्यापकांची 'सर्कस'

## वसतिगृह बंदचा उपस्थितीला फटका ; उच्च शिक्षण विभागाचा ढिसाळ कारभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने वसतिगृह सुरू करण्याबाबतची नियमावली अद्याप प्रसिद्ध केलेली नाही. त्यामुळे कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेऊनही केवळ पुण्यात राहण्याची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना ऑफलाइन वर्गांना उपस्थिती लावणे शक्य होत नसल्याचे समोर आले आहे. परिणामी, प्राध्यापकांनाही एकाच वेळी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने शिकवण्यासाठी सर्कस करावी लागत आहे.

कोरोना परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने दिवाळीपूर्वी आठ दिवस आधी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला; मात्र दिवाळीनंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती; परंतु दिवाळीनंतरही महाविद्यालयातील ऑफलाइन वर्गांना केवळ १५ ते २० टक्के विद्यार्थीच उपस्थित असल्याचे दिसून येत आहे.

उर्वरित विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीनेच शिक्षण घेत आहेत.उच्च शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे वसतिगृह बंद आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वेगळी व्यवस्था करावी लागत आहे.

कोरोना परिस्थितीत सुधारणा झाल्याने कोरोना प्रतिबंधात्मक लस घेतलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे ऑफलाइन वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली; मात्र दोन डोस घेऊनही अनेक विद्यार्थी ऑफलाइन वर्गाऐवजी ऑनलाइन वर्गांनाच अधिक पसंती देत आहेत.

त्यामुळे प्राध्यापकांना एकाच वेळी ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने वर्गात उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे लागत आहे.

> सर्वच महाविद्यालयांमध्ये वायफाय किंवा इंटरनेट सुविधा नाही. त्यामुळे ऑफलाइन वर्ग सुरू असताना बऱ्याचदा प्राध्यापकांना ऑनलाइन वर्ग घेता येत नाहीत, तसेच वर्गात केवळ १५ ते २० टक्के विद्यार्थीच उपस्थित असतात. पुण्यात तब्बल ३० ते ४० टक्के विद्यार्थी बाहेरुन शिक्षण घेण्यासाठी येतात; मात्र वसतिगृहाची सुविधा उपलब्ध न झाल्याने वर्गातील उपस्थितीवर परिणाम होत आहे.
>
> **-प्रा. एस.एम.राठोड, अध्यक्ष, पुटा.**



दिवाळीनंतरही महाविद्यालयातील ऑफलाइन वर्गांना केवळ १५ ते २० टक्के विद्यार्थीच उपस्थित

> ऑफलाइन पद्धतीने कॉलेज सुरु करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. त्यामुळे सर्व कॉलेजमधील प्राध्यापक / शिक्षक, शिपाई वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सर्वच महाविद्यालयांमध्ये खबरदारी, सावधगिरी बाळगून आणि सर्व कोरोनाविषयक नियमांचे पालन करून ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने वर्ग सुरु केले आहेत. विद्यार्थी ऑफिलाइन शिक्षण सुरु झाल्यामुळे खूप खुश आहे. सर्व विद्यार्थ्यांनी पुन्हा ऑफलाइन शिक्षणाचा आनंद घ्यायला हवा.
>
> **-प्राचार्य डॉ. उज्ज्वला बेंडाळे, न्यू लॉ कॉलेज, पुणे.**

Hello Pune
Page No. 3 Nov 25, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

### 'धोरणकक्ष स्थापन करावा'

पुणे : नवीन शैक्षणिक धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण संस्थांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण कक्ष स्थापन करावा, अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील उच्च शिक्षण संस्थांना केल्या आहेत.

उच्च शिक्षण संस्थांच्या सक्रिय सहभागाद्वारेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू शकते. त्याद्वारे भारताची जागतिक पातळीवर शैक्षणिकदृष्ट्या ओळख मजबूत होणार आहे. काही उच्च शिक्षण संस्थांनी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र, नव्या शैक्षणिक धोरणात मांडलेली दूरदृष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी नवीन शैक्षणिक शैक्षणिक धोरण कक्षाची स्थापना करण्याबाबतही नमूद करण्यात आले आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिक्षण व्यापक करण्यासाठी, गुणवत्ता वाढवण्यासाठी काही बदल करण्यात आले आहेत. त्यात ॲकॅडमिक क्रेडिट बँक, 'वर्कशॉप'चा समावेश असलेला पदवी अभ्यासक्रम, 'स्वयम'वरील अभ्यासक्रमांना ४० टक्के क्रेडिट, परदेशी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कार्यालय, माजी विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरावर जोडून घेणे अशा काही योजना 'यूजीसी'ने मांडल्या आहेत. 'यूजीसी'च्या गुणवत्ता वाढीच्या कार्यक्रमांतर्गत शिक्षकांचे प्रशिक्षण, मानवी आणि व्यावसायिक मूल्यांची रुजवण करण्यासाठी मूल्य प्रवाह, अपंग विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधांची निर्मिती, भारतीय भाषांमध्ये शैक्षणिक साहित्याची उपलब्धता आदी उपक्रम 'यूजीसी'ने हाती घेतल्याची माहिती यूजीसीचे अध्यक्ष डॉ. डी. पी. सिंग यांनी पत्राद्वारे विद्यापीठांच्या कुलगुरूंना दिल्या आहेत.

Maharashtra Times 26.11.2021

### ५० टक्के प्रवेश क्षमता नसलेले अभ्यासक्रम न राबवण्याचा विद्यापीठाचा निर्णय

#### विद्यापीठाचे परिपत्रक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागात राबवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद असल्यास संबंधित अभ्यासक्रम न राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भातील परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले असून, अभ्यासक्रम राबवताना त्यांची आर्थिक स्वयंपूर्णता तपासून घेऊन प्रवेश क्षमतेच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश झाल्यास संबंधित अभ्यासक्रम राबवण्यात येऊ नयेत असे स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात काही अभ्यासक्रम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू करण्यात आले आहेत. त्यातील काही अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद मिळतो. अभ्यासक्रमाच्या प्रवेक्ष क्षमतेनुसार अपेक्षित प्रवेश होत नसूनही संबंधित अभ्यासक्रम आतापर्यंत सुरू ठेवण्यात आले होते. मात्र खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाने अल्प प्रतिसाद असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश संख्येची शैक्षणिक विभागांच्या स्तरावर पडताळणीही करण्यात आली होती. त्यात काही विभागांतील पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना अल्प प्रतिसाद असल्याचे आढळून आले होते.

या पार्श्वभूमीवर कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी काही दिवसांपूर्वी परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. 'विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सध्या सुरू असलेले अभ्यासक्रम राबवताना त्यांची आर्थिक स्वयंपूर्णता तपासून घ्यावी. प्रवेश क्षमतेच्या ५० टक्केपेक्षा कमी प्रवेश असल्यास सदर अभ्यासक्रम राबवण्यात येऊ नयेत. तसेच अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता किमान तीस असावी, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Fri, 26 November 2021 https://epaper.loksatta.com/c/

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# 'शिष्यवृत्तीसाठी पैशाची मागणी करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करा!'

## समाजकल्याण आयुक्तांचे कुलगुरूंना पत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्याच्या विविध महाविद्यालयांकडून शिष्यवृत्तीधारक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडे शिक्षण शुल्काची रक्कम जमा करण्यासाठी मागणी होत आहे. ही रक्कम जमा न केल्यास कागदपत्र व निकाल देण्यासाठी अडवणूक केली जाते. याविरोधात सामाजिक न्याय विभागाने कठोर निर्णय घेतला असून शासनादेशाचे पालन न करणाऱ्या महाविद्यालयांवर तात्काळ कारवाई करावी, असे पत्र समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी विद्यापीठातील कुलगुरूंना पाठवले आहे.

केंद्र पुरस्कृत 'भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती' आणि राज्य शासनाची 'शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती फ्रीशिप योजना' या सर्वात महत्त्वाच्या योजना आहेत. या योजनांतर्गत, अनुसूचित जातीच्या दरवर्षी सुमारे साडेचार लाख अर्जांची विद्यार्थ्यांकडून संपूर्ण राज्यात नोंदणी केली जाते.

सदर शिष्यवृत्ती योजनांसाठी शासनाने २००३ पासून वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार एखाद्या अभ्यासक्रमांत प्रवेशित असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाने व संस्थेने कोणत्याही प्रकारच्या शुल्काची मागणी करू नये अथवा शुल्क भरण्यासाठी आग्रह करून कागदपत्रांची देखील अडवणूक करण्यात येऊ नये अन्यथा महाविद्यालयांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे निर्देश आहेत. असे असतानाही शासनाची मार्गदर्शक तत्त्वे आणि समाज कल्याण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांना न जुमानता अनुसूचित जातीच्या विद्यार्थांना विद्यापीठाच्या अंतर्गत अनेक महाविद्यालये व संस्था सशर्त प्रवेश देत आहेत आणि विद्यार्थ्यांनी आधी शुल्क भरावे व नंतर शिष्यवृत्तीची परतफेड करावी, अशी मागणीही करत आहेत, असे पत्रात म्हटले आहे.

### '...तर महाविद्यालये जबाबदार'

सध्याच्या कोविड संकटात जिथे बहुतेक कुटुंबे गंभीर आर्थिक आव्हानांना सामोरे जात आहेत, तेथे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना त्रास देणे सुरूच ठेवले तर, शासकीय यंत्रणेबद्दल जनसामान्यांचा विश्वास राहणार नाही व शासनाची प्रतिमाही मलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यासाठी संबंधित महाविद्यालयेच जबाबदार असतील, असेही सदरहू पत्रात नमूद करण्यात आले आहे, असे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी कळवले आहे.

लोकसत्ता Fri, 26 November 2021 https://epaper.loksatta.com/c/

# विद्यापीठाची परीक्षा जानेवारीत

## अभ्यासक्रम, कालावधी, बैठक व्यवस्थेचा अभ्यास करून ऑफलाइन परीक्षेची तयारी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा कायम ठेवण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षा ऑफलाइन पद्धतीने जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्याची तयारी केली आहे. परीक्षेसाठी अभ्यासक्रम, कालावधी बैठक व्यवस्था, पुनर्परीक्षा आदींबाबत चर्चा करून डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात निर्णय घेण्यात येणार आहे.

पुणे विद्यापीठासोबतच राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या सत्र परीक्षा ऑनलाइन व्हाव्यात, की ऑफलाइन याबाबत मतांतरे आहेत. मात्र, परीक्षांचा दर्जा टिकवण्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचविण्याच्या दृष्टीने ऑफलाइन परीक्षा झाल्या पाहिजे, असा सूर शिक्षण क्षेत्रातून उमटत आहे. त्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनीही ऑफलाइन परीक्षा घेण्याचे सूतोवाच काही दिवसांपूर्वी केले होते. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाकडून जानेवारीत परीक्षा सुरळीत सुरू करण्यासाठी उपाययोजना आखण्यात येत आहेत. त्याचा पहिला टप्पा म्हणजे परीक्षांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. करोनाची पार्श्वभूमी लक्षात घेता परीक्षेचा कालावधी आणि अभ्यासक्रम कमी करणे, बैठक व्यवस्था सुटसुटीत करणे, परीक्षा दिवसभरात दोन सत्रांत घेणे, परीक्षेपासून वंचित राहणाऱ्यांची पुनर्परीक्षा घेणे अशा महत्त्वाच्या तज्ज्ञांसोबत चर्चा करण्यात येत आहे. साधारण १५ डिसेंबरच्या विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत याबाबत अंतिम निर्णय होणार आहे. राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील ऑनलाइन अध्यापन २० ऑक्टोबरपासून ऑफलाइन पद्धतीने सुरू झाले आहे. त्याला विद्यार्थ्यांकडूनही उत्तम प्रतिसाद मिळतो आहे; प्रात्यक्षिकांचे वर्गही होत आहेत. त्यामुळे ऑफलाइन परीक्षेला कोणतीही अडचण येणार नाही, अशी प्राध्यापकांची भावना आहे.

### खासगी विद्यापीठांत ऑफलाइन परीक्षा

राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष थोड्या उशिराने सुरू झाले असले, तरी त्यांना ऑफलाइन परीक्षा घेण्यात अडचण येणार नाही. काही महाविद्यालयांनी परीक्षांचे वेळापत्रक तयार केले असून, येत्या काही दिवसांत सुरुवातही होणार आहे. खासगी विद्यापीठांतही ऑफलाइन परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळे परीक्षांबाबत सगळीकडे एकवाक्यता येण्यासाठी आणि परीक्षांचा दर्जा टिकून राहण्यासाठी पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाइन होण्याची गरज असल्याचे प्राध्यापकांकडून सांगण्यात येत आहे.



संग्रहित चित्र

"पारंपरिक अभ्यासक्रमांच्या स्वायत्त महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू झाल्याने, त्यांना परीक्षांच्या आयोजनाबाबत फारशी अडचण येणार नाही. मात्र, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत परीक्षांच्या आयोजनाबाबत अडचणी येऊ शकतात. परीक्षांच्या आयोजनाबाबत ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने तयारी केली असून, दुसऱ्या सत्राची परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेऊ.

\- डॉ. राजेंद्र झुंझारराव, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स

Maharashtra Times 27.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# प्रतिसाद नसलेल्या अभ्यासक्रमांवर फुली

### विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांना सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील विविध अभ्यासक्रमांना ५० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश झाल्यास ते बंद करण्यात येणार आहेत. अभ्यासक्रमांची किमान प्रवेशक्षमता ३० असावी, अशा सूचना प्रशासनाने विभागप्रमुखांना दिल्या आहेत.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी विद्यापीठातील शैक्षणिक विभागाच्या विभागप्रमुखांना नुकत्याच याविषयी सूचना दिल्या. त्यामुळे नजीकच्या काळात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नसलेले अनेक अभ्यासक्रम बंद होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉ. पवार यांनी पत्राद्वारे विभागप्रमुखांना दिलेल्या सूचनेनुसार व्यवस्थापन परिषदेच्या २६ जून रोजीच्या बैठकीत अभ्यासक्रम राबविताना त्यांची आर्थिक स्वयंपूर्णता तपासून घेण्याविषयी बजावले आहे. ५० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश असल्यास संबंधित अभ्यासक्रम राबविण्यात येऊ नये; अभ्यासक्रमांना किमान प्रवेशक्षमता ३० असावी, त्यानुसार शैक्षणिक विभागातील सर्व विभागप्रमुखांनी कार्यवाही करावी अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

पाली, संस्कृत यांसह अन्य अनेक विभागांमधील विद्यार्थीसंख्या दर वर्षी कमी होत असून, या निर्णयाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

### आर्थिक खर्च न परवडणारा



राज्य सरकारकडून सरकारी विद्यापीठांना आवश्यक आर्थिक मदत होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे कमी प्रतिसाद असणारे अभ्यासक्रम चालविताना विद्यापीठांची आर्थिक ओढाताण होत आहे. विद्यार्थ्यांच्या अल्प प्रतिसादात हे अभ्यासक्रम चालू ठेवण्याचा आर्थिक बोजा विद्यापीठ फंडावर येत आहे. अशा परिस्थितीत कमी प्रतिसादाचे अभ्यासक्रम बंद करून, खर्चावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

Maharashtra Times 27.11.2021

# SPPU to hold online MCQ exams for distance edun courses from December 7

ALIFIYA KHAN
PUNE, NOVEMBER 26

AFTER A gap of nearly two years and following several complaints from students, the Savitribai Phule Pune University (SPPU) will finally conduct examinations for students registered under the School of Open Learning (SOL), or distance learning mode, from December 7.

The exams for the Bachelor of Arts, Master of Arts, Bachelor of Commerce, Masters of Commerce and Masters of Business Administration courses will be held online in multiple-choice question (MCQ) format and will be of one-hour duration. In the last academic year, more than 13,000 students had taken admissions to distance education courses under SOL.

A notification issued by university officials said that exam timetable and other details are available on the website, www.unipune.ac.in/SOL/.

Detailed exam guidelines have been released for students who will be appearing for the proctored online exams for the first time since exams for distance mode students were cancelled last year. Internal tests were conducted instead and students were directly promoted to second year.

An important point which students have been asked to note is that though the session duration may be shown as 120 minutes or two hours at the time of login, the exam duration is only 60 minutes, after which students will get logged out.

Students have been asked to note that complaints will only be entertained for genuine reasons like not being able to log in, if they are logged out and unable to log in again, wrong language question paper, unable to submit answer paper, overlap with other exam or issues related to Covid-19.

Students can visit the website ww.solexam.unipune.ac.in or call the helpline 02071530202 to register complaints.

If the student gets logged out during an ongoing exam for any reason, the timing of the session will increase automatically according to the remaining minutes left, and the responses to questions answered during the previous session will be automatically entered and accepted.

As per the university's practice for regular students in previous exams, mock tests will be held from December 3 to 5 to acquaint students with the online exam system.

Indian express 27.11.2021

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

लोकमत

कोरोनामुळे दोन वर्षांपासून ऑनलाईन पद्धतीने परीक्षा : बैठकीत अंतिम निर्णय

# विद्यापीठाच्या ऑफलाईन परीक्षेचा निर्णय १५ डिसेंबरला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा दोन वर्षांपासून ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जात आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून कोरोना परिस्थिती सुधारणा झाली असून, ऑफलाईन पद्धतीने शाळा व महाविद्यालये सुरू झाली आहेत. त्यामुळे पुढील सत्राच्या परीक्षा सुद्धा ऑफलाईन पद्धतीनेच होण्याची शक्यता आहे. परंतु, येत्या १५ डिसेंबर रोजी होणाऱ्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत त्यावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांमधील सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठातर्फे कोरोनामुळे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. सुरूवातीला या ऑनलाईन परीक्षेत गोंधळ झाला. मात्र, विद्यापीठाने ऑनलाईन परीक्षेसाठी स्वत: चे व्यासपीठ निर्माण करून प्रॉक्टर्ड पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरळीतपणे घेतल्या. ऑनलाईन परीक्षेत बहुपर्यायी प्रश्न विचारले जात असल्याने विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळाले. परिणामी महाविद्यालयांच्या व विद्यापीठाच्या निकालात ही वाढ झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन परीक्षेचा आग्रह धरला जात आहे.

कोरोना परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी अद्याप महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नाहीत. त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने शिकवले जात आहे. त्यात ऑफलाईन वर्गांना अजूनही मोठी उपस्थिती असल्याचे दिसून येत नाही. त्यातच विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेत असल्याने विद्यापीठाने सुद्धा ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घ्यावी, अशी मागणी विविध विद्यार्थी संघटनांकडून करण्यात आली आहे.

### काय होईल १५ डिसेंबरला

१ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या येत्या १५ डिसेंबर रोजी होणाऱ्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत (बोर्ड ऑफ एक्सामिनेशन) विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे नियोजन केले जाणार आहे.

२ विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयामधील परीक्षा ऑफलाईन घ्याव्यात की ऑनलाईन घ्याव्यात यावर चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

### विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता



राज्यातील काही विद्यापीठांनी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्याची तयारी सुरु केली आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांनी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्याचे जाहीर केले आहे.



त्यामुळे पुणे विद्यापीठाकडून परीक्षेबाबत काय निर्णय घेतला जाणार याबाबत विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आहे.

Hello Pune
Page No. 7 Nov 28, 2021
Powered by: erelego.com

---

## अकरावी प्रवेशासाठी शेवटचे दोन दिवस

**पुणे, दि. २८** - इयत्ता अकरावी प्रवेशासाठी दोन दिवस संधी मिळणार आहे. समुपदेशनाद्वारे प्रवेश देण्याची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत आहे.

अकरावी प्रवेशासाठी तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर दोन फेऱ्या झाल्या. त्यानंतर २२ नोव्हेंबरपर्यंत पुन्हा 'प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य' फेरी घेण्यात आली. २३ नोव्हेंबरपासून समुपदेशन फेरीला सुरुवात झाली. पुणे विभागातील ३१७ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये १ लाख १३ हजार ४८५ जागा आहेत. ९० हजार ७८५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. यातील ८३ हजार ६८३ जणांनी लॉक केले. ८३ ६५२ अर्जांची पडताळणी झाली. आतापर्यंत ७४ हजार ११६ जागांवर प्रवेश निश्चित झाले. अद्यापही ३९ हजार ३६९ जागा रिक्त आहेत.

प्रभात Mon, 29 Nc https://ep

---

पुढारी

## विद्यापीठांतील रिक्त जागा कळवा; विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश

**मुंबई** : विद्यापीठामध्ये तसेच विद्यापीठाशी संलग्रित महाविद्यालयामध्ये प्राध्यापक, व्याख्याते, अधिव्याख्याते, सहाय्यक प्राध्यापक यांचे किती पदे रिक्त आहेत, याबाबतचा सर्व तपशील विद्यापीठ अनुदान आयोगकडे सादर करावा असे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांना दिले आहे.

सर्व विद्यापीठांनी त्यांच्याकडे तसेच संलग्रित महाविद्यालयामध्ये रिक्त असलेल्या जागांची माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाला ३१ डिसेंबरपर्यंत कळवावी, असे पत्र आयोगाने विद्यापीठांना पाठवले. यामध्ये संस्थांमधील रिक्त जागा, आरक्षण व विद्यापीठाने भरतीबाबतच्या केलेल्या जाहिराती पोर्टलवर अपलोड करण्याचेही आयोगाने स्पष्ट केले.

Pune Edition
Nov 29, 2021 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

**सामना**

# महाविद्यालयांमध्ये 'इनोव्हेशन टू एंटरप्रायजेस' स्पर्धा

## साविञीबाई फुले पुणे विद्यापीठ : २०००हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) – साविञीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'इन्फोफेस्ट २०२२' मधील 'इनोव्हेशन टू एंटरप्रायजेस' या नवकल्पनांना प्रोत्साहन देणाऱ्या स्पर्धेला पुणे, नगर व नाशिक येथील संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरुवात झाली आहे. ३४० महाविद्यालयांतील प्रतिनिधींनी यात सहभाग घेतला आहे.

विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाकडून दरवर्षी 'इनोफेस्ट' या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्टार्टअपविषयक कल्पना प्रत्यक्षात आणण्याची संधी या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते. यासाठी महाविद्यालयांमध्ये 'स्टार्टअप इनोव्हेशन सेल' स्थापन करण्यात आले आहे. यावर्षी १०० महाविद्यालये यामध्ये नव्याने जोडली गेली आहेत.

विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या, या ३४० महाविद्यालयांतून प्रत्येकी २ टीम असणार आहेत. प्रत्येक टीममध्ये साधारण ३ ते ४ विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. या सर्व विद्यार्थ्यांची महाविद्यालय स्तरावर पहिली फेरी होईल. त्यानंतर त्यांच्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात येईल. यातून निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'क्लस्टर लेव्हल' स्पर्धा घेण्यात येईल. त्यातून टॉप १०० टीमची निवड केली जाईल. या १०० टीमसाठी ३ दिवसीय 'बूट कॅम्प'चे आयोजन करण्यात येणार असून, त्यांना संबंधित विषयातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल.

> “ विद्यार्थ्यांची क्रयशक्ती आणि त्यांच्यातील उद्योजकीय मानसिकता वाढावी या दृष्टीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेली महाविद्यालये या प्रेरणेतून काही उपक्रम सुरू करू शकतील.
>
> **- डॉ. अपूर्वा पालकर, संचालिका नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, साविञीबाई फुले पुणे विद्यापीठ.**

त्यातून २५ ते ३० टीमचे स्टार्टअप निवडून त्यांच्यामध्ये विद्यापीठ स्तरावरील स्पर्धा होईल. त्यातून निवड झालेल्या २ स्टार्टअप टीमला रोख पारितोषिक, तर उर्वरित टीमला प्री-इन्क्युबेशन प्रशिक्षण देण्यात येईल. यातील ४० चांगल्या स्टार्टअपना मार्गदर्शन, तर काहींना विद्यापीठाच्या नवोपक्रम केंद्रात काम करण्याची संधी मिळेल. तसेच, यांचे व्यवसायात रुपांतर होईपर्यंत या स्टार्टअपला पाठिंबा दिला जाईल, असेही डॉ. पालकर यांनी सांगितले.

मागील वर्षी कोविडच्या पार्श्वभूमीवर हा फेस्टिव्हल ऑनलाइन पद्धतीने पार पडला होता. यंदा ऑनलाइन तसेच ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने ही स्पर्धा पार पडणार आहे.

Pune Edition
Nov 30, 2021 Page No. 5
Powered by : eReleGo.com

**लोकमत**

# विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना गुणपत्रिका मिळेनात

## स्टेशनरी नसल्याने रखडली छपाई : विद्यार्थ्यांमध्ये संतापाची भावना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : साविञीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षांचा निकाल सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात जाहीर करण्यात आला. मात्र, तब्बल अडीच महिन्यांनंतरही हजारो विद्यार्थी गुणपत्रिकेच्या प्रतीक्षेत असून विद्यापीठाकडे स्टेशनरी उपलब्ध नसल्याने गुणपत्रिकांची छपाईच होऊ शकली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातर्फे सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यात आल्या. तांत्रिक कारणांमुळे काही विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घ्यावी लागली. परंतु, विद्यापीठाने

> गुणपत्रिकांची छपाई सुरू झाली आहे. येत्या आठवड्याभरात हे काम पूर्ण होणार आहे. स्टेशनरी उपलब्ध नसल्याने गुणपत्रिका देण्यास काहीसा उशीर झाला.
>
> **- डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, साविञीबाई फुले पुणे विद्यापीठ**



परीक्षेसाठी स्वत:चे व्यासपीठ निर्माण केले. त्यामुळे परीक्षेतील गोंधळ कमी झाला. एकूणच विद्यापीठाने परीक्षेच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे पूर्वी कॉन्व्होकेशन सर्टिफिकेट, सर्व गुणपत्रिका या एजन्सीकडून छापून घेतल्या जात होत्या. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांपासून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्वत:च सर्व सर्टिफिकेट छापण्याचा निर्णय घेतला.

विद्यापीठाने सर्व प्रकारचे सर्टिफिकेट छापण्याचा निर्णय घेतला असला तरी त्यासाठी लागणारी स्टेशनरी निविदा काढून खरेदी केली जाते. विद्यापीठाला सुमारे दहा लाख गुणपत्रिकांची छपाई करावी लागते. निविदा काढून कागद खरेदी करण्याच्या प्रक्रियेस विलंब झाला. परिणामी कागद नसल्याने तब्बल तीन ते साडेतीन लाख विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका छापणे शक्य झाले नाही. विद्यापीठाचे अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी सांगितले,

"विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छपाई तत्काळ करून त्याचे वितरण करावे. गुणपत्रिका नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विद्यापीठाने विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडवला नाही तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल."

Hello Pune
Page No. 1 Nov 30, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Education

# पुणे विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम बंद होणार!

बालाजी पोटे

- क्षमतेपेक्षा कमी प्रवेश झालेले विभाग विद्यापीठाच्या रडारवर



**पुणे** दि. २९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश क्षमतेच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश झाले असतील, तर असे अभ्यासक्रम बंद करण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे भाषिक अभ्यासक्रमांवर आणि मानव्यशास्त्र विभागातील अनेक अभ्यासक्रम बंद पडण्याची भीती आहे. त्याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

'शैक्षणिक विभागातील अभ्यासक्रमाची स्वयंपूर्णता तपासावी. प्रवेश क्षमतेच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश असलेले अभ्यासक्रम राबवू नयेत. कोणत्याही अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता किमान ३० असायला हवी,' अशा आशयाचे परिपत्रक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी जारी केले आहे.

'विद्यापीठाच्या आर्थिक धोरणाशी हे परिपत्रक सुसंगत असले, तरी त्याचा शिक्षण क्षेत्रावर आणि मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा साकल्याने विचार केला गेला नाही,' असे धुरिणांचे मत आहेत.

पुणे विद्यापीठात कित्येक वर्षांपासून अनेक विभाग व अभ्यासक्रमांना पूर्ण क्षमतेने प्रवेश झालेले नाहीत. त्यामुळे असे अभ्यासक्रम आता बंद होणार हे निश्चित आहे.

संस्कृत, पाली, हिंदी, मानव्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास कक्ष यांसारख्या विभागांत बहुतांश अभ्यासक्रमांना ५० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश झाले आहेत. त्यामुळे या निर्णयाने हे विभागच बंद करण्याची वेळ प्रशासनावर येणार आहे.

(क्रमशः)

| विभाग | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | निवड झालेले विद्यार्थी |
|---|---|---|---|
| संस्कृत | एम.ए. लिंग्विस्टिक | ३० | ८ |
| | एम.ए. लॉजिक | ६० | ३ |
| | सर्टिफिकेट कोर्स | ३० | १ |
| पाली | एम. ए. पाली | ३० | १० |
| | बुद्धिस्ट स्टडी | २० | ९ |
| हिंदी | एम.ए. हिंदी प्रयोजनमूलक | ३० | ४ |
| | एम.ए. हिंदी साहित्य | ६० | ३२ |
| परकीय भाषा | रशियन भाषा | १० | १ |
| | स्पॅनिश भाषा | २० | ५ |

### काही विद्यार्थ्यांचे प्रवेश घटले

दरम्यान, कला शाखेच्या विषयांना प्रवेश घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुणे विद्यापीठात मोठी होती. यात अनेक विद्यार्थी हे हिंदी, पाली, संस्कृत, तत्त्वज्ञान अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करत असत. गेल्या अनेक वर्षांपासून हे प्रमाण अधिक राहिले आहे. परंतु, आता ऑनलाइन शिक्षणामुळे वसतिगृह, ग्रंथालय आदी सुविधा मिळत नसल्याने या विद्यार्थ्यांचेही प्रवेश कमी झाले आहेत. त्यामुळे चिंता वाढली आहे.

### 'स्किल डेव्हलपमेंट'कडे विद्यार्थ्यांची पाठ

विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे, या दृष्टीने स्किल डेव्हलपमेंट सेंटर उभारण्यात आले होते; परंतु या येथील कोणत्याही अभ्यासक्रमाचे प्रवेश पूर्ण क्षमतेने झालेले नाहीत. त्यामुळे येथील बहुतांश अभ्यासक्रम बंद होण्याची शक्यता आहे.

प्रभात Tue, 30 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/64686497

पुढारी

# 'इनोव्हेशन' स्पर्धा ३४० महाविद्यालयांत सुरू

## संलग्न महाविद्यालयांमधील दोन हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'इन्फोफेस्ट २०२२'मधील 'इनोव्हेशन टू एंटरप्राइजेस' या नवकल्पनांना प्रोत्साहन देणाऱ्या स्पर्धेला पुणे, अहमदनगर व नाशिक येथील संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत ३४० महाविद्यालयांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला आहे.

विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाकडून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या स्टार्टअपविषयक कल्पना प्रत्यक्षात आणण्याची संधी यातून दिली जाते. यासाठी महाविद्यालयांमध्ये 'स्टार्टअप इनोव्हेशन सेल' स्थापन करण्यात आला आहे. यावर्षी १०० महाविद्यालये यामध्ये नव्याने जोडली गेली आहेत.

विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या, "या ३४० महाविद्यालयांतून प्रत्येकी २ टीम असणार आहेत. प्रत्येक टीममध्ये साधारण ३ ते ४ विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. या सर्व विद्यार्थ्यांची महाविद्यालयस्तरावर पहिली फेरी होईल. त्यानंतर त्यांच्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात येईल. यातून निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'क्लस्टर लेव्हल' स्पर्धा घेण्यात येईल. त्यातून टॉप १०० टीमची निवड केली जाईल. या १०० टीमसाठी ३ दिवसीय 'बूट कॅम्प'चे आयोजन करण्यात येणार असून त्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. त्यातून २५ ते ३० टीमचे स्टार्टअप निवडून त्यांच्यामध्ये विद्यापीठस्तरावरील स्पर्धा होईल. त्यातून निवड झालेल्या २ स्टार्टअप टीमला रोख पारितोषिक व उर्वरित टीमला प्री-इन्क्युबेशन प्रशिक्षण देण्यात येईल. यातील ४० चांगल्या स्टार्टअपना मार्गदर्शन व काहींना विद्यापीठाच्या नवोपक्रम केंद्रात काम करण्याची संधी मिळेल. तसेच यांचे व्यवसायात रूपांतर होईपर्यंत या स्टार्टअपला पाठिंबा दिला जाईल."



> "विद्यार्थ्यांची क्रयशक्ती आणि त्यांच्यातील उद्योजकीय मानसिकता वाढावी, या दृष्टीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेली महाविद्यालये या प्रेरणेतून काही उपक्रम सुरू करू शकतील.
>
> - **डॉ. अपूर्वा पालकर**, संचालिका, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
Nov 30, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Research

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाचे संशोधन

# पश्चिम घाटात गोड्या पाण्यातील टार्डीग्रेड नावाच्या सूक्ष्मजीवाचा शोध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** जैवविविधतेने संपन्न असलेल्या पश्चिम घाटात गोड्या पाण्यातील टार्डीग्रेड हा सूक्ष्मजीव शोधला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागातील संशोधकांनी या बाबतचे संशोधन केले असून, टार्डीग्रेड हा सूक्ष्मजीव अतिउच्च आणि अतिथंड वातावरणात अनेक वर्षे सुप्तावस्थेत जिवंत राहतो.

विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागातील डॉ. कल्पना पै आणि संशोधन अभ्यासक कल्याणी भाकरे यांनी केलेले संशोधन अक्वाटिक इकॉलॉजी या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध झाले आहे. टार्डीग्रेडला वॉटर बेअर या नावानेही संबोधले जाते. २० व्या शतकाच्या सुरुवातीला भारतात टार्डीग्रेडची नोंद झाल्यानंतर या सूक्ष्मजीवावर दीर्घकालीन अभ्यास झाला नव्हता. या आधीही जमिनीवर टार्डीग्रेड आढळले होते. मात्र गोड्या पाण्यातील टार्डीग्रेड हे या अभ्यासादरम्यान आढळून आले. पावसाच्या पाण्यामुळे तयार होणाऱ्या नैसर्गिक डबक्यांत हा सूक्ष्मजीव आढळला आहे, अशी माहिती डॉ. पै यांनी दिली. वातावरणातील बदलांचा अंदाज घेत टार्डीग्रेड आपल्या शरीररचनेत बदल करतो. योग्य वातावरण निर्माण होईपर्यंत अनेक वर्ष तो सुप्तावस्थेत राहतो. मुख्य म्हणजे तो ज्या अवस्थेत सूप्त झाला होता, त्यात अवस्थेत बाहेर येतो असे आतापर्यंतच्या निरीक्षणांतून दिसून आल्याचे डॉ. पै यांनी नमूद केले. पश्चिम घाटात विविध जलचर परिसंस्था आहेत. या परिसंस्थांमध्ये वैविध्यपूर्ण सूक्ष्मजीवांसह इतर अनेक जलचरांचा अधिवास आहे. मात्र वाढते पर्यटन आणि मानवी हस्तक्षेपामुळे हे अधिवास धोक्यात आले आहेत. या अधिवासांचे, वनस्पतींचे आणि प्राण्यांच्या संवर्धनाची गरज आहे. अन्यथा त्यातील प्रजाती शोधण्यापूर्वीच नष्ट होण्याचा धोका आहे, असे भाकरे यांनी सांगितले.

### परग्रहावरील जीवसृष्टीच्या अभ्यासासाठी उपयुक्त



पृथ्वीला पर्याय म्हणून जगभरातील शास्त्रज्ञ सजीवसृष्टी टिकू शकेल अशा पर्यायी ग्रहाचा शोध घेत आहेत. परग्रहावर एखादा जीव जिवंत राहू शकेल का, याचा अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून हा सूक्ष्मजीव भविष्यात उपयोगी ठरू शकतो. त्यामुळेच या सूक्ष्मजीवविषयी व्यापक अभ्यासाची गरज आहे. इस्रोसारख्या संस्थांनी अशा संशोधनाकरिता अधिकाधिक संधी संशोधकांना उपलब्ध करून द्यायला हव्यात असेही भाकरे यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 10 November 2021
https://epaper.loksatta.com/c/64250842

# *News Paper Clippings During November 2021*

## Section: Miscellaneous

### १५ नोव्हेंबर हा दिवस आदिवासी गौरव दिन

**नवी दिल्ली, दि. १२** - १५ नोव्हेंबर हा दिवस, शूर आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतीला समर्पित आदिवासी गौरव दिन म्हणून घोषित करण्यास आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. बिरसा मुंडा यांनी देशासाठी दिलेल्या बलिदानाची माहिती भावी पिढ्यांना व्हावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

संथाल, तामर, कोल, भिल्ल, खासी आणि मिझो यांसारख्या आदिवासी समुदायांच्या अनेक चळवळींनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला बळकटी दिली.

आदिवासी जनतेच्या क्रांतिकारी चळवळी आणि संघर्ष त्यांच्या अतुलनीय धैर्याचे आणि सर्वोच्च बलिदानाचे दर्शन घडवतात. ब्रिटीश वसाहतवादी राजवटीविरुद्ध देशातील विविध प्रदेशातील आदिवासी चळवळी राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याशी जोडल्या गेल्या आणि देशभरातील जनतेला त्यातून प्रेरणा मिळाली. मात्र, या आदिवासी वीरांबद्दल बऱ्याच लोकांना फारशी माहिती नाही. २०१६ च्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधानांच्या भाषणाच्या अनुषंगाने, भारत सरकारने देशभरातील १० आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालयांना मंजुरी दिली आहे.

प्रभात Sat, 13 November 2021
https://epaper.eprabhat.net/c/65606242

लोकमत

### बिरसा मुंडा जयंती जनजातिया गौरव दिवस

#### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भोपाळमध्ये घोषणा

**अभिलाष खांडेकर**
लोकमत न्यूज नेटवर्क

**भोपाळ** : आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांचा जयंती (१५ नोव्हेंबर) दिन देशात दरवर्षी 'जनजातिया गौरव दिवस' म्हणून साजरा केला जाईल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी येथे केली.

मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित आदिवासी समाजाच्या मेळाव्यात बोलताना मोदी म्हणाले, 'आज हा पहिला जनजातिया गौरव दिवस आहे' मध्य प्रदेशातील २३ आदिवासीबहुल जिल्ह्यातील शेकडो आदिवासी स्री-पुरुष रविवारी सायंकाळीच येथे दाखल झाले. त्यांच्या हातात त्यांच्या गावातील अमृत माती होती. नंतर ती मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते मोदी यांना देण्यात आली.

मोदी म्हणाले, 'यापूर्वीच्या सरकारांनी आदिवासींना फक्त तोंडी आश्वासने दिली. आमच्या सरकारने गेल्या ७ वर्षांत सगळ्या राज्यांतील आदिवासी समाजांच्या एकूण कल्याणासाठी सर्व प्रयत्न केले. वेगवेगळ्या योजनांद्वारे आम्ही आदिवासींच्या कल्याणासाठी प्रयत्न केले, असे सांगून मोदी म्हणाले की, मध्य प्रदेशला मंगूभाई पटेल यांच्या रुपाने पहिला आदिवासी राज्यपाल लाभला. शिक्षण, संस्कृती, वाणिज्य, आरोग्य अशा माध्यमांतून आमच्या सरकारने देशातील आदिवासी नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न केले आहेत.

कोरोनाला रोखण्यासाठीच्या लसीकरण मोहिमेत सहभागी झाल्याबद्दल मोदी यांनी आदिवासी लोकांचा आवर्जुन उल्लेख केला. मोदी यांनी आदिवासी समाजाची कला, संस्कृती आणि सृजनाची प्रशंसा केली. बन्सल ग्रुप ऑफ भोपाळने पीपीपी मॉडेलवर विकसित केलेल्या दुसऱ्या खासगी रेल्वेस्थानकाचे उद्घाटन व लोकार्पण मोदी यांच्या हस्ते झाले.

Pune Main
Page No. 9 Nov 16, 2021
Powered by: erelego.com

# *Condolence Message*




आपल्या महाविद्यालयातील ज्येष्ठ सहकारी **सुभाष नारायण कामठे** यांचे दि. १८.११.२०२१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे .

**आपले ज्येष्ठ सहकारी कैलास वासी सुभाष नारायण कामठे यांच्या बद्दल दोन शब्द:**

सुभाष कामठे उर्फ भाऊ कामठे अतिशय शांत स्वभावाचे व्यक्तिमत्व. कामावर अपार निष्ठा. भाऊंना काम सांगितलंय आणि झालं नाही असं कधीच झाले नाही. आपल्याला दिलेली जबाबदारी अतिशय प्रामाणिकपणे पार पाडण्यात भाऊ अतिशय तरबेज. मोजकंच बोलणं, प्रेमाने बोलणं कधी कोणाबद्दल वाईट बोलणार नाही. अतिशय घेण्यासारखा गुणधर्म म्हणजे कामाची वेळ कधी चुकवली नाही. दिलेलं काम कधी नाही हा शब्द उच्चारला नाही, त्याचमुळे आज मॉडर्न महाविद्यालय दिमाखात सुवर्ण महोत्सव वर्ष पूर्ण करत आहे. अशा सर्व जेष्ठ कर्मचाऱ्यांच्या अपार कष्टामुळे मेहनतीमुळे मॉडर्न महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होत आलेली आहे. आपण सर्व नव्या पिढीचे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या जेष्ठ कर्मचाऱ्यांचे हेच गुण अंगीकारावे व आपल्या महाविद्यालयाचे प्रगती उत्तरोत्तर करत राहावे हेच भाऊंना आपल्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण होईल. आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने कैलास वासी सुभाष उर्फ भाऊ नारायण कामठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



# *Upcoming Events*

| December 2021 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sun** | **Mon** | **Tue** | **Wed** | **Thu** | **Fri** | **Sat** |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 *Sant Santaji Jagnade Maharaj Jayanti*  | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*